# उमलत्या कळ्या

## शोभना नरसिम्हा कारंथ



# उमळत्या कळया

शोभना कारंथ

ई साहित्य प्रतिष्ठान

**उमळत्या कळया (कादंबरी)**

**लेखिका : श्रीमती शोभना नरसिम्हा कारंथ**



बी/३०३, क्रिष्ण पालकी सोसायटी,

विमल डेअरी लेन, इंद्रलोक फेस ३, ओम शांती चौक ,

भाईंदर पूर्व , ४०११०५

मोबाईल: ८७६७५२२५९९

shobhanakaranth@gmail.com

लेखन वाचन, बुद्धीबळ आणि भटकंतीची आवड असलेल्या सौ शोभना कारंथ या सुगृहिणी असून, अनेक वर्षे आपल्या लेखनाचा छंद त्या जोपासत आहेत.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई आवृत्ती:प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ६ मे २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**निर्मिती सहाय्य/संपादन : रश्मी किर्लोस्कर**

# प्रस्तावना

स्त्रियांच्या अर्थात मग ती बालिका असो वा तरूण युवती असो वा वयस्कर स्त्री असो त्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने समाज प्रबोधनाइतकेच स्त्री शिक्षण महत्वाचे आहे. अपुऱ्या शिक्षणामुळे स्त्रियांचे प्रश्न अधिक जटिल व जीवन अधिक कष्टप्रद होते. यांचे खरे कारण आर्थिक दुर्बलता हे कारण सर्वात जास्त प्रमाणात आढळून येते.

जसे या कादंबरीमध्ये सीमा व रेखा या आर्थिक दुर्बलतेने शिक्षण घेऊ शकत नाही आणि अपुऱ्या शिक्षणाने रेखा बार डान्सर बनते आणि सीमा आपल्या मेहनतीने परिवार सांभाळते. परंतु मेहनत करूनही पौरूषत्वाच्या अहंकाराने ती यशस्वी न होता तिचा खून होतो. रेखा बार डान्सर झाल्याने तिचा नराधमांनी कमजोरीचा सतत फायदा घेतला. मायासुद्धा परिवारासाठी लहान वयात रखेल बनून आपल्या आयुष्यात फेल होते. जे कोवळे वय हसायचे खेळायचे त्या वयात परिवाराचा भार उचलून अत्याचाराला बळी पडायचे. परंतु ज्यावेळी शिक्षण घेऊनही काही मुली अथवा महिला वा बालिका अत्याचाराला बळी पडतात – त्याचं कारण एकतर्फी प्रेम....पाशवी वृत्ती.... अहंकार.... वासनेची भूक. शिक्षणाबरोबर हिम्मत आणि आत्मविश्वास या गोष्टीही महत्वाच्या आहेत. जसे मनिषा आपल्या हिम्मत आणि आत्मविश्वासावर स्वत:चे जीवन यशस्वी करते त्याचबरोबर अनेक स्त्रियांच्या जीवनात हिम्मत देऊन आत्मविश्वास जागृत करते आणि त्यांचे जीवन कसे यशस्वी बनविते हे या कादंबरीत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीला आता आपले संरक्षण स्वत: करायला हवे. स्वत: सक्षम बनायला हवे आणि ते कसे सक्षम बनणार हेच या कादंबरीचे खरे स्वरूप आहे.

# मनोगत

"उमळत्या कळया" हे माझे कादंबरी रुपी पुष्प वाचकांसमोर ठेवताना मला अतिशय आनंद होत आहे. तसे मी अनेक मराठी दिवाळी अंकात कथा आणि लेख पाठवीत असते आणि त्या प्रकाशितही होत असतात. त्यावेळी मला जो आनंद होतो त्या आनंदापेक्षाही जास्तीचा आनंद या पुस्तकामुळे झालेला आहे. दिवाळी अंकात आपल्या जीवनातील सत्यतेची मूल्ये तसेच अंधश्रद्धा व माझ्या आत्मकथनावरील अनेक कथा प्रसिद्ध झाल्यानंतर दुसरे असे शब्दांमधून मांडण्यासाठी काही अन्य विषय असले तरी माझ्या दृष्टीने जो प्रभावी व ज्वलंत विषय मनाला भेडसावला तो या पुस्तकातून विशद केला आहे. त्यात वर्णन केलेले काही प्रसंग समाजामध्ये आढळलेली सत्यता आहे. त्याला कोणीही अव्हेरू शकणार नाही.

आजही अशी अनेक गावं आहेत कि तिथे शिक्षणाचा प्रसार झाला नाही. त्यामुळे या शिक्षणाच्या अभावाने म्हणा किंवा आर्थिक दुर्बलतेने लहान कोवळया वयात म्हणजे नुकत्या यौवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मुली, आपल्या घराची जबाबदारी पडल्याने कामकाजास्तव इतरत्र भटकत असतात. उपाशीपोटी तळमळणारी आपली लहान तीन चार भावंडं बघून त्यांच्यासाठी आपले स्वतःचे शिक्षण सोडून भावंडांसाठी आपल्या भविष्याचा त्याग करून त्या पैशाच्या लालसेने त्या कामाच्या खोट्या आमिषाने ढोंगी नराधमाच्या शिकार

बनतात. त्या ढोंगी नराधमांच्या चक्रव्यूहात एकदा सापडल्या कि त्यातून त्यांना बाहेर निघणे मुश्किल होऊन जाते. त्यांना समाजात स्थान मिळत नाही कि त्या चक्रव्यूहात राहू शकत नाही. त्याच्या जीवनाची दिशाहि बदलून जाते. शेवटी नाईलाजाने त्या मलीन जीवनाचा स्वीकार करण्याखेरीज दुसरा कुठलाच मार्ग उरात नाही. त्या मुलींचा सन्मानाने जगण्याचा अधिकार समाजाकडून हिरावून घेतला जातो. त्या मलीन जीवनातून बाहेर येण्याची संधी समाजाकडून मिळत नाही. ती सुद्धा आपल्या मुलीप्रमाणे एक कोणाची तरी मुलगी आहे.तिलाही भावना आहेत. समाजात सन्मानाने जगण्याचा तिलाही अधिकार आहे. या मलीन जीवनाच्या वाटेवर जाण्यास तिची काहीतरी मजबुरी असावी अथवा त्या वाटेकडे जाण्यास तिला कोणीतरी प्रवृत्त केले असावे किंवा फसवून ती त्यात अडकली गेली असावी.अशा सकारात्मक दृष्टीने विचार केला तर अशा पीडित मुलींचा निश्चितच उद्धार होईल.

परंतु ज्या मुली सन्मानाने मेहनत करून जीवन जगत  असतात अशा मुलींनाही या समाजातील भक्षक निर्धास्तपणे जीवन जगू देत नाही. आपल्या हपापलेल्या नजरेने तिची कधी शिकार मिळते याची वाट पहात असतात. तिला त्रास देऊन तिचे जीणे असह्य करून टाकतात.

अजूनही अंधश्रद्धेच्या नावाखाली "वंशाला दिवा हवा" म्हणून गर्भात असतानाच मुलीची हत्या केली जाते. तर कधी एकतर्फी प्रेमात पुरुषत्वाच्या अहंकाराने मुलीच्या तोंडावर ऍसिड फेकून तिला जीवनातून उठवले जाते. तर कधी सूड घेण्यासाठी भाडोत्री गुंड बोलावून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला जातो आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिच्या देहाच्या चिंधड्या करून जंगलात

किंवा पाण्यात फेकल्या जातात. हि स्त्री जातीची मनाला थरारून टाकणारी घोर समस्या झाली आहे.

यासाठीच स्त्रियांनी असे शिक्षण घ्यावे कि वेळेला ती स्वतःचे रक्षण स्वतः करू शकेल. आत्मनिर्भय, शक्तिशाली आणि तितकाच आत्मविश्वास या अर्थाने प्रत्येक स्त्रीला स्वावलंबी बनणे आवश्यक आहे. हाच हेतू या पुस्तकापाठी आहे. या हेतूंमधूनच या "उमळत्या कळया " कादंबरीचा उदय झाला. या उदयातूनच प्रत्येक स्त्रीच्या मनात आत्मविश्वासाचा, आत्मनिर्भयतेचा प्रकाश उजळावा अशी मी आशा बाळगते. इथे एका कळीची व्यथा नाही तर दुनियेत अशा अनेक नुकत्या उमळणाऱ्या कळयांची हि व्यथा स्पष्ट केली आहे. माझा वाचक वर्ग या मी लिहिलेल्या कादंबरीचा स्वीकार करतील अशी मी आशा बाळगते.

तसेच माझे पति श्री. नरसिम्हा आणि माझी लाडकी सून सौ. सुनिता व माझ्या पाठीशी असलेला माझा मोठा भाऊ श्री. सुधीर हेसुद्धा माझ्या यशाचे सहयोगी तसेच यशाचे मानकरी आहेत म्हणून मी त्यांची सुद्धा शतशः आभारी आहे.

सौ. शोभना न. कारंथ

# अर्पण पत्र

माझ्यावर नितांत प्रेम करणारा, माझ्या कष्टाची कदर करणारा ,आपल्या आईला मनाच्या मंदिरात देवीचे स्थान देणारा, आमच्या कठीण परिस्थितीत समंजसपणे राहून मोठ्या कष्टाने तसेच अखंड मेहनतीने सी.ए पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून तो आज फॉरेन बँकमध्ये "वाईस प्रेसिडंट " च्या पदावर काम करत आहे. त्याचा मला अभिमान आहे. गर्व आहे. त्याच्या सहयोगानेच मी हे आज कादंबरी लिहिण्यात यश संपादन केले. अशा या माझ्या अति लाडक्या सुपुत्र

## श्री.मंजुनाथ यास

हे पुस्तकरूपी पुष्प मी सप्रेम भेट म्हणून अर्पित करते.

# उमळत्या कळया

आज मंदिरात जायला मला थोडा उशीरच झाला होता. म्हणून मी घाई घाईतच पूजेची थाळी घेऊन पटापटा पावले उचलीत होती. परंतु मंदिराच्या आसपास आज पोलीसांची गर्दी दिसत होती. लोकांचीही गर्दी होतीच. पोलीस आपल्या लाठीने गर्दीला हटवण्याचा प्रयास करत होते. तरीही गर्दी पुन्हा पुन्हा पुढे पुढे सरकत होती. लोकांच्या चेहऱ्यावरचे भाव गंभीर दिसत होते कुणी प्रश्नांकित मुद्रेने पहात होते. तर कुणी कपाळाला हात लावत होते. कोणाच्या तोंडातून च्- - - च् - - -च् अक्षराचे बोल निघत होते. परंतु एवढया गर्दीतसुध्दा एक भयानक शांतता पसरली होती. समोर घडलेला प्रसंग दिसत नसल्याने पायाच्या टाचा उंच उंच करुन माना उंच उंच डोकावून बघण्याचा प्रयत्न चालू होता.  मंदिरही बंद केले होते. माझ्याही मनात एक उत्सुकतेचे पण तितकेच भीतीचे वादळ वाहू लागले. मी गर्दीतून वाट काढत काढत पुढे गेले आणि बघते तर माझे डोळे चक्रावून गेले. एक मृतदेह जमिनीवर निपचित पडला होता. परंतु पोलिसांनी तो पांढऱ्या वस्त्राने झाकून ठेवला होता. त्यामुळे निश्चित ती व्यक्ती कोण असावी हे समजू शकत नव्हते. डोक्याचे केस मात्र दिसत होते. त्यावरुन ती स्त्री आहे याचा अंदाज लागत होता. मी बाजूच्या एक दोन व्यक्तींना विचारले कोणाचा खून झाला आहे...? परंतु त्यांच्याकडूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. मी तशीच गर्दीतून वाट काढत परतीच्या पावलाने पाठी फिरले. या खून प्रकरणात गोवले जाऊ नये म्हणून कुणी कुणाशी बोलत नव्हते. एकदम स्तब्धता होती. पोलीस आपल्या पंचनाम्याची कामगिरी चोख पणे बजावत होते.

मी दुसऱ्या मंदिरात जाऊन पूजा करुन घरी परतले. उशिर तर झालाच होता. पटापट गॅसवर आमटी भाताचा कुकर चढवला. अजून भांडीवाली शकूही आली नव्हती, तिची वाट पहात सोफ्यावर फॅनखाली बसले. जो मृतदेह बघितला तोच डोळयासमोर दिसत होता. बिचारी ती बाई कोण असेल ? कोणी बिचारीचा जीव घेतला असेल... ? तिची मुलंबाळं असतील तर ? उघडयावर

पडतील...! मारणाऱ्याला तरी काही दया माया आहे की नाही....? असे अनेक प्रश्न मला भेडसावू लागले. पेपरमध्ये, टीव्ही वर असे अनेक प्रसंग आपण वाचतो, ऐकतो आणि विसरुनही जातो. कारण आजचा समयही असा आहे की अत्याचाराची बातमी नाही असा वृत्त समाचार होऊच शकत नाही. त्यामुळे त्या हिंसाचारी बातम्या आपल्या अंगवळणी पडून गेल्या आहेत. परंतु तीच घटना आपल्या बाजूच्या परिसरात घडते तेव्हा त्याची तीव्रता जास्त जाणवते. माझ्या मनात असे विचार येता येता कधी डुलकी लागली समजलेच नाही. कुकरच्या शिटीच्या आवाजाने दचकून उठले आणि गॅस बंद केला. "आज शकूला एवढा उशीर का झाला...? अकरा वाजता येणारी शकू, बारा वाजून गेले तरी अजून आली नव्हती....! असा विचार मनात येत नाही तोच दारावरची बेल वाजली. मी दार उघडताच शकू आत आली. आणि म्हणाली "वहिनी, तुम्हाला काही माहित आहे का....? का, काय झाले....? मी प्रश्नांकित मुद्रेने विचारले. "वहिनी, या बाजूच्या सावंत वहिनींच्या बंगल्यात त्यांच्या मुलाला सांभाळणारी सीमाताई दोन दिवस झाले म्हणजे समीरसहित गायब झाली आहे. समीर म्हणजे सावंत वहिनींचा तीन वर्षाचा मुलगा...! अगं हो ऽऽ मीच तर सीमाला तिथे कामाला लावले....! मी ओळखते तिला....! लगेच माझ्या मनात मंदिराजवळचा प्रसंग आठवून शंकेची पाल चुकचुकली. मंदिराजवळ एका स्त्रीचा खून.... आणि.... सीमाचं गायब होणं.... हा विचार येताच माझे मन क्षणभर थरथरले. "नाही ऽऽ असं काही व्हायला नको....! असे म्हणून मी स्वत:ला सावरुन घेतले.

सीमाला मी जवळून ओळखत होते. बिचारी लहानपणापासून गरिबीमुळे तिचे जीवन संघर्षाचे होते. तिचे वडील रिक्षाचालक होते. आई घरकामे करुन घराला हातभार लावत होती. आणि एक छोटा भाऊ अजित कॅन्सरपिडीत होता. रिक्षाच्या भाडयावर साऱ्या परिवारचा खर्च भागवला जात होता. कधी पोटभर जेवण मिळत होते तर कधी अर्धपोटी रहावे लागत होते. सीमा

फार हुशार आणि सुशील मुलगी होती. घरातील सर्व काम करुन शाळा शिकत होती. आमची जुनी चाळ होती त्या चाळीच्या बाजूच्याच चाळीत सीमा रहात होती. परंतु आम्ही ती रुम विकून फ्लॅटमध्ये राहायला आलो होतो. त्यामुळे या सहा महिन्यात तिच्याशी संपर्क आला नव्हता. तरी बाजूच्या सावंत वहिनींच्या बंगल्यात त्यांच्या समीरला सांभाळण्याचे काम करीत होती म्हणून कधी मधी भेटली तर मी तिची विचारपूस करत होते. सावंत वहिनींचा बंगलाही फार मोठा आणि कंपाऊंडची भिंतही फार उंच असल्याने त्यांच्याशी संपर्क होत नव्हता. परंतु आज बंगल्यामध्ये आजूबाजूच्या जाणाऱ्या येणाऱ्यांची चाहूल लागत होती. त्या कारणाने तर शकू, समीर आणि सीमाविषयी बोलत होती. काय भानगड आहे काही समजत नव्हते म्हणून मी शेजारधर्म म्हणून माणुसकीच्या नात्याने समीरच्या आईला भेटायला बंगल्यात गेले. आणि दोन पोलीस गेटवर उभे होते. त्यांनी जरा सांशक नजरेनेच माझ्याकडे बघितले. मी खालच्या नजरेनेच बंगल्यात शिरले. काही आजूबाजूचे शेजारीही आलेले होते. त्यातील एकीने माझ्या कानात सांगितले की सीमा समीरला घेऊन मंदिराकडे फिरायला गेली होती. सीमाचा खून झाला आहे आणि समीर गायब झाला आहे, यावरुन मला सकाळचा मंदिराजवळचा प्रसंग नजरेसमोर आला. म्हणजे ती सीमाच होती या कल्पनेने माझे हात-पाय थरथरु लागले. मी मनात म्हटले सीमाचा खून झाला, मग समीर कुठे गेला...? त्याला कुणी किडनॅप तर केले नाही...? हा खून किडनॅपिंगसाठी तर झाला नाही....? असे उलटे सुलटे प्रश्न पुढे येऊ लागले. मी समीरच्या आईचा हात पकडून तिचे सांत्वन केले आणि धीर देण्याचा प्रयत्न करु लागले. “वहिनी, हिमतीने घ्या, समीरला काही होणार नाही, तो सुखरुप परत मिळेल!” परंतु समीरच्या आईचा आक्रोश थांबत नव्हता. कितीही झालं तरी ती आई होती. तिच्या काळजाचा तुकडा तिच्यापासून दूर झाला होता.

मी घरी परतले तोपर्यंत शकू काम करुन निघून गेली होती. माझे मन अस्वस्थ झाले होते. दुपारचा दीड वाजला होता. परंतु जेवायची इच्छा होत नव्हती. सारखी सारखी सीमा नजरेसमोर येत होती. समीरचं काय झालं असेल…? या विचाराने मन चलबिचल होत होती. बिचारी सीमा, तिचा शेवट अशाप्रकारे व्हायला नको होता. नुकतीच उमलणारी कळी एका हवेच्या झोक्याने चिरडून गेली तिच्या आयुष्यात तिला सुख म्हणजे काय…? या गोष्टीची कल्पनाच नव्हती. तिचे बाबा रिक्षाचालक होते. म्हणून तुटपुंज्या पैशात घर चालत होते. त्यातच अचानक एक दिवस रिक्षा अपघातात तिचे बाबा देवाघरी गेले. घरचा कर्ता माणूस गेला आणि थोडीफार होणारी कमाई, ती सुध्दा संपली. सीमाला व अजितला नाईलाजाने शाळा सोडावी लागली. घराला दारिद्रयाची अवकळा आली. त्यामुळे सीमा आईला हातभार लावण्यास तिच्याबरोबर कामाला जाऊ लागली. जेमतेम सीमाचे शिक्षण नववीपर्यंत झाले होते. सीमाचा छोटा भाऊ अजित कॅन्सर झाल्यामुळे सातवीपर्यंत येऊन शिक्षण थांबले गेले. तो वारंवार आजारीच असायचा. त्याच्यावर वैद्यकीय उपाय करण्यास परिस्थिती समर्थ नव्हती. आई सुध्दा परिस्थितीने गांजलेली धुण्या-भांडीची कामे करुन अशक्त झाली होती. त्यामुळे परिवाराची संपूर्ण जबाबदारी सीमावर पडली होती. सीमा दिवसभर काम करुनही घरचा खर्च भागवू शकत नव्हती. त्यातून अजितची औषधं आणायची म्हणजे सीमाला जबाबदारी बरीच भारी होत होती. अशा परिस्थितीत सीमाला मदत करणारी तिची मैत्रिण म्हणजे रेखा…! ती एक बार डान्सर होती. ती सुध्दा नाईलाजास्तव या लाईनला गेली. वय लहान होते आणि जबाबदारी फार मोठी होती. आपल्या लहान भाऊं-बहिणीचे शिक्षण आणि डोळ्याने अधू असलेली आई. रेखाला शिक्षणाची आवड होती परंतु आपल्या लहान भावंडाच्या शिक्षणासाठी स्वत:चे शिक्षण सोडून कमाई करु लागली. रेखाचेही वय लहान होते म्हणून त्यावेळी ज्यांनी जो रस्ता दाखवला तो रस्ता पकडून आपल्या परिवाराची जबाबदारी सांभाळू लागली. कमाई येत होती. परंतु चांगल्या-वाईटाची समज नव्हती. कोवळे वय होते परंतु सीमा ही समजूतदार होती सुशील

तसेच हुशार होती. रेखाने सुध्दा सीमाला आपल्या ठिकाणी कामासाठी बोलविले होते. तरी सीमा आपल्या बाबांच्या मताशी सहमत होती. तिचे बाबा जिवंत नव्हते परंतु त्यांचे दिलेले संस्कार जिवंत होते. ते संस्कार घेऊनच सीमा आपल्या जीवनाची वाटचाल करत होती. दिवस जात होते. सीमाच्या आईचा खोकला खूपच बळावत चालला होता. तर अजितची सुध्दा तब्येत बरीच खालावत चाललेली होती. डॉक्टरांनी तर त्याला पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले होते. परंतु सीमाची अवस्था बघून अजितला स्थिर बसवत नव्हते. कुठेतरी आपल्यालाही काम करायला हवे या विचाराने तो मित्राकडे जातो असे कारण सांगून काम शोधायला जात असे. दोन चार दिवसात अजितला एका दुकानात मालाच्या आलेल्या गोण्या उचलून दुकानात ठेवण्याचे काम मिळाले होते. त्याने तीन-चार महिने काम केले असेल त्याच्या पगारात त्याचा औषधाचा खर्च निघत होता. परंतु अजितला तीन-चार महिन्यांनी अशक्तपणा जाणवू लागला. म्हणून त्याने दुकानाच्या मालकाला सांगून आठ दिवसांची रजा घेऊन विश्रांती घेतली. आणि पुन्हा तो कामावर रुजू झाला होता. दोन दिवस काम करुन होत नाही तोच तो कामावर चक्कर येऊन बेशुध्द पडला. दुकान मालकाने अजितच्या घरी येऊन सीमा व त्याच्या आईला घेऊन अजितला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. वजनदार कामे करायची नाहीत असे डॉक्टरने सांगूनही अजयने मेहनतीचे काम केले. अशक्तपणामुळे तो बेशुध्द झाला असे डॉक्टरांचे म्हणणे होते. अजितला विश्रांतीची अत्यंत गरज होती. हॉस्पिटलचे बिलही दुकानदार मालकाने दिले नव्हते. परंतु सीमाची मैत्रिण रेखा आणि मी दोघी मिळून बिल चुकते केले परंतु त्यावेळेपासून अजित जास्तच खालावत गेला होता. त्यामुळे बेडवर झोपूनच रहात होता. सीमासमोर काय करावे याचे मोठे प्रश्नचिन्ह उभे होते. सीमालाही नेहमी दुसऱ्यांकडून पैशाची मदत घेणे योग्य वाटत नव्हते. त्यावेळेपासून तिला आपल्या गरिब परिस्थितीची कीव येऊ लागली. तिला शिक्षणाचे महत्व समजू लागले. शिक्षणाच्या अभावाने किती लाचारीची कामे करावी लागतात याची उमज आली. परंतु गरिबीमुळे सीमा हतबल झाली होती.

मी कसेबसे जेवण उरकले आणि जराशी वामकुक्षी घ्यावी म्हणून जरा आडवी झाले. पेपर वाचता वाचता थोडा फार डोळा लागला तेवढयात दारावरची बेल वाजली आणि मी जागी झाले. घडयाळाकडे लक्ष गेले तर संध्याकाळचे साडेपाच झाले होते. दार उघडले तर शेजारच्या शैलावहिनी दारात उभ्या होत्या. “वहिनी, आज भाजीला जायचे नाही का....?” शैला वहिनी केस विंचरत विंचरत म्हणाल्या. जायचंय नं, जरा उशिराच जेवण झाल्याने झोपायला उशिर झाला! मी लगेचच तयार होउन शैलावहिनींबरोबर बाजारात गेले. रस्त्यात आमचा सीमाचाच विषय चालू झाला तेव्हा त्या हळू आवाजात म्हणाल्या की समीरला पोलीस घेऊन आले. परंतु कसा काय मिळाला या विषयी काही समजले नाही....! “काय म्हणता, समीर मिळाला....! म्हणजे देव पावला....! नाहीतर सावंत वहिनींनी आपली काय अवस्था करुन घेतली हो ऽऽऽऽ, बघवत नव्हती त्यांची हालत...! मला वाटलेच होते की समीर मिळेल. कारण किडनॅपिंग कडून काही फोन वगैरे आला नव्हता. आणि या छोटया मुलाला मारुन कुणाला काय मिळणार होते...? नाही का हो वहिनी....? हो ऽऽ नं” असे शैलावहिनी भाजी घेत घेत बोलत होत्या. आम्ही दोघी भाजी घेऊन घरी परतत होतो. चालता चालता त्या मंदिराकडे नजर गेली. परंतु सकाळच्या प्रसंगाची काहीही चिन्हं नजरेस पडत नव्हती. रोजच्या प्रमाणे मंदिरात भाविकांची रहदारी सुरु झाली होती. लोकं आपपल्या कामात व्यस्त झाली होती आम्ही दोघी बोलत बोलत सोसायटीच्या गार्डन पर्यंत आलो. वाटले थोडे थंडगार वाऱ्यावर बसावे म्हणून मी व शैलावहिनी गार्डनमध्ये बसलो. आमच्या बाजूलाच दोन तीन सोसायटीच्या बायका सीमा प्रकरणाविषयीच चर्चा करत होत्या. त्यांच्या चर्चेतून हेच समजले की सीमा समीरला घेऊन मंदिराच्या गार्डनमध्ये गेली होती. समीरला खेळवण्यासाठीच ती तिथे गेली होती. सीमा बसली होती त्या बाजूलाच एक वृध्द जोडपे बेंचवर बसले होते. समीर खेळता खेळता त्या वृध्द जोडप्याशी मिसळून गेला. “आजी ऽऽ आजी म्हणून तो त्यांच्या मांडीवर बसून खेळत होता. अचानक सीमा त्या जोडप्याला म्हणाली “आजी, मी जरा पाच मिनिटात जाऊन येते, जरा

समीरला बघाल का... ?" जा ऽऽ परंतु लवकर ये हं का...! आम्हालाही निघायचे आहे....! सीमा लगेच तिथून निघून गेली. सीमा जाऊन अर्धा तास निघून गेला तरी ती परत आली नव्हती. आजी आजोबा वाट पहातच होते वेळ पुढे पुढे सरकत होती. सूर्यास्त होऊन गेला होता. अंधार दाटून येऊ लागला होता. सीमाचा काही पत्ता नव्हता. आजी आजोबांना काय करावे काही समजत नव्हते. ते रात्र झाली तरी त्याच ठिकाणी बेंचवर बसून होते शेवटी आजोबा आजीला म्हणाले "आपण या गार्डनच्या वॉचमनला विचारुन बघूया....!" म्हणून ते समीरला घेऊन वॉचमनकडे गेले. आजोबांनी त्याला आपल्या कापऱ्या आवाजात विचारले "एक बाई या मुलाला आमच्याकडे सोडून गेली या मुलाला तुम्ही ओळखता का... ? वॉचमन काही तरी लिहिण्याच्या कामात व्यस्त होता म्हणून त्याने "मी कोणाला ओळखत नाही....! असे उडवाउडवीचे उत्तर दिले. ते बघून आणि रात्रही झाली होती म्हणून त्यांनी समीरला आपल्या घरी आणले. कारण ते सीमालाही ओळखत नव्हते किंवा समीरलाही ओळखत नव्हते. शेवटी त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन सर्व हकिकत सांगितली. तेव्हा पोलीसांनी पंचनाम्यात काढलेला सीमाचा फोटो दाखवला आणि आजी आजोबां कडून सीमाची ओळख पटली. आणि पोलीसांनी समीरला त्याच्या आईच्या हाती सुपूर्त केले.

काळोख झाला होता म्हणून मी व शैलावहिनी आम्ही उठून घरी परतलो. तो पर्यंत माझा मुलगा अविनाश ऑफिसमधून घरी आला होता. त्याला या प्रसंगाची काहीच कल्पना नव्हती. म्हणून आल्या आल्या मला तो म्हणाला "आई, आज भाजी आणायला एवढया उशिरा गेलीस... ?" नाही रे ऽऽ जरा गार्डनमध्ये बसले होते...! हं, तुमचं महिला मंडळ जमलं असेल नं...! मग आज कोणत्या विषयावर चर्चा चालू होती... ? अवी मला हसत हसत चिडवून बोलत होता. मी अवीला सीमा विषयी सर्व सांगितले. अवी सुध्दा एकदम गंभीर झाला. अवी आणि सीमा एकत्र खेळलेले. अवीची शाळेची पुस्तकं सीमाला मी देत होते. सीमा अभ्यासात हुशार होती. जर शिकली असती

तर नाव काढले असते. परंतु परिस्थिती अशी होती की शिक्षण करावे तर कमाई नाही. तिच्या परिवाराला कुणाचा आधार नव्हता. पोटापाण्याचा प्रश्न होता. सीमाच्या नशिबाचं घोंगडं चारी बाजूने फाटलेलं होतं. कुठून कुठून शिवणार...? अखेर तिला शिक्षण सोडायची वेळ आली होती.

आता अजितची अवस्था बघवत नव्हती. त्याच्या डोळ्याभोवतालची वर्तुळं काळी पडली होती. गालफडं बसून गेली होती. गळयाची हाडं वर आली होती. अजितला योग्य त्या वैद्यकीय उपचाराची गरज होती. त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्याची वेळ आली होती. सीमाची आई सीमाला रेखाच्या ठिकाणी काम करण्यास मागे लागली होती. "ही कपडे-भांडयाची कामं सोड आणि रेखाबरोबर जा, तर आपण अजितचा औषधोपचार करु शकतो....!" परंतु रेखा कुठे काम करते याची सीमाच्या आईला कल्पना नव्हती. तिला एवढेच माहित होते कि रेखा नर्स म्हणून हॉस्पिटलमध्ये नाईट डयूटी करते. सीमाला आपल्या घरची परिस्थिती बघून रेखाबरोबर जाण्याचे मनात यायचे. परंतु तिच्या बाबांनी दिलेले संस्कार मागे खेचत होते. मला सीमा नेहमी म्हणायची "आंटी, मला शिकायचे आहे डॉक्टर बनून गरिबांची सेवा करायची आहे...!" हो ऽऽ हो का नाही बनणार डॉक्टर ...? जरुर तू डॉक्टर बनशील...! कारण सीमाने शाळेत असताना कधी पहिला नंबर सोडला नव्हता. कधी कधी तर अविपेक्षाही तिला जास्त मार्कस् मिळत होते. परंतु तिचे नशिबाचे पारडे उलटेच पडले होते. अजितच्या उपचारासाठी सीमा रेखाच्या घरी गेली. "सीमा तू ऽऽ ये नं, आत ये नं...! सीमा जरा संकोचतच घरात शिरली. सीमाला काय बोलावे काही समजत नव्हते. घरात तिची तापामुळे अंधत्व आलेली आई होती. तिचा लहान भाऊ उमेश आणि एक लहान बहिण नंदा शाळेत शिकत होते. रेखा आपल्या परिवाराचा सर्व खर्च सांभाळत होती. रेखा लहान असतानाच वडील हार्ट ॲटॅक ने स्वर्गवासी झाले होते. त्यामुळे सीमा प्रमाणेच रेखालाही शिक्षण सोडावे लागले होते. परंतु आपल्या भावंडांना खूप शिकवायचे ही तिची इच्छा होती. म्हूणनच तिने

त्यावेळेला जे काम मिळाले ते पकडले. अर्थात बारमध्ये डान्सरचे काम पत्करले. तिची इच्छा नसताना शिक्षणाच्या अभावी आणि घरची परिवाराची जबाबदारी मोठी असल्याने आपल्या भावंडांसाठी ती बारमध्ये जाऊ लागली. सीमाचीही स्थिती तीच होती. तरी सीमा समजून होती. बारमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांची समाजात काही इज्जत रहात नाही. समाज एखाद्या डोमकावळ्या प्रमाणे तिरक्या नजरेने बघत असतो. परंतु सीमाचे दुसरे मन ग्वाही देत होते कि मी आज मेहनतीचे काम करुनही मला त्याच समाजाची मदत वा सहानुभूती कुठे आहे...? आपण कसेही वागा हाच समाज सरडया प्रमाणे रंग बदलत असतो. एवढयात रेखा ओरडली, “सीमा कसला एवढा विचार करतेस...? सीमा दचकूनच रेखाकडे पहात राहिली. “सीमा, सर्व ठीक आहे नं...? अजित आणि आंटीची तब्येत कशी आहे...? रेखाच्या आपुलकीने सीमाच्या डोळ्यातून अश्रू आले. त्याबरोबर रेखाने सीमाला जवळ घेऊन डोक्यावरुन हात फिरवून गोंजारले ते एका मोठया बहिणीप्रमाणे. रेखा सीमा पेक्षा दोन वर्षांने मोठी होती. सीमाला रेखाचा फार मोठा आधार होता आपल्या सुख-दु:खाच्या गोष्टी ती रेखा जवळच उघड करत होती. मन मोकळे करत होती. म्हणूनच हक्काने ती रेखाकडे आली होती. परंतु रेखा जवळ बोलायला हिम्मत होत नव्हती तितक्यातच रेखा सीमासाठी चहा बनवण्यास किचनमध्ये गेली. रेखाची आई सीमाकडे खुशाली विचारत होती. बोलता बोलता ती रेखा विषयी बोलत होती. “आमची रेखा आहे म्हणून आमची गृहस्थी चालली आहे. बिचारी रात्रभर हॉस्पिटलमध्ये नाईट ड्युटी करते पुन्हा घरी येऊन घरातलं सांभाळते. मला मेलीला नीटसं दिसत नाही म्हणून तिला काही मदत करता येत नाही आता डोळयाचेही ऑपरेशन करायचे आहे...!” रेखा च्या आईच्या बोलण्यावरुन समजत होते कि तिला सुध्दा रेखा कुठे काम करते हे माहित नव्हते. रेखा हातात चहाचा ट्रे घेऊन आली. सीमा आणि रेखा दोघींनीही गप्पा मारत चहा घेतला परंतु सीमाला रेखा जवळ जे बोलायचे होते ते बोलण्याचे धाडस झाले नाही. तेव्हा थोडया वेळाने रेखानेच सीमाला विचारले “आज काम सोडून कशी काय आलीस, कामाला सुट्टी घेतली आहेस

का....?” नाही गं ऽऽऽ सहजच मी आले ! आज जरा काम कमी होते म्हणून म्हटले रेखाला भेटून यावे तसे बघितल्यास आपल्याला भेटायला कुठे मिळते...? तू घरी असतेस तेव्हा मी कामावर असते. तर मी घरी असते तेव्हा तू कामावर असतेस...! असे म्हणून सीमा ने रेखाचा हात हातात घेत दोघीही एकमेकांकडे बघत हसू लागल्या. दोघींनाही एकमेकींचाच आधार होता. “रेखा, मी विचार करते कि दुसरीकडे कुठेतरी काम पकडीन म्हणजे जरा पगार जास्त मिळेल ....!” सीमा जरा दबकतच म्हणाली. अगं रेखा, सीमाला तुझ्या ठिकाणी कामाला का लावत नाहीस ...? तिच्यासाठी जरा बघ...! रेखाची आई भोळेपणाने म्हणाली. खरंच्, आपण आपल्या आईची किती फसवणूक करतो याची सीमाला व रेखाला जाणीव होत होती. त्याबरोबर खंतही वाटत होती. परंतु नाईलाज होता तेवढयात सीमा उठली आणि म्हणाली चल रेखा, मी आता निघते, आपण पुन्हा कधी भेटून बोलूया...! लगेच रेखाने पर्स उघडून पाचशे रुपयाची नोट सीमाच्या हातात जबरदस्तीने दाबली, आणि म्हणाली राहू दे, उपयोगी पडतील....! असे म्हणून रेखा सीमाला सोडायला बाहेर दरवाजात आली. काही न बोलता सीमा तिथून निघून कपडे-भांडीचे काम करायला गेली. परंतु रेखा सीमाच्या पाठमोऱ्या छबीकडे एकटक पहात विचार करु लागली, “बिचारी सीमा, हिच्यासाठी मी काय करु...? कुठे काम शोधू.....?” डान्स बारमध्ये सीमा ने काम करु नये, माझे तर आयुष्य फुकट गेले परंतु सीमाचे तसे व्हायला नको असे रेखालाही वाटत होते. शिक्षणाच्या अभावी सर्व बाजू तोकडया पडत होत्या कारण शिक्षण नाही तर पैसा जास्त कुठून मिळणार...? सीमाचे वयही अठरा वर्ष पूर्ण नव्हते.

मला सीमाची दया येत होती. परंतु माझ्याकडूनही मी तिची पूर्ण जबाबदारी घेऊ शकत नव्हते. तरी तिला अडीअडचणीला मी मदत करत होते. सीमा खडतर परिस्थितीला तोंड देत होती. त्यामानाने ती फार लहान होती दिसायलाही सुंदर होती त्यामुळे गरिबीमधील तारुण्य सांभाळायला

डोक्यावरील तलवारच म्हणायची. गरिबीचा फायदा उठवून स्त्री जातीचा फायदा उठवणारे या समाजात कमी नाहीत...! असाच एक मला प्रसंग आठवतो. सीमाची आई तीन-चार दिवस तापाने आजारी होती. म्हणून आईच्या कामाच्या ठिकाणी सीमाच काम करुन यायची. एक दिवस काम करुन घरी येते तोच आईकडे नजर गेली. आई तापात काही विचित्रपणे बडबडत होती. सीमाने कपाळावर हात ठेवला तर आईचे अंग तापाने एकदम गरम झाले होते. ताप डोक्यात चढेल म्हणून सीमाने लगेच मिठाच्या पाण्याची पट्टी ठेवली. ताप उतरेपर्यंत सीमा आईच्या उशाशीच बसून होती. मिठाच्या पाण्याच्या पट्टया बदलतच होती. अर्ध्या तासाने ताप उतरला तेव्हा डॉक्टरकडे औषध घ्यायला म्हणून बाहेर पडली. पर्समध्ये बघते तर पंधरा रुपयेच होते. आता काय करायचे? असे म्हणून जिथे काम करते तिथे इंदू काकींकडे जाण्यास निघाली. काकींकडून पैसे घेऊन औषध आणूया असे म्हणून ती इंदूकाकींकडे आली दरवाजा बंद होता. दारावरची बेल दाबली तेवढयात काकींचा मुलगा सुहासने दार उघडले. “काकी आहेत का...? अऽऽ होऽ हो आई नं....? आई आहे नं आतमध्ये...!” असे म्हणून सीमाला त्याने आत घेतले आणि दरवाजा बंद केला. सुहास कॉलेज मधला एक टपोरी मुलगा होता. मुलींची छेड काढणं, त्यांना लग्नाचं आमिष दाखवून लैंगिक सबंध ठेवणं या सर्व वाईट सवयी असलेला हा मुलगा, त्याची सीमा वर नजर असणं हे चूकू शकणार नाही. परंतु त्याला तसा मौका मिळत नव्हता आणि सीमा घरात आल्याबरोबर तो मौका त्याने सोडला नाही. त्याने पाठीमागून लगेच सीमाला पकडले आणि तिला मिठीत घेतले. त्याबरोबर सीमा घाबरली आणि तिने त्याच्या मिठीतून सुटण्यासाठी हिम्मत करुन जोरात दोन तीन थोबाडीत मारुन दरवाजाकडे धावली. परंतु दरवाजाला आतून कडी लावली असल्याने सीमाला बाहेर पळता आले नाही. परंतु सीमा काकीऽऽऽ काकी म्हणून ओरडू लागली तेवढयात दारावरची बेल वाजली. सुहासने दार उघडले. काकी आत आल्या परंतु सुहासने काही झाले असे दाखविले नाही. तरी इंदूकाकींनी सीमाचा आवाज ऐकला होता त्यांनी सीमाकडे बघितले. परंतु सीमा ओशाळवाणी

होऊन खाली मान घालून घाबरलेल्या मनस्थितीत उभी होती. हा सारा प्रकार बघून इंदूकाकींनी सुहासच्या थोबाडीत जोरात एकच लगावून दिली. इंदूकाकींनी सीमाला जवळ घेतली आणि सुहासकडे रागात बघत राहिल्या. सुहासही खुन्नस पणे सीमाकडे पहात होता. “अशी एकटी कधी कुणाकडे जात जाऊ नकोस...! कशासाठी आली होतीस...? आईची तब्येत कशी आहे...?” तेव्हा सीमा डोळ्यातील पाणी पुसत पुसत म्हणाली, “आईला ताप जास्त आहे त्यासाठी मी औषधाला पैसे मागायला आले होते...!” लगेच कपाटातून पाचशे रुपये काढून सीमाला दिले. सीमाला फार उशीर झाला होता म्हणून धावत धावत जाऊन डॉक्टर कडून आपल्या आईला औषध आणले. लगेच आईसाठी तांदळाची पेज बनवून तिला भरवली आणि नंतर औषधाचा डोस दिला. थोडया वेळाने आई शांत झोपली. परंतु सुहास कडून झालेल्या अश्लील कृत्याची आठवण डोळ्यासमोर येत होती. त्या आठवणीने सीमाचे मन थरथरत होते. ही गोष्ट ती आईला सांगणार नव्हती. परंतु संध्याकाळी आईचा ताप उतरल्याबरोबर भाजी आणायच्या निमित्ताने माझ्याकडे आली आणि सकाळच्या प्रसंगाची गोष्ट मला सांगितली. तिचे मन हलके करण्यासाठी मी तिचे सांत्वन केले. आणि त्याचबरोबर जागृकतेविषयी तिला काही गोष्टी समजावल्या. त्या दिवशी सीमा थोडक्यात वाचली होती. या गोष्टीचा सुहास कडून अतिरेक झाला असता तर सीमाचं आयुष्य फुकट गेलं असतं. त्यावेळी इंदूकाकी आल्या म्हणून सीमा वाचली गेली होती. तसे सुहास मवाली जातीचा मुलगा होता. सीमाने आणि सीमाच्या पुढयात सुहासला इंदूकाकींनी मारलेली थप्पड याचे पुढे काय स्वरुप होईल हे सांगता येण्यासारखे नाही. कारण सुहास याचा आज ना उद्या बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. सुहास आई-वडिलांना सुध्दा जुमानणारा मुलगा नव्हता.

हळू हळू सीमा समजदार बनत होती. तिला तिच्या जीवनातले प्रसंग जीवनाचा अनुभव देत होते. तिची मैत्रिण रेखा, तिचे जीवन आणि आपले जीवन यातून तिला जीवनाची सत्यता कळून येत

होती. त्यामुळे आपण काही केले पाहिजे या विचाराने ती अस्वस्थ होत होती. अशा चलबिचल अवस्थेत ती एक दिवस माझ्याकडे आली आणि तिने आपल्या मनातील ऊलाघाल माझ्यापुढे मोकळी केली. तेव्हा मी तिला शिवण क्लास करण्याचा सल्ला दिला. मी स्वत: तिला घेऊन तिची क्लास फीज भरली. इतर कपडयाचा वगैरे खर्चही केला. सीमा आपल्या कामातून वेळ काढून शिवण क्लासला जाऊ लागली. हळू हळू तिला कपडे शिवण्याचे ज्ञान अवगत होऊ लागले. मी तिला शिलाई मशिन घेऊन दिली. हळू हळू तिने कपडे शिवण्यास सुरूवात केली. तसतसे तिला बाहेरील कपडे शिवण्यासाठी येऊ लागले. त्याबरोबर तिची कमाई सुध्दा वाढू लागली. छोटया भावाचा औषधाचा खर्च ती निभावू लागली. घरात दोन वेळचे जेवणही पोटभर मिळू लागले. आपल्या आईचाही औषधोपचार  थोडाफार सावरु लागली. शिलाईमध्ये तिचा जम बसत चालला होता. सीमा खुशीत होती. एक दोन वर्षात तिने घराला बरंच सावरलं होतं. परंतु नशिबाला ते मंजूर नव्हते. एक दिवस सीमा आपल्या आईबरोबर कामाला गेली होती. सीमाचा छोटा भाऊ अजितही बाहेर गेला होता. देवाला लावलेले निरांजन उंदरामुळे खाली टेबलावर शिरुन ठेवलेल्या कपडयांवर पडले. आणि हळू हळू कपडयाला आग पकडून सारे कपडे जळून खाक झाले. हे जेव्हा सीमाने घरी येऊन बघितले तेव्हा सीमा चक्कर येऊन खाली कोसळली. सीमाला फार मोठा धक्काच बसला होता. पाणी मारुन सीमाला शुध्दीवर आणले. सीमाची आई सुध्दा डोक्याला हात लावून खाली बसली होती. आजूबाजूचे सर्व जमा झाले होते. त्यांनीच सीमा व तिच्या आईला धीर दिला. परंतु झालेल्या नुकसानीची भरपाई कशी करायची हा फार मोठा प्रश्न सीमाच्या समोर उभा राहिला होता. दहा पंधरा घरचे कपडे शिवायला आलेले होते. आता कमाई बाजूलाच परंतु कर्ज चुकते करण्याची वेळ आली होती. जवळ जवळ तीन-चार हजारापर्यंतचे कर्ज झाले होते. एवढे पैसे कुणाकडून घेणार... ? आणि माझ्या सारखीला कोण देणार... ? असे विचार सीमाला चलबिचल करत होते. ज्यांचे कपडे शिवायला आले होते त्यांच्या सारख्या फेऱ्या होत होत्या आणि पैशाची मागणी करत

होते. सीमा कसेबसे त्यांचे समाधान करत होती. कपडे जळणाऱ्या घटनेपासून कुणी कपडे शिवण्यास येत नव्हते. सीमाचा जम बसत असलेला उद्योग बंद होऊन गेला. मदत करण्याचे बाजूलाच राहिले. परंतु रोज रोज येऊन पैसे मागत होते. पुन्हा घरची अवस्था पूर्ववत झाली. भांडी कपडे करुन आलेल्या पैशातून ती लोकांचे कपडयांचे पैसे चुकते करत होती. त्यामुळे हातात काहीच उरत नव्हते. कधी लाईट बील भरले जात नव्हते तर कधी घराचे भाडे बाकी रहायचे, तर कधी रेशन दुकानाचे पैसे कमी पडायचे.

खुनाची घटना होऊन दोन दिवस झाले होते पोलीसांचे सावंत वहिनींच्या बंगल्यात येणे जाणे होत होते. चौकशीचे काम चालू होते. परंतु सीमाचा खून कोणी केला या गोष्टीचा तपास लागला नव्हता. सीमा सारखी सारखी माझ्या डोळयासमोर दिसत होती. कारण मी तिला लहानपणापासून बघत आले होते. तिचे बालपण माझ्या डोळ्यासमोर खेळले गेले होते. दुपारची अकराची वेळ होती. एवढे जास्ती काही वाजले नव्हते. परंतु बारा-एक वाजल्यासारखे ऊन पसरलेले होते. उकाडा होत होता. म्हणून मी वाऱ्यावर घटकाभर खिडकीत येऊन बसले होते. तेवढयात दोन पोलीस आणि सावंत वहिंनीचे मिस्टर संजयभाऊ यांना जीपमध्ये बसताना बघितले. मी बारकाईने बघतच राहिले. ते संजयभाऊच होते नं...? मनाला खात्री पटत नव्हती. संजय भाऊंना पोलीस का घेऊन गेले असावे....? त्यांनी तर सीमाचा खून केला नसेल...? कारण सीमा त्यांच्या समीरला सांभाळण्याचे काम करत होती. काहीतरी आपसात वादविवाद असू शकतील...! साहजिकच संशय येण्यासारखी स्थिती होती. अशा सांशक विचाराने माझ्या मनात संजय भाऊंविषयी संशयाने घर केले. लगेच मी उठून शैला वहिनींकडे गेले आणि बघितलेला प्रसंग त्यांना सांगितला. तेव्हा शैला वहिनी कमरेला पदर खोचत म्हणाल्या "हो, मला माहित आहे...! त्यांना बलात्काराच्या संशयावरुन पोलीसांनी पकडून घेऊन गेले...!" "काय म्हणता काय...? हे नविनच ऐकते

होऽऽऽ” मी म्हणाले. “काय सांगायचं वहिनी, पंचनाम्यात सीमा तीन महिन्यांची गरोदर होती असे कळले आहे! याच संशयावरुन संजय भाऊंना अटक केली गेली. शैला वहिनी जरा मोठया गोष्टीचा शोध लावला अशा आविर्भावात बोलत होत्या. मी जास्तच गोंधळात पडले. सीमा अशी मुलगी नव्हती. निश्चित संजयभाऊंनी जबरदस्ती केली असणार...! हे पैसेवाले लोक असेच असतात. त्यांना वाटतं कि आपण पैशानं सर्व काही विकत घेऊ शकतो...! एवढयात शकू बोलवायला आली म्हणून मी उठून घरी आले. माझ्या मनात पुन्हा विचार घूमू लागले. खरंच्, सीमाने किती सहन केलं, आपल्या चारित्र्याला शेवटपर्यंत सांभाळण्याचा प्रयत्न केला तरी सुध्दा शेवटी या समाजातील नराधमानी तिला सोडले नाही. शिक्षणाचा अभाव त्यात ती गरिबी त्यातून उमलणारे यौवन या त्रिकोणाच्या तीन कोनात अडकलेली स्त्री वासनेने बरबटलेल्या नराधमाच्या बलात्काराला बळी पडते. स्त्री चा सन्मानाने जगण्याचा अधिकार हिसकावून घेते. तिच्या कमजोरीचा फायदा उठविण्यास उताविळ झालेले असतात. सीमाच्या जीवनात पहिला इंदूकाकींचा सुहास आला होता. त्याच्यापासून तिने आपले शील सांभाळले होते. सीमाची मैत्रिण रेखा होती म्हणून सीमाला थोडीफार मदत मिळत होती. रेखा आपल्या आयुष्याची पर्वा न करता ती परिवारासाठी झुंज देत होती. रेखाची भावंड हळू हळू मोठी होत होती. दोघही आभ्यासात हुशार होती. आता रेखाला चिंता भेडसावू लागली होती कि जर मी काय काम करते हे माझ्या भावंडाना समजले तर काय होईल...? ते माझा तिरस्कार करतील. त्यांचे शिक्षण पूर्ण होऊन आपल्या पायावर उभे रहात नाही तोपर्यंत तरी त्यांना माझ्या विषयी काही कळू नये असे रेखाला मनापासून वाटत होते. आईच्या डोळ्याच्या ऑपरेशनचेही टेंशन होतेच तरी कधी कधी विषय निघत होताच कि “ताई, आईच्या डोळ्याचे ऑपरेशन तुझ्याच हॉस्पिटलमध्ये कर म्हणजे तुला आईकडे लक्ष द्यायला सोपे जाईल. शिवाय कन्सेशनमध्ये होऊन जाईल...! असे रेखाला छोटी बहिण नंदा म्हणत असायची. या गोष्टीने रेखाला टेंशन आले होते. असे बरेच प्रसंग आले होते कि कधी मधी रात्रीच्या वेळी रेखाची जरुरत

पडायची. कधी आईची तब्येत बिघडून जायची तर कधी छोटया भावाची तब्येत बिघडायची. तेव्हा नंदा रेखाकडे फोन नंबर मागायची. परंतु रेखा टाळाटाळ करुन विषय बदलून टाकायची. नंदा व उमेश सातवी-आठवीला होते. त्यामुळे नंदाला थोडी फार समज यायला लागली होती. उमेश मात्र अजूनही नादान वृत्तीचा होता. रेखाचे वडिल गवंड्याचे काम करत होते. ते हार्टअॅटॅक येऊन अर्धा संसार सोडून स्वर्गवासी झाले. त्याच वेळेला वडिलांच्या आकस्मिक मृत्यूमुळे घराचे भाडे तुंबलेले होते. घर मालक येऊन त्रास देऊ लागला होता. किराणा दुकानाचे पैसे बाकी होते. अशा स्थितीत कुणाचा आधार नव्हता. त्यावेळी तिच्या बाबांच्या मृत्यूच्या धक्क्याने आई आजारी पडली. ताप डोक्यात चढून नजर अधू झाली. रेखा ही तशी लहान होती. नुकतीच तारुण्याच्या उंबरठयावर फुलणारी एक नाजूक कळी होती. अचानक अंगावर पडलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी रेखा एका ओळखीच्या मुलीबरोबर डान्स बारमध्ये गेली. त्या मुलीला डान्स करुन मिळालेली कमाई बघून रेखा लालचमध्ये आली आणि रोज ती बारमध्ये जाऊ लागली. हळू हळू डान्सचे तिला ज्ञान मिळू लागले. डान्समध्ये ती प्रविण होत गेली तसतशी तिची कमाई होऊ लागली. त्याच कमाईवर ती आपल्या परिवाराचा सांभाळ करु लागली होती. नवीन नवीन तिलाही संकोच वाटत होता. परंतु म्हणतात न कि गरिबी माणसाला काय काय करायला लावेल हे सांगता येत नाही. रेखा सुरवातीला चोरुन चोरुन जायची. निराधार, शिक्षणाचा अभाव, गरिबी यामुळेच रेखाला हा रस्ता पकडण्यास नाईलाज झाला. बारमध्ये रेखालाही अनेक अश्लील प्रसंगाला तोंड द्यावे लागले होते. बारमध्ये अनेक प्रकारच्या व्यक्ती आणि त्यांच्या अनेक प्रकारच्या वृत्ती बघून रेखाला नकोसे व्हायचे. डान्स करताना कुठल्या पुरुषाचे जवळ येणे, आपल्या अंगावर झालेली पैशाची उधळण सहन करणं या गोष्टी त्रासाच्या वाटायच्या आणि तितकीच किळसही वाटायची. परंतु काय करणार ही कथा बारमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक मुलीची आहे. कुठलीही मुलगी मनापासून बारमध्ये काम करायला येत नाही. वर मान करुन धिक्कार करणारा, आपण स्वच्छ मूर्तीचे पुतळे बनून या मुलींना तुच्छ

लेखणारा हा समाजच कारणीभूत आहे. वडील गेल्यापासून सहा महिने घराचे भाडे न भरल्याने घर मालकाने घराला कुलूप लावून टाकले, दुकानदाराने रेशन द्यायचे बंद केले. अशा परिस्थितीत रेखा काय करणार...? जी परिस्थिती सीमाची होती तीच परिस्थिती रेखाची होती. परंतु जीवन जगण्याचे रस्ते दोघींचे समांतर दिशेचे होते. दोघींची जीवनाची वळणं वेगवेगळ्या दिशेने वळत होती. कधीही न मिळणारी... परंतु मैत्री अशी होती की कधीही न तुटणारी...!

रेखाची बारमध्ये सुहासशी ओळख झाली होती. सुहास अधून मधून बारमध्ये येत होता. सुहासचा मित्र अमित हा रेखाचा जवळचा मित्र होता. त्यामुळेच सुहासची आणि रेखाची ओळख झालेली होती. अमित रेखावर फार प्रेम करायचा. दिवसेंदिवस त्यांची मैत्री दाट होत होती. रेखालाही अमित आवडत होता परंतु ती त्याच्याशी लग्न करु शकत नव्हती. जोपर्यंत नंदा आणि उमेश आपल्या पायावर उभे रहात नाही तोपर्यंत लग्न करायचे नाही असे रेखाने मनाशी ठरविले होते. त्यामुळे रेखा अमितपासून थोडी सावधच असायची. शिवाय मी बारमध्ये काम करणारी, अमितचे आई-वडील माझा सून म्हणून कसा स्वीकार करतील....? या विचाराने रेखा लग्नाचा विचार झटकून टाकायची. एक दिवस रेखा आणि सीमा समुद्र किनारी फिरायला गेले असताना त्यांना सुहास आणि अमित भेटले. सीमाने सुहासला बघताच मान फिरवली आणि म्हणाली "रेखा, त्या सुहासच्या नादी लागू नकोस, तो मुलगा चांगला नाही...! परंतु अमितने आणि सुहासने त्या दोघींना बघितले होते म्हणूनच अमितने रेखाला हाक मारली. त्यामुळे रेखा आणि सीमाला थांबणे भाग पडले. "रेखा, बघून न बघितल्यासारखे का केलेस...? काय हॉटेलचे बील भरावे लागेल म्हणून...!" अमित हसत हसत दोघींकडे बघून म्हणाला. "मी काय घाबरते का...! चलऽऽ मी चहाचं बील देते. येणार का....? रेखाने अमितला टोला मारण्याच्या सुरात म्हटले. "चल सुहास जायचं कां..? चल, का नाही...?" असे सुहास बोलून चौघै हॉटेलमध्ये गेले. सीमा मात्र

कोणाशीच बोलत नव्हती. रेखाला जरा सीमाविषयी विचित्र वाटले. परंतु सुहास मात्र नम्रतेने बसला होता. कारण सीमाने मारलेली थोबाडीत अजूनही डोक्यात झणझणत होती आणि त्या झळीची आग सूडभावनेला उद्विग्न करत होती. म्हणूनच तो रेखाबरोबर सीमाला प्रथमच बघत होता. सीमाच्या जवळ येण्याचा त्याला मौका मिळाला होता. त्याच्या नम्रतेच्या बुरख्यामागे सूडबुध्दीचा भाव लपला होता. म्हणूनच सभ्यतेने त्याने चार चहाची ऑर्डर दिली होती. रेखा, अमित व सुहास हे गप्पा मारत होते. परंतु सीमा काहीच बोलत नव्हती. सीमाला सुहासच्या सभ्यतेचे कोडे बेचैन करत होते. सुहास खरोखर सुधारला आहे की सुधारण्याचे नाटक करत आहे...? या विषयी सीमा काहीच समजू शकत नव्हती. म्हणूनच ती रेखाला भेटण्यास टाळत होती. परंतु रेखा सुट्टीच्या दिवशी अमितला भेटण्याच्या इराद्याने ती सीमाला बोलवत असायची. रेखा सीमाची खास मैत्रिण होती. म्हणून सीमाचा नाईलाज होत होता. कधी कधी रेखाची मन: स्थिती द्विधा होत असे. एक मन अमितकडे खेचायचे तर कधी अमितपासून दूर रहायचे. मला जर लग्नाचा विचारच करायचा नाही तर अमितशी मी मैत्री का करावी...? उगाच त्याला प्रेमाच्या पाशात का अडकवावे...? या विचाराने रेखा अमितपासून दूर रहायची.

सीमाचा भाऊ अजित याची तब्येत एकदमच ढासळून गेली होती. त्याला डॉक्टरांनी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यास सांगितले. सीमा रेखाकडे गेली आणि अजितच्या तब्येतीविषयी तिला सांगितले. परंतु सांगता सांगता सीमाला रडू आवरत नव्हते. रेखाने थोडेफार आईच्या डोळ्याच्या ऑपरेशनसाठी बाजूला काढून ठेवलेले पैसे सीमाच्या हातात ठेवले आणि म्हणाली "हे पैसे कमी पडले तर अमित कडून घेऊया...!" सीमा लगेच घरी जाऊन अजितला सरकारी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यास निघाली. अजितमध्ये चालायची सुध्दा शक्ती नव्हती. आई आणि सीमाने मिळून अजितला रिक्षामध्ये बसविले. पूढे स्ट्रेचरवरुनच अजितला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट

केले. डॉक्टरांनी लगेच ग्लुकोज, सलाईन, इंजेक्शन्स् व औषधोपचार चालू केले. अजितची शेवटची स्टेज होती. त्यामुळे कुठल्याच बाबतीत खात्री देता येत नव्हती. सीमा व तिची आई दोघीही त्रस्त स्थितीत अजितजवळ बसून होत्या. संध्याकाळी रेखा, अमित व सुहास तिघेही एकत्र अजितला भेटायला आले होते. रेखाने बरोबर दोघींसाठी रात्रीचे जेवणही आणले होते. सीमाने रेखाला बघितल्याबरोबर तिच्या कुशीत शिरुन रडू लागली. “सीमा, तू अशी रडलीस तर आईला कोण सांभाळणार...? आईची तब्येत सुध्दा ठीक नाही....!” असे म्हणून रेखाने सीमाच्या पाठीवरुन हात फिरवून धीर दिला. “सीमा, मी उद्या सुट्टी घेते, म्हणजे तुला थोडा आराम मिळेल. आईलाही घरी आराम करु दे...!” “रेखा, अगं तू कशाला सुट्टी घेतेस...? मी आणि सुहास आहे नं, आम्ही अजितजवळ बसूं, तसाही हा पुरुषांचा वॉर्ड आहे...!” अमित म्हणाला. परंतु सीमाने काही उत्तर दिले नाही. सीमाला सुहासचे कोणतेच उपकार घेणे नको होते. तिघेही सीमाला हिम्मत देत होते. एका तासभराने तिघेही जाण्यास निघाले. “घाबरु नकोस, सर्व काही ठिक होईल. मी उद्या परत येईन...!” सीमाला जवळ घेत रेखा म्हणाली. तेवढयात संध्याकाळची राऊंड मारायला डॉक्टर आले. डॉक्टर काही पेशंटस्ना तपासून अजितजवळ आले. अजितला तपासून म्हणाले “अजूनही काही सांगू शकत नाही. काळजी घ्यावयास हवी.” असे म्हणून डॉक्टरांनी काही इंजेक्शन्स् आणि औषधं लिहून नर्संच्या हातात पेपर देऊन काही बोलून निघून गेले. रेखाने आणलेला डबा उघडून सीमा व तिच्या आईने मिळून जेवून घेतले. आळीपाळीने त्या आराम करत होत्या. रात्री नऊ वाजता अमित आला होता “सीमा, मी आलोच आहे तर आईला घरी पाठव. तिला आराम करु देत.” सीमानेही लगेच आईला रिक्षामध्ये बसवून दिले. तिला खोकल्याने हैराण केले होते. तिचा सुध्दा औषधोपचार चालूच होता. सीमाने कामाच्या ठिकाणी फोन करुन सगळ्यांना कळवून रजा घेतलेलीच होती. सुहास कडून इंदूकाकींना समजलेच होते. रात्रीचे अकरा वाजले म्हणून सीमा वेटिंग रुममध्ये झोपण्यासाठी निघाली. एक चादर अमितला दिली. आणि एक आपण

घेतली. सीमाने चादर अंथरली आणि आडवी झाली. झोपायचा प्रयत्न करुनही झोप येत नव्हती. अजित कधी ठिक होईल...? आईची तब्येतही कधी ठिक होणार...? त्यात सुहास दिवसेंदिवस जवळ येत होता... या सर्व विचाराने ती या कुशीवरुन त्या कुशीवर तळमळत होती. रात्रभर ती जागीच होती. आणि पहाटे पहाटे तिला एक तासाभराची डुलकी लागली. अचानक वॉर्डबॉय लोकांचा कलकलाट कानी पडताच सीमा दचकून उठली. घडयाळात बघितले तर पहाटेचे सहा वाजले होते. दिवसभराच्या धावपळीने शरीराला आलेला थकवा पार उतरुन गेला होता. सीमा फ्रेश होऊन वॉर्डमध्ये आली. अजित व अमित झोपलेले होते. रात्रभर अमित झोपलेला नव्हता आणि नुकतीच त्याला डुलकी लागली असावी असे वाटत होते. तेवढयात हॉस्पिटलचा चहा आला. आवाजाने अमितही उठला. अमितने खाली जाऊन स्वत:साठी आणि सीमासाठी चहा घेऊन आणला. अजितची ब्लड टेस्ट होणार होती म्हणून अजितला चहा पिण्यास सिस्टरने नकार दिला आणि अमितकडे बघून “हे तुमचे कोण...?” सिस्टरने सीमाला विचारले “हे माझे भाऊ आहेत.” सीमा म्हणाली. तेवढयात अजित जागा झाला “आता कसे वाटते?” अमितने अजितचा हात हातात घेत विचारले. अजित अमितकडे बघून फक्त हसला. कारण तो अमितला ओळखत नव्हता. तेवढयात सिस्टरने अजितजवळ येऊन सिरिंजने ब्लड घेतले आणि लगेच निघून गेली. सीमाची आई नाश्ता घेऊन आली तेव्हा “नाश्ता करणार का?” सीमा अमितकडे बघून म्हणाली. “नको, आता मी घरीच नाश्ता करीन...! तू नाश्ता करुन घे ऽऽऽ” अमित म्हणाला. अमित एक चांगला निर्व्यसनी, शांत स्वभावाचा, सहयोगी वृत्तीचा मुलगा होता. अमितने सुहासशी कशी मैत्री केली याचे गूढ सीमाला कळत नव्हते. कुठे अमित आणि कुठे सुहास...? दोघेही पूर्व-पश्चिम होते. अमित नेहमी सुहासला उपदेशाचे डोस पाजायचा परंतु त्याच्यावर त्याचा काहीच परिणाम होत नसे. मात्र आज-काल सुहास थोडा नम्र रहात होता.

रेखाची बहिण नंदा व भाऊ उमेश यांचे शिक्षण व्यवस्थित चालू होते. नंदा दहावीला आली होती तर उमेश नववीत शिकत होता. त्यामुळे कॉलेजची जबाबदारी रेखावर अधिकच पडणार होती. त्यासाठी तिला पैशाची व्यवस्था आतापासून करणे भाग होते. बघता बघता दोघं भावंडं मोठी झाली होती. नंदाने दहावीचं वर्ष म्हणून अभ्यासावर जोर मारला होता. रात्र रात्र जागून नंदा अभ्यास करत होती. रात्री उशिरा पर्यंत जागल्याने तिची रेखाताई हॉस्पिटलमध्ये काम करते तर एक दोन वाजता कशी घरी येते..? नंदाला ताईविषयी शंका येऊ लागली होती. ताई कुठे काम करत असेल...? या विचाराने तिचे मन थरथरु लागले. “नाही ऽऽ ताई विषयी असा संशय घेणंही चुकीचं आहे. आमची ताई तशी नाही...!” असे म्हणून नंदा आपल्या मनाची समजूत घालत होती. “या गोष्टीपेक्षा आता आपल्याला अभ्यासावर लक्ष द्यायला पाहिजे...!” असे स्वत:शीच म्हणून पुन्हा पुस्तकात डोकं खुपसायची. एकीकडे अमित आणि रेखाची मैत्री घनिष्ट होत होती. रेखाच्या मनात नसतानाही रेखा हळूहळू अमितच्या जवळ येत होती. ती आपल्या स्वत: वर ताबा ठेवू शकत नव्हती आणि अमितशी लग्नही करु शकत नव्हती. भावंडांचे शिक्षण म्हणजे निदान पाच सहा वर्ष तरी लागतीलच...! असे रेखाचे विचार होते. परंतु तोपर्यंत अमित थांबू शकला नसता. कारण अमितच्या घरी नेहमी त्याच्या लग्नाचा विषय निघत होता. अमित बारमध्ये ऑर्केस्ट्रा चालवायचा. तो गिटार वाजवत असे. बारमध्ये काम करुनही अमित निर्व्यसनी होता. त्याच कारणाने रेखाला अमितविषयी आदर होता. रेखाही स्वभावाने चांगली होती त्यामुळे कधी कधी तिच्या मनात विचार यायचा की सीमा फार चांगली मुलगी आहे. तिला अमितसारखा मुलगा मिळाला तर बिचारीचे नशीब उजळेल. तिच्या परिवाराला आधार मिळेल. परंतु सीमाने मान्य करायला हवे. परंतु हा विषय या वेळेला सीमाकडे बोलण्यात अर्थ नव्हता. कारण अजितची तब्येत फार खराब होती. अजितला लवकर डिस्चार्ज मिळेल असे वाटत नव्हते. सीमालाही जास्त दिवसांची रजा घेणे मुश्किल होते. त्यामुळे रेखा सीमाच्या कामाच्या वेळी तीन-चार तास अजितजवळ बसायची. तर

थोडावेळ सीमाची आई तर कधी सुहास बसायचा. सुहास कधी कधी अजितसाठी फळं घेऊन यायचा. अशी वेगवेगळ्या प्रकारे मदत करुन तो आपल्या चांगल्या व्यक्तित्वाची छाप उमटवत होता. सीमा दिवसा आपली कामे करुन रात्री अजितजवळ बसायची. कधी कधी सुहासही रात्री अजितजवळ बसत होता. त्याच्या चांगल्या वागण्याने सीमाला त्याच्या विषयीचे भय कमी कमी होत चालले होते. आठ दिवसांनी अजितच्या प्रकृतीमध्ये हळू हळू सुधारणा होऊ लागली होती. अजित उठून बसू लागला होता म्हणून डॉक्टरांनी त्याला डिस्चार्ज दिला. त्यावेळी सुहास आणि रेखा दोघेच सीमाबरोबर होते. दोघांनी मिळून रिक्षाने अजितला घरी आणले. “रेखा, तुम्ही सगळ्यांनी मला फार मदत केली....!” असे म्हणून सीमाने रेखाचा हात हातात घेत रेखाला आलिंगन दिले. “अग, ही आमची डयूटी होती. वेळेला मित्र-मैत्रिणी उपयोगी नाही पडणार तर मग त्यांचा काय उपयोग....!” रेखा सीमाच्या गालावर लाडिक चापटी मारत म्हणाली. अजित बेडवर आराम करत होता. आणि सीमा सुहास व रेखासाठी चहा बनविण्यास किचनकडे वळली. तिघेही चहा पीत पीत गप्पा मारत होते. थोडया वेळाने रेखा व सुहास जाण्यास निघाले. सीमाने त्यांना गेट पर्यंत सोडून निरोप दिला. “ही मुलं किती चांगली आहेत वेळेला उपयोगी पडली...!” सीमाची आई त्यांचं कौतुक करत म्हणाली परंतु सीमाच्या मनात सुहासच्या स्वभाव परिवर्तनाचं गूढ उकलत नव्हतं. सुहास एवढा कसा बदलला...? याचे सीमाला आश्चर्य वाटत होते. हळू हळू सुहासचं सीमाच्या घरी अजितला बघण्याच्या निमित्ताने येणं जाणं होऊ लागलं.

अजितला घरी येऊन आठ दिवस झाले असतील आणि अचानक त्यादिवशी अजितला अस्वस्थ वाटू लागले. सकाळी अजित सीमाला कामावर जाऊ नको असेच वारंवार म्हणत होता. सीमाला ही अजितची बैचैनी जरा विचित्रच वाटली. म्हणून ती कामावर न जाता घरीच राहिली. आई मात्र कामाला गेली होती. सकाळी नाश्ता म्हणून अजितला दूध आणि ब्रेड जरा जबरदस्तीनेच

सीमाने भरविले होते. त्यानंतर औषध घेऊन अजितला झोप लागली होती. एक तासाभरात अजित झोपून उठल्यावर थोडया वेळाने त्याला श्वास लागू लागला म्हणून बाजूच्या काकूंना अजित जवळ बसवून सीमा आईला बोलवायला गेली. तसेच रेखालाही बोलविले. रेखा अर्ध्या रस्त्यात डॉक्टरला बोलवायला गेली "सीमा, तू पुढे हो, मी डॉक्टरला घेऊन येते...!" सीमा घरी आली बघितले तर अजित शांत झोपला होता आणि आई त्याच्या डोक्यावरुन हात कुरवाळत होती. सीमाने अजितचा हात हातात घेतला आणि घाबरुन रडू लागली. तेवढयात डॉक्टर आले. अजितला तपासले आणि रेखाकडे गंभीर चेहऱ्याने सॉरी, म्हणाले, रेखा समजून गेली अजित या दुनियेत राहिला नव्हता. परंतु सीमाला कसे सांगायचे...? हा तिला प्रश्न पडला. म्हणून तिने सीमाला अजितपासून दूर केले आणि तिला आपल्या मिठीत घेतले. "सीमा, व्हायचे ते झाले, आपल्या हातात काय आहे...?" हे रेखाचे बोलणे ऐकून सीमा व तिची आई दोघीही समजून गेल्या आणि दोघीही अजितला पकडून पकडून रडू लागल्या रेखाने लगेच अमित व सुहासला कळविले. लगेच आजूबाजूचे जमा झाले. सुहास व अमितने डॉक्टरांकडून "डेथ सर्टीफिकेट" आणून अंतिम संस्काराची तयारी करण्यास निघून गेले. इंदूकाकी व मी स्वत: सुध्दा तिथे गेलो. सीमाचे मी सांत्वन केले. तरीही सीमाचे रडू थांबत नव्हते. एकुलत्या एक छोटया भावाला आपण वाचवू शकलो नाही याची तिला खंत वाटत होती. ती आपल्या गरिबीला दोष देत होती.

अजितला जाऊन पंधरा दिवस झाले होते. अजितचे बाराव्या तेराव्याचे कार्य व्यवस्थित पार पडले होते. तेव्हा सुध्दा सर्व खर्च अमित आणि रेखानेच केला होता. लोकांचे किती उपकार घेणार म्हणून सीमाने भांडी कपडयाचे काम सोडून एका शाळेत साफसफाईचे काम पकडले. तिथे तिला पाच हजार रुपये पगार मिळत होता. त्यामुळे लोकांचे कर्ज चुकते करण्यास सोपे पडत होते. शिवाय रजाही भरपूर मिळत होत्या त्यामुळे सीमाला थोडे हलके झाल्यासारखे वाटत होते. सीमा

शाळेतून येऊन घरची जबाबदारी सांभाळत होती. आईलाही तिने सर्व काम सोडून घरी बसविले होते. उगाच आईची तब्येत बिघडायला नको. एक तर बाबा रिक्षा अपघातात गेले. छोटा एक भाऊ तोही सोडून गेला. निदान आईचा तरी आधार मिळावा म्हणून आईला घरी आराम करण्यास सांगितले होते. परंतु सीमाची आई स्वस्थ बसणारी नव्हती. घरात रिकामे बसले की अजितची आठवण मनाला हळवं करायची. म्हणून तिने घराच्या बाजूलाच सीमाच्या नकळत दोनच घरकामं पकडली. सीमा कामावर गेली की ती कामाला निघायची आणि सीमा घरी परतण्यापूर्वी ती घरी यायची. तिला सीमाची फार काळजी वाटायची. लहान वयात बिचारीवर घरची जबाबदारी पडली होती. "तिचे लग्न झाले की मी सुटले डोळे बंद करायला...!" असे नेहमी सीमाची आई मला रस्त्यात भेटली की म्हणायची. मलाही मनापासून तेच वाटायचे की सीमा फार चांगली मुलगी आहे, रुपवान आहे तसेच समंजस आहे तिला तसाच नवरा मिळायला हवा...! त्यावेळची अशी परिस्थिती होती की डोक्यावर कर्जाचा भार होता आणि कमाई बिलकूल होत नव्हती. सीमा सकाळी नऊ वाजता जाऊन संध्याकाळी सहा वाजेपर्यंत घरी यायची. तिला शाळेत जाण्याचा एक फायदा झाला होता. सीमाने दहावीची परीक्षा देण्याचे ठरविले. परंतु त्यासाठी पुस्तकं आणि परीक्षा फी भरण्याचे सामर्थ्य सीमाकडे नव्हते. तरी ती कामातून मोकळ्या वेळात दहावीच्या वर्गाशेजारी बसून शिक्षक मुलांना जे शिकवत असत ते ग्रहण करीत होती. तसेच रेखाची बहिण नंदाही दहावीला होती. त्यामुळे बरीच मदत नंदाकडून होत होती. तसेच दहावीचे सरही सीमाला मदत करु लागले होते. शाळा सुटल्यावर ते सीमाला थांबवत असत आणि थोडे फार धडे समजावत असत. त्यानंतर सीमा सर्व वर्गाची साफसफाई करुन शाळा बंद करुन घरी निघून येत असे. असे दोन तीन महिने व्यवस्थित अभ्यास होत होता. अचानक सरांची बुध्दी बदलू लागली. हळू हळू ते सर सीमाच्या अंगलट येऊ लागले. शिकवता शिकवता हाताला स्पर्श करु लागले. एवढया मोठ्या शाळेत फक्त सीमा आणि ते सर, या कल्पनेने हात पाय थरथरु लागले. सरांचे वागणे काही ठिक नव्हते. म्हणून

सीमाने “मी जरा पाणी पिऊन येते...!” असे म्हणून सीमाने तिथून जो पळ काढला तो पुन्हा त्या शाळेत सीमाने पाय ठेवला नाही. त्यामुळे शाळेतील कामही सोडावे लागले. सीमाला एक आशेचा किरण दिसत होता. दहावीची परीक्षा दिली असती तर सीमाचे नशिब बदलले असते. परंतु सीमाने हार मानली होती. सीमा धापा टाकतच घरी आली. आई घरात नव्हती हे बघून सीमाला हायसे वाटले. आईला उगाच टेंशन नको म्हणून सीमा अशा गोष्टी आईला सांगत नव्हती. सीमाने लगेच स्वत:साठी चहा बनवला आणि चहा पीत पीतच विचार करु लागली “ही दुनिया कशी आहे...? सरडयाप्रमाणे ती आपला रंग बदलत असते. स्त्रीला सन्मानाने धड जगू देत नाही. स्त्री समोर दिसली की हे पुरुष पाघळलेच म्हणायचे. कुणाचं हित करायची बुध्दीच होत नाही. स्त्रीच्या कमजोर परिस्थितीचा फायदा कसा उठवता येईल हेच ते बघत असतात..!” सीमाला पुन्हा प्रश्न पडला आता काय करावे...? पुन्हा शिवणकाम चालू करावे या विचाराने तिने आपली सोन्याची चेन गहाण ठेऊन आलेल्या पैशातून उशीच्या कव्हर्ससाठी कापड आणले. उशीची कव्हर्स शिवून मशिनवरच भरतकाम करुन ते ती विकू लागली. या कामात तिला चांगला प्रतिसाद मिळाला. हळू हळू साडी पेटीकोट शिवून विकू लागली. पुन्हा या कामात तिचा जम बसू लागला. आजूबाजूच्यांनी देखील तिला भरपूर साथ दिली. परंतु खरेदीचे पैसे वेळेवर येत नव्हते. लोकं उधारी करु लागले. उधारीविना धंदा होत नाही हे सीमाने चांगलेच जाणले होते. उधारीने सीमाचा घरखर्च निघत नव्हता. तरी सीमाने हिम्मत हारली नव्हती.

रविवार होता. रेखाला रजा होती. म्हणून ती सीमाला भेटायला तिच्या घरी गेली. रेखाला बघून सीमाला आनंद झाला. रेखा दारातूनच म्हणाली “येऊ का ऽऽऽ काय चाललंय...!” हो ऽऽऽ हो ये नं...! अगं, मी तुझीच वाट बघत होते...! बरेच दिवस झाले, आपली भेटच झाली नाही. मी विचारच करत होते की तुझ्या घरी जावे, किती दिवस झाले रेखाने तोंड दाखवले नाही...! असे

म्हणत सीमा मशिनवरुन उठली आणि रेखासाठी चहा व पाणी आणण्यास किचनकडे वळली. तिच्या पाठोपाठ रेखाही किचनकडे गेली. “आता पुन: शिलाईचे काम चालू केलेस...? शाळेचे काम का सोडलेस...?” रेखा म्हणाली. शाळेतील प्रसंग सांगण्यास सीमाला उचित नाही वाटले. “अगं, शाळेचे काम झेपत नाही ते बेंच उचलून कचरा काढणे, सर्वांच्या शेवटी शाळा बंद करुन घरी येणं या गोष्टीची मला भीती वाटते...!” सीमा म्हणाली. “नंदाकडून समजलं कि तू दहावीची परीक्षा देतेस...!” रेखा म्हणाली. हो ऽऽ हो परीक्षा तर द्यायची आहेच. परंतु नंदाची परीक्षा झाल्यावर म्हणजे तिची मला पुस्तकं तर मिळतील तसेच नंदा मला अभ्यासात मदतही करेल...! सीमा शिलाईचा धागा दाताने तोडतच म्हणाली. हे शिलाईचे काम करीन आणि मोकळ्या वेळेत अभ्यास करुन परीक्षा देईन असा माझा विचार आहे. बघूया आता किती मी यशस्वी होते...! मी तुला या वेळेला मदत करु शकत नाही गं, कारण आईच्या डोळयाचं ऑपरेशन आता करायलाच हवे, सॉरी हं सीमा...! “राहू दे गं ऽऽऽ उलट मलाच तुझं देणं बाकी आहे, यावेळेला मीच तुला मदत करायला हवी....! मी मागितले का तुझ्याजवळ...? सावकाश दे...!” रेखा सीमाच्या गालावर लाडिक चापटी मारत म्हणाली. तेवढयात सीमाची आई चप्पल काढता काढताच ओरडली “सीमा कोण आलय गं...? कुणाशी बोलत आहेस...?” “आई तूच बघ कोण आलंय ते...! ” सीमा रेखाकडे बघून हसत हसत म्हणाली “रेखा आली आहे का...? काय गं आज तुला वेळ मिळाला इथे यायला...? आणि तो अमित व सुहास कुठे आहेत...?” सीमाची आई उन्हातून आल्याने धापा टाकल्यासारखी बोलत होती. “सीमा, आईची तब्येत कशी आहे आता...? औषधं चालू आहेत नं....? तिची तब्येत बघून वाटत नाही की ती ठिक आहे....!” काय सांगू तुला, आता तूच तिला समजव...! माझ्या नकळत दोन कामं पकडलीत तिने, आपल्या तब्येतीची काळजीच घेत नाही ....!” सीमा मशिनला पाय मारतच बोलत होती. दोघींनी बऱ्याच गप्पा मारल्यावर रेखा जाण्यास निघाली. “चल सीमा, मी निघते, आता थोडे दिवस मला यायला नाही मिळणार. कारण पुढच्या

सोमवारी आईच्या डोळ्याचे ऑपरेशन आहे. त्यानंतर नंदाची बोर्डाची परीक्षा आहे...!" असे म्हणून रेखा सीमाच्या हातात दोनशे रुपये जबरदस्तीने ठेवून घरी निघून गेली.

महिना दीड महिना उलटला होता. अजूनही सीमाच्या खुनाच्या खटल्याचा निकाल लागला नव्हता. पोलीस आपलं काम चोख करत होते. संजयभाऊंना वहिनीने जामिनावर सोडविले होते. परंतु ते शेवटपर्यंत हेच बोलत होते की मी बलात्कार केला नाही...! मलाही त्यांच्याविषयी पूर्ण खात्री होती. जरुर यामध्ये काहीतरी गडबड आहे...! माझ्या मनातही हेच विचार येत होते की संजयभाऊ असे कृत्य करणारे नव्हते. सीमाच्या नवऱ्याने म्हणजे योगेशने संजयभाऊंचे नाव घेतले होते. योगेश अलीकडे दारु पिऊ लागला होता. नेहमी दारुच्या नशेत मारामारी करुन तो जेलची हवा खात होता. या वेळेलाही एकाचे डोके फोडल्याने योगेश सहा महिन्यांसाठी जेलमध्ये होता. जेलमध्ये सुध्दा कैद्यांबरोबर अरेरावी करत होता त्यामुळेच त्याची शिक्षा सहा महिन्यांपर्यंत वाढवली गेली होती. सुरवातीला योगेश चांगला मुलगा होता परंतु मुंबईत आल्यानंतर वाईट संगतीने बिघडला होता. सीमाने आपल्या आयुष्यात बराच संघर्ष केला होता. त्यामुळे मला व रेखाला नेहमी वाटायचे की सीमाला चांगला जोडीदार मिळो, जो तिला अगदी सुखात ठेवेल...! परंतु सीमाचे नशिबच फुटके होते.

रेखाच्या आईचे ऑपरेशन होते आणि त्यात नंदाचीही दहावीची बोर्ड परीक्षा होती. त्यामुळे नंदा ऑपरेशनच्या वेळी हजर नव्हती. एका अर्थी ते रेखाला बरे वाटत होते. कारण नंदाने रेखाच्या हॉस्पिटलमध्येच ऑपरेशन करायचे असा रेखाकडे लकडा लावला होता. रेखालाही ही गोष्ट कशी टाळायची समजत नव्हते परंतु सुंठीवाचून खोकला गेला होता. नंदा आपल्या परीक्षेमध्ये गर्क होती. नंदाला पेपर्सही चांगले जात होते म्हणून ती आनंदात होती. डोळ्यांचे ऑपरेशन व्यवस्थित झाले होते. अमित आणि सुहासही दोघे हॉस्पिटलमध्ये रेखाच्या आईला बघायला आले होते. चार

दिवसांची रजा रेखाने घेतलेलीच होती. त्यामुळे रेखाच आईजवळ बसून असायची. डोळ्यावर पट्टी असल्याने रेखालाच तिचे सर्व काही करावे लागत होते. "आता डोळ्यांवरची पट्टी कधी काढणार...?" अमितने रेखाला विचारले. "मलाही निश्चित माहित नाही. परंतु दोन-तीन दिवसांनी पट्टी काढतील असे वाटते..!" रेखा आईच्या बाजूला बसत म्हणाली "अरे तुम्ही उभे का...? बसा नं...!" रेखा स्टूल पूढे करत म्हणाली "नंदा आणि सीमा आल्या नाहीत वाटतं...!" अमित स्टूलावर बसत म्हणाला "नंदाची तर परीक्षा चालू आहे नं, म्हणून ती यायची नाही. सीमा आता येईलच...!" रेखा म्हणाली. नाव काढताच सीमा आली "तुला शंभर वर्ष आयुष्य आहे...!" रेखा हसत हसत म्हणाली. "नको गं बाई, शंभर वर्ष म्हणजे तेवढी वर्ष अजून खस्ता काढाव्या लागतील...!" सीमा सुहासकडे बघून म्हणाली. सीमाच्या बोलण्याचा रोख सुहास समजला होता. सीमाने रेखाच्या आईची विचारपूस केली. थोड्यावेळ गप्पाही मारल्या. रेखाला बरे वाटले. दिवसभर रेखा एकटीच होती त्यामुळे बोअर झाली होती. संध्याकाळचे सात वाजले तसे सिस्टर सर्वांना बाहेर पाठवू लागली. लगेच सीमा, अमित, सुहास तिघेही रेखाच्या आईचा निरोप घेऊन जाण्यास निघाले. अमितलाही ऑर्केस्ट्रामध्ये गिटार वाजवण्यास जायचे होते. आणि सुहासही मंदिराच्या देखरेखीसाठी रमेशबरोबर नाईट ड्यूटी करत होता. घरातूनही इंदूकाकींनी काही काम करत नाही आणि टवाळक्या करत नुसता फिरत असतो म्हणून हातखर्चाचे पैसे देणे बंद केले होतेच. शिवाय काही करायचे नसल्यास घरात राहू नकोस म्हणून सांगितले होते. हे सर्व ज्यावेळी सीमावर वाईट नजर टाकली होती त्यावेळी इंदूकाकींनी सुहासला धारेवर धरले होते. त्यासाठी तो एक महिन्यापासून मंदिराच्या एका छोटया रुममध्ये राहून राकेशबरोबर वॉचमनचे काम करत होता.

दोन तीन दिवसांनी रेखाच्या आईच्या डोळ्यावरील पट्टी काढली होती आणि तिला आता चांगले दिसू लागले होते. तिने नव्याने सर्वांची ओळख करुन घेतली होती. कारण रेखा लहान

असतानाच तिचे डोळे अधू झाले होते. त्यानंतर गरीब परिस्थितीमुळे ऑपरेशन करता आले नव्हते. जे अंधूक अंधूक दिसत होते त्याचवर तिने सात आठ वर्ष काढली होती. आता तिला दिसायला लागल्यावर तिच्या डोळ्यातून आनंदाचे आणि ममतेचे अश्रू वाहू लागले. रेखामुळेच मी पुन्हा सर्वांना पाहू शकले. याची जाणीव तिच्या मनाला सारखी होऊ लागली. रेखालाही खूप आनंद झाला. परंतु मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात एक भीती निर्माण होत होती. जर मी कुठे काम करते हे आईला समजले तर आईच्या मनाला किती दु:ख होईल...! या नुसत्या कल्पनेने सुध्दा रेखाच्या अंगावर काटा येत होता. डोळयांवरची पट्टी काढल्यावर दुसऱ्या दिवशी डॉक्टरांनी रेखाच्या आईला डिस्चार्ज दिला. रेखाने आईला रिक्षाने घरी आणले. घरात पाऊल ठेवताच रेखाच्या आईने रेखाच्या बाबांच्या फोटोसमोर जाऊन नमस्कार केला. तेव्हा तिच्या डोळ्यांतून आपल्या पतीच्या आठवणीने अश्रू वाहू लागले. तेवढयात "आई, मी कोण, ओळख बघू...!" नंदाने आनंदाने उडी मारतच आईचा हात पकडून म्हटले. खरं तर, आईने नंदाच्या आवाजानेच तिला ओळखले होते. डोळे अधू झाले होते. तेव्हा नंदा खूप लहान होती. आणि आता मोठी झाल्यावर अंगाने भरल्यामुळे उंच धिप्पाड दिसत होती. आईला आवाज आणि स्पर्श या दोन गोष्टींनीच माणसाची ओळख पटत होती. "अग, माझ्या मुलीला मी ओळखणार नाही का वेडा बाई...!" असे म्हणून रेखाच्या आईने नंदाला जवळ घेत तिच्या गालाचे प्रमाने चुंबन घेतले. तेवढयात उमेशही आला. "आई, माझ्याकडे बघ, आता मी कसा दिसतो...?" अगदी बाबांवर गेला आहेस...! आई उमेशच्या डोक्यावरुन हात फिरवत म्हणाली. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. परंतु रेखा थोडी नर्व्हस होती. आईचा विश्वासघात केल्याची सल मनाला कुठेतरी टोचत होती. आईला फसवत असल्याची जाणीव मनाला स्थिर बसू देत नव्हती. परंतु एक दिवस सत्याला सामोरं जायला हवं होतं. परंतु त्यावेळी आईची मन:स्थिती काय होईल...? याची कल्पना रेखाला अस्वस्थ करत होती. एक मन म्हणत होते की आज ना उद्या आईला समजणारच, दुसऱ्याकडून समजण्यापेक्षा आपल्या तोंडून सांगणे योग्य...!

परंतु रेखाला सत्याला समोरे जाण्याचे धाडस होत नव्हते. वेळ काळ बघूनच आईला सर्व काही समजावून सांगायचे असे ठरवून रेखाने तो विषय मनामध्ये दाबून टाकला.

सीमा दुनियेत राहिली नव्हती. म्हणूनच तिच्या साऱ्या आठवणी माझ्या डोळ्यासमोर ताज्या होऊन मनात तरळत होत्या. अजून असाच एक प्रसंग आठवतो. दसऱ्याचा दिवस होता, त्यादिवशी अमितच्या घरी पूजा होती. अमितने आपल्या सर्व मित्र-मैत्रिणींना बोलवले होते. तेव्हा रेखा व सीमाही पूजेला अमितच्या घरी आल्या होत्या. सीमाने रेखाचीच साडी नेसली होती. सीमा त्या दिवशी खूप सुंदर दिसत होती. साडीचा गुलाबी रंग तिच्या गोऱ्यापान अंगकांतीला खुलून दिसत होता. पाठीवर रुळणारा काळ्याभोर लांबसडक केसांचा शेपटा चालतेवेळी इकडून तिकडे नागिणीप्रमाणे सळसळत होता. कपाळावर छोटीशी पांढऱ्या रंगाची चमकणारी बिंदी तिच्या गोल चेहऱ्याला शोभून दिसत होती. अमितच्या घरी सीमा प्रथमच आली होती. सीमा व रेखा येताच अमितच्या आईने म्हटले "अग रेखा ये नं ऽऽ अशी उभी कां....? ये आत बस नं...!" सीमा व रेखा दोघी आत येऊन सोफ्यावर बसल्या. सीमा इकडे तिकडे बघून घराला न्याहाळत होती. आंटीने घर किती छान सजविले आहे, प्रत्येक वस्तू जागच्या जागी ठेवलेली होती. सीमाला अमितचे घर फार आवडले होते. एवढयात अमित दोघींसाठी पाणी घेऊन आला आणि त्यांच्या समोरच खुर्ची सरकवून बसला. पाठोपाठ अमितची आई सीमा-रेखाला हळदी-कुंकू द्यायला आली. "रेखा, तू सुध्दा बऱ्याच दिवसांनी इकडे आलीस, हॉस्पिटलमधून येण्यास फुरसत मिळत नाही का...?" "तसं नाही आंटी...! रेखा हसत हसतच म्हणाली. "तसं नाही तर मग कसं...?" अमितची आई रेखाची मस्करी करतच म्हणाली. सीमा समजून गेली की रेखा कुठे काम करते हे अमितच्या आईलाही माहित नव्हते. "ही तुझी मैत्रिण आहे कां...?" सीमाला हळदी कुंकू लावतच अमितची आई म्हणाली "हो, ही माझी मैत्रिण सीमा...!" रेखा म्हणाली. अमितची आई सीमाला पुन्हा पुन्हा

नजरेचा कटाक्ष टाकून न्याहळत होती. “सून मिळावी तर अशी…!” असे तिच्या मनात विचार येत होते. दोघींना तीर्थ प्रसाद देऊन अमितची आई आपल्या कामात गर्क झाली. कारण पूजेला बरीच लोकं येत जात होती. सीमा रेखाही उठून देवाला नमस्कार करुन निघत होत्या. तेवढयात अमितच्या आईने घरी देण्यासाठी प्रसाद बांधून दिला आणि म्हणाली “आता पुन्हा निवांत वेळी यायच हं का…! मग आपण गप्पा मारुया…!” होऽऽ हो आम्ही पुन्हा अवश्य येऊ…! रेखा चप्पल घालत घालत म्हणाली आणि हो, सीमाला सुध्दा घेऊन ये…! अमितची आई सीमाकडे बघत म्हणाली. पूजेला बरीच जणं येऊन गेली होती रात्रीचे साडेनऊ झाले होते. पूजेला येणाऱ्यांची गर्दी एकदम कमी झाली होती. म्हणून अमितची आई विसावा घेण्यासाठी सोफ्यावर बसली. तेवढयात अमितही सीमा रेखाला सोडून आला. “ही सीमा काय करते…? कुठे राहते…?” अमितच्या आईने अमितला विचारले “अग बिचारी गरीब आहे. तिचे वडील वारले आणि भाऊसुध्दा आत्ताच वारला. आई आणि ती अशा दोघीच राहतात…!” अमित गंभीरपणे सीमा विषयी सांगत होता. “तुला कशी वाटते सीमा…? माझ्या तर मनात ठसली…!” अमितची आई मुद्दामच विषय काढून अमितच्या मनातील भाव ओळखून घेण्यासाठी म्हणाली. परंतु अमितने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. कारण त्याचे तर रेखावर प्रेम होते. त्याला रेखाशी लग्न करायचे होते. म्हणून तो संधीचा फायदा घेऊन म्हणाला “का, तुला रेखा नाही आवडली…?” “अरे, तसे नाही पण सीमा आज लक्ष्मीच्या रुपात दिसत होती. खूप गोड दिसत होती…! म्हणून मी तिची विचारपूस करत होते. माझी सून सुध्दा अशीच असावी…!” अमितची आई म्हणाली. “मीच तिला विचारते”असे हळू आवाजात स्वगतच पुटपुटली. परंतु अमित ते ऐकून म्हणाला “अगं वेड तर नाही लागलं…? ती माझी मैत्रिण आहे. मी लग्नाच्या दृष्टीने तिच्याकडे कधीच बघितले नाही….!” अमित थोडा रागातच म्हणाला. अमितची आई काही न बोलता स्वयंपाकखोलीत निघून गेली. रात्रीची जेवणं आटोपली. रात्रीचे साडे अकरा वाजले होते. रोज अंग टाकल्याबरोबर अमितची आई झोपून जायची. परंतु त्या दिवशी पूजेला

बरेच काम करुनही तिला झोप येत नव्हती. तिच्या डोळ्यासमोर सारखी सारखी सीमा उभी रहात होती.

इकडे सीमा शिलाई काम करुन घर चालवत होती. अचानक तिच्या जीवनात दुसरे एक वादळ आले होते. गावाहून योगेश आला होता. योगेश हा सीमाचा आतेभाऊ होता. ज्यावेळी सीमाच्या बाबांनी रिक्षा घेतली होती, त्या रिक्षाचे पैसे योगेशच्या बाबांनी दिले होते. थोडे थोडे पैसे दर महिन्याला सीमाचे बाबा चुकते करत होते. योगेशच्या बाबांनाही सीमा फार आवडत होती. ते तिला सीमा माझी सून आहे. या नात्यानेच बोलत असत. परंतु थोडं कर्ज बाकी असतानाच अपघात होऊन सीमाचे बाबा स्वर्गवासी झाल्याने कर्ज फिटू शकले नाही. या रागाने त्यांचा तीन चार वर्षापासून संबंध तुटला होता. आणि अचानक योगेश सीमाच्या घरी म्हणजे आपल्या मामीकडे आला. परंतु या कर्जाच्या गोष्टी विषयी सीमाला काहीही माहित नव्हते. सीमा त्या वेळी लहान होती. त्यामुळे सीमाने योगेशलाही ओळखले नव्हते. परंतु आईने सीमाला योगेशची ओळख करुन दिली. परंतु सीमाने त्याविषयी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. किंवा आत्या व काका कसे आहेत...? म्हणून विचारले सुध्दा नाही. तिच्या मनात हाच प्रश्न होता कि आम्ही एकटे पडलो होतो तेव्हा हे नातलग कुठे होते...? आता काय म्हणून तोंड दाखवायला आले...? सीमा मशिनवर कपडे शिवतच राहिली. सीमाच्या आईने योगेशसाठी चहापाणी केले. तेवढयात सीमाच्या आईला योगेशने खाली वाकून नमस्कार केला. आणि खुर्चीत बसत म्हणाला “मामी, तुमची तब्येत कशी आहे...?” ठिक आहे बाबा...! भगवंताच्या कृपेने ठिक आहे...! सीमा शिलाई काम करुन घर चालवते...! तुझी आई कशी आहे...? बाबा कसे आहेत...? तुझं अचानक येणं कसं झालं...? सांगतो सर्व, अशी एकदम प्रश्नांचा भडिमार करशील तर मला उत्तर सुध्दा देता येणार नाही...! योगेश हसत हसत म्हणाला. योगेश निवांतपणे हात-पाय धुऊन चहा पीत बसला. चहा पिऊन

आपल्या पँटच्या पॉकेट मधून बाबांनी दिलेली चिठ्ठी काढली. आणि सीमाच्या आईच्या हातात देत म्हणाला “ही बाबांनी चिठ्ठी दिली आहे. ती वाच...!” सीमाच्या आईने चिठ्ठी घेऊन वाचण्यासाठी सीमाच्या हातात दिली. ती चिठ्ठी होती ती सीमाच्या बाबांची होती. त्यात त्यांनी रिक्षा साठी पैसे मागितले होते आणि सीमाला त्यांची सून म्हणून योगेशबरोबर लग्न लावून देण्याची अट मान्य केली होती. चिठ्ठी वाचून सीमाला वाईट वाटले. आपले बाबा गरिबीपुढे एवढे हतबल झाले होते. आपल्या बाबांचे कर्ज चुकते करण्यासाठी सीमाला योगेशबरोबर लग्न करावे लागणार होते. सीमा या विचाराने जरा गोंधळून गेली. आणि थोडावेळ चिठ्ठीकडे बघत राहिली तेव्हा सीमाच्या आईने विचारले “काय आहे चिठ्ठीत..?” तेव्हा सीमाने चिठ्ठीत लिहिलेला आपल्या बाबांचा मजकूर समजावून सांगितला. त्याविषयी तयारी असल्यास सीमाच्या आईला भेटण्यासाठी दोन तीन दिवसांनी काका सीमाकडे येणार होते. सीमाची आई विचार करु लागली, काय करावे...? निर्णय घेण्यासाठी ही मोठी परीक्षाच आली होती. तिचे एक मन म्हणत होते की चालून आलेले स्थळ का सोडावे...? लग्न करण्यासाठी आपल्याकडे पैसा नाही शिवाय मी मेल्यानंतर सीमा एकटी पडेल. योगेश तसा चांगला मुलगा होता. तो फोटोग्राफी करत होता. त्या बिझनेसच्या इराद्यानेच मुंबईला आला होता. गावच्या ठिकाणी त्याचा धंदा नीट चालत नव्हता. त्याला स्कोप नव्हता. म्हणून मुंबईला एक फोटो स्टुडिओ टाकण्याचा त्याचा विचार होता.

दुसऱ्या दिवशी सुहास व अमित सीमाच्या आईला बघायला आले. सीमा मशिनवर कपडे शिवत होती. “येऊ का...? हो ऽऽ हो या नं....!” सीमा मशिनचे चाक हाताने थांबवत म्हणाली. दोघं बेडवर बसले. तेव्हा सीमाने त्या दोघांना योगेशची ओळख करुन दिली. हळू हळू चौघांच्या गप्पा रंगात आल्या. सीमाच्या आईने दोघांना चहा पाणी दिले. “आंटी, आता तब्येत कशी आहे...? दोन दिवस तुमची तब्येत खूप खराब होती असे सीमा म्हणत होती.” अमित म्हणाला. “आता माझं

काय, मी अशी आजारी, दोन दिवस बरी असते तर दोन दिवस बरी नसते...!" तासाभराने अमित व सुहास जाण्यास निघाले. निघता निघता सीमाला रेखाचा निरोप दिला की तुला रेखाने बोलाविले आहे, एकदा भेटून जा. सीमाला त्याचे आश्चर्य वाटले. रेखाने कशाला बोलविले असेल..? काही पैशांची तर गरज नाही...? पण ती पैशासाठी माझी कशाला आठवण करेल...? उलट तीच मला मदत करते...! सीमा मनातल्या मनातच बोलत होती. सीमा मशिनवरुन उठली आणि स्वयंपाकाची तयारी करु लागली. योगेशही कपडे करुन बाहेर जाण्यास निघाला होता. "आता कुठे जातो आहेस...?" सीमा तांदूळ निवडता निवडता म्हणाली. "अग, थोडं काम आहे ते करुन अर्ध्या तासात परत येतो...!" योगेश चप्पल पायात सरकवतच म्हणाला. तेवढयात सीमाची आई सुध्दा कामावरुन आली. तेव्हा दोघींना लग्नाच्या विषयावर बोलण्यासाठी एकांत मिळाला होता. "मग, सीमा तू काय ठरविले आहेस...? तुझी मनाची तयारी आहे का योगेशबरोबर लग्न करायची...? सीमाची आई पाणी पीत पीत बेडवर बसत म्हणाली परंतु सीमा काहीच बोलत नव्हती. "अजित आजारी होता तेव्हा ही माणसं आली सुध्दा नाही किंवा विचारपूस सुध्दा केली नाही. लग्न म्हणजे त्यांनी एक सौदा केला." याच विचाराने सीमा गप्प होती. तेव्हा सीमाची आई समजून गेली होती की सीमाच्या मनात लग्नाविषयी नकार होता. सीमा स्वयंपाक बनवून योगेशची वाट बघण्यासाठी पुन्हा मशिनवर बसली. मशिनचे दाते जोरात चालू होते त्याबरोबर कपडाही पुढे पुढे सरकत होता. आणि सीमाचे विचारही त्या कपडयाबरोबर पुढे पुढे धावत होते. त्या मनाच्या गतीला कुठे विराम दिसत नव्हता. तेवढयात योगेश आला. दोन्ही हातात भाजी आणि स्वंयपाकाचे काही सामान घेऊन आला होता. "अरे, हे कशाला आणलेस...?" सीमाची आई योगेशकडे बघत म्हणाली. "मामी, राहू दे..! जास्ती काही आणले नाही...!" योगेश दोन्ही पिशव्या खाली ठेवत म्हणाला. थोडया वेळातच सीमाच्या आईने जेवणाची ताटं घेतली. गप्पा मारत मारतच तिघांनी जेवणं उरकली. आणि संध्याकाळी पाच वाजता रेखाकडे जाण्यास सीमा तयारी करु लागली. सीमाला आरशातून दिसत

होते की पाठीमागून योगेश तिलाच न्याहळत होता. सीमा पटकन तयारी करुन “आई, मी जरा रेखाकडे जाऊन येते…!” असे म्हणून  निघून गेली. सीमा रेखाच्या दारात उभी राहताच रेखाची आई म्हणाली “रेखा, कोण आलंय बघ…!” रेखा बाहेर येऊन बघते तो “अगं, ही तर आपली सीमा आहे…!” “आई, तू हिला ओळखले नाही…?” रेखा हसत हसत म्हणाली. रेखाच्या आईच्या डोळ्यांची पट्टी काढल्यावर सीमाला भेटायलाच मिळाले नव्हते. “सीमा, तू आईला हाक मार, म्हणजे आवाजाने ती तुला बरोबर ओळखेल…!” रेखाच्या या बोलण्यावर तिघीही हसू लागल्या. “अगं, बस नं, अशी उभी का…?” रेखा सीमाला म्हणाली. सीमा खुर्चीत बसली. “कशासाठी बोलवलं होतं…?” सीमा रेखाचा हात हातात घेत म्हणाली. रेखा, सीमाकडे बघतच राहिली. तिला कसे काय बोलावे समजत नव्हते. “अगं, सांग नं, मला कशाला बोलावले, असं कुठलं तातडीचं काम निघालं…? मला अशी गोंधळात अडकवू नकोस…! काही बोलायचे असल्यास लवकर बोल…!” रेखा इकडे तिकडे बघून कोणी आजूबाजूला नाही याची खात्री करुन बोलू लागली. “सीमा, काल अमितची आई मला भेटली होती. तिने तुझ्याविषयी सर्व माहिती विचारुन घेतली. आणि तिच्या मनातील तिने मला स्पष्ट सांगितले. अमितच्या आईला तू फार आवडली आहेस म्हणून तिने तुला अमितसाठी लग्नाची मागणी घातली आहे. सीमा बघ, अमित चांगला मुलगा आहे. त्याला कुठलेही व्यसन नाही…!” तेवढयात सीमा म्हणाली की “मी अमितशी लग्न करु तर तुझे काय..? मी ओळखत नाही का, तुझ्यावर अमित आजही प्रेम करत आहे. तुमच्या दोघांत मी कबाब में हड्डी का बनू…?”  सीमा म्हणाली. “सीमा, तुझं जर चांगलं होणार असेल तर मला काही वाईट वाटणार नाही, तू जरुर अमितशी लग्न कर…!” अच्छा, मी लग्न करेन, तू सुध्दा मान्य करशील परंतु अमित ऽऽऽ अमित बिलकूल मान्य करणार नाही, तो तुझ्यावर किती प्रेम करतो हे मला सांगायलाच नको…!” सीमा रेखाच्या गालावर हळूच लाडाने चापट मारत म्हणाली. चल, आता पुरे हा विषय, मी निघते आता, यासाठी तू मला बोलवलेस…? सीमा

खुर्चीवरुन उठत म्हणाली. “सीमा बघ, तू दोन दिवस विचार कर आणि मग मला काय ते सांग…!” रेखा सीमाचा हात हातात धरत म्हणाली. सीमा घरी निघून आली. परंतु सीमा अमित विषयी काहीच विचार करु शकत नव्हती कारण तिच्यापुढे योगेशच्या घरुन लग्नासाठी मागणी आली होती. आणि आपल्या बाबांच्या शब्दाखातर सीमाला लग्नाला उभे रहावे लागत होते.

एकीकडे अमितची आई सीमासाठी उतावीळ झाली होती. अमितला ही गोष्ट कळली तेव्हा अमित आईवर चिडला होता. परंतु तो आईला काहीच स्पष्ट सांगू शकत नव्हता. रेखा एक बार डान्सर होती. परंतु अमितही बारमध्ये म्युझिशियन होता. आपला मुलगा बारमध्ये काम करतो तरीसुध्दा सून ही बार डान्सर नसावी किंवा सिंगरही नसावी ही आपल्या समाजातील परंपरेची प्रथा आहे. सर्व बंधने ही मुलीलाच लागू पडतात. मुलगा मात्र काहीही करण्यास मोकळा आहे. सहानुभूतीने कुणीही त्या मुलीच्या कमजोरीचा विचार करत नाही. उलट तुच्छ बुध्दीने तिच्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन बनून जातो. परिस्थितीची अशी सांगड बनून जाते की या रस्त्याला वळणे अनिवार्य होऊन जाते. त्यात त्या मुलीच्या अनेक व्यथा दडलेल्या असतात. त्या व्यथांच्या तुकडयांना सांभाळत ती आपला परिवार सांभाळत असते. ही व्यथा बारमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक मुलीची आहे. असे अनेक विचार अमितला त्रस्त करीत होते. या मुलींचा उध्दार करायला कुणी पुढे येत नाही. आणि कुणी पुढे आला तरी एखाद्या पिल्लाला मनुष्य जातीने शिवले तर सारे पक्षी त्या पिल्लाला आपल्यात घेत नाही त्याप्रमाणे त्याला वाळीत टाकून देतात. म्हणूनच अमित गप्प होता. त्याचे मौन अमितच्या आईला गोंधळात टाकायचे. अमित असा गप्प का…? त्याच्या मनात रेखा तर नसावी…? रेखाशी लग्न करायचे असेल तर तो मला सांगत का नाही…? असे उलटे सुलटे प्रश्न अमितच्या आईला भेडसावत होते.

रेखा, अमित आणि सीमाला जवळ आणण्याचा प्रयत्न करीत होती. काय करावे म्हणजे दोघं जवळ येतील...? असा विचार करता करता तिला पिकनिकची युक्ती सुचली आणि रेखाने रविवारी पिकनिकला जाण्याचा बेत ठरविला. रेखाने अमित, सुहास, सीमा यांना भेटून रविवारी जाण्याचे निश्चित केले. सीमा यायला नकोच म्हणत होती. योगेश आला आहे असा बहाणा सांगून जायचे टाळत होती. “अगं, योगेशलाही घेऊन चल नं, तेवढीच आणखी मजा येईल...!” सीमा म्हणाली. सीमाचा तो दिवस फुकट जाणार होता कारण रोजच्या शिलाईच्या पैशातून तिचे घर चालत होते हे ओळखून रेखा सीमाचा पिकनिकचा खर्च मी करेन असे म्हणाली. जवळचे ठिकाण म्हणजे बोरिवलीचे “नॅशनल पार्क”..!

रविवारचा दिवस उजाडला. ठरल्याप्रमाणे सर्व जण रेखाच्या घरी जमले. उमेश आणि नंदाला बघून सीमाला आनंद झाला. “चला आता आणखीनच मजा येईल...!” सीमा म्हणाली. परंतु अमित अजून आलेला नव्हता. एवढा वेळ कसा झाला..? आतापर्यंत तो यायला हवा होता. नाही का सीमा...? रेखा सीमाकडे बघून हसत हसत म्हणाली. रेखा आपल्याला चिडवत आहे हे सीमाने ओळखले. “सीमा, योगेश कुठे आहे...?” तो येईलच...! सीमा म्हणाली. तेवढयात योगेश आणि सुहास दोघे बरोबरच आले. दोघांची आता चांगलीच मैत्री झाली होती. कारण योगेश संध्याकाळचा रोज गार्डनमध्ये टाईमपास करायला जात होता. एवढयात गाडीच्या हॉर्नचा आवाज झाला आणि गाडी रेखाजवळ थांबली. रेखाने गाडीकडे रागानेच बघितले. “दिसत नाही का...? गाडी चालवता येत नाही तर कशाला चालवता...?” रेखा रागातच ओरडली. तेवढयात गाडीची काच उघडून खिडकीतून डोकावून म्हणाला “हाय ऽऽऽ!” अरे अमित तू ...? सगळ्यांनी आश्चर्याने एकच ओरडा केला. अमित गाडी घेऊन येईल असे कोणालाच वाटले नव्हते. अचानक न सांगता गाडी आणल्याने सर्व जण खूश होऊन हाऽऽ हू करत गाडीत बसले. सगळ्यांनी नाश्ता पाणी

घेतलेलेच होते. नंदा दोन चटया घेऊन आली. तर उमेश बॅडमिंटन आणि क्रिकेट खेळण्यासाटी बॅट-बॉल घेऊन आला. सर्व जण गाणी म्हणत म्हणत एकमेकांची थट्टामस्करी करत मौज मजा करत होते. सीमाचा हा पहिलाच अनुभव होता. ती पहिल्यांदाच गाडीत बसली होती. त्यामुळे बाहेरचा हिरवागार नजारा बघण्यात सीमा धुंद झाली होती. बाजूला सुहास बसला होता. त्यामुळे ती जरा अंग चोरुनच बसली होती. थोडया वेळाने गाण्याच्या भेंडया चालू झाल्या. मधून मधून भेंडी चढल्याने सुहास सीमाला पाठीवर थाप मारण्याचा चान्स घेत होता. सीमा लगेच सीट बदलून रेखाच्या बाजूला जाऊन बसली. सीमाचे हे वागणे सुहासला फार खटकले होते. सीमाने आपला अपमान केला या भावनेने तो तिच्याकडे खुन्नसमध्ये बघू लागला. सीमा काही झालेच नाही असे दाखवत बाहेरचा निसर्ग खिडकीतून बघत राहिली. परंतु  सीमाने थोबाडीत मारल्याची आठवण सुहास विसरू शकत नव्हता. अमित शांतपणे गाडी चालवत होता. उमेश अधून मधून जोक्स सांगून सर्वांना हसवत होता. नंदा रेखाच्या गाण्याच्या सूराला साथ देत होती. तर योगेश डब्यावर तबला वाजवून गाण्याला सूराला साथ देत होता. एकंदरीत सगळे आनंदाने पिकनिकची मजा घेत होते. नॅशनल पार्क आले तसे अमितने एका झाडाखाली गाडी पार्क करुन सर्वजण चटई घालून बसले. सर्वांना भूकही लागली होती. म्हणून आपपला डबा काढून एक दुसऱ्याला शेअर करुन खाण्यातला आनंद घेत होते. थोडावेळ आराम करुन अमित म्हणाला "चला आता गेम खेळूया....!" हं ऽऽ हं आता क्रिकेट आधी खेळूया ...! उमेश बॅट मारुन स्टाईल घेऊन म्हणाला "मी येणार नाही, मला क्रिकेट खेळता येत नाही...!" सीमा म्हणाली "मग काय झाले... ? मला तरी कुठे खेळता येते... ?" रेखा हसत म्हणाली. "खेळता आले नाही तरी सगळयांनी खेळायाला पाहिजे...! उमेश नंदाकडे बघत म्हणाला बरोबर नं ताई... ? होऽऽऽ हो, नंदा उमेशच्या हातावर टाळी देत म्हणाली. अमितने सर्वांना आपापल्या जागी उभे केले. सीमा बॅटिंग करत होती आणि सुहास बॉलींग करत होता. त्यावेळी तो जाणून बुजून जोरात बॉल फेकत होता. सीमा त्या बॉलला बॅट मारु शकत नव्हती. "अरे, हळू बॉल

टाक नं....!" सीमा सुहासला म्हणाली. तरी सुहास जोरात बॉल टाकत होता. सीमानेही रागाने जोरात बॅट मारुन बॉल सुहासच्या नाकावर बसला. सुहास भडकला. मला खेळायचे नाही म्हणून बाजूला जाऊन बसला. त्यानंतर योगेश बॉलींग करु लागला. खेळात दोघेजण जास्त वेळ टिकले. योगेशने सीमाची वाऽऽ वा केली. हे बघून सुहास आतून जळफळत होता. सीमाने हळू हळू पंचवीस रन केल्या. तर नंदाने वीस रन केल्या. त्यानंतर थोडयावेळाने बॅडमिंटन खेळ सुरु झाला. दोन्ही पार्टीमध्ये खेळ चांगला रंगला होता. तेवढयात सीमा थकून बाजूला जाऊन बसली. योगेशही सीमाच्या बाजूला येऊन बसला. "हा सुहास तुझ्यावर एवढा खार का खातो...?" योगेश कपाळावरचा घाम पुसत म्हणाला. "काय माहित...?" सीमाने वरवर उत्तर दिले. "तुमच्यात काही भांडण आहे का....? "नाही, तसं काही नाही...! सीमा डोळयावर आलेली केसाची बट मागे सारत म्हणाली. तेवढयात रेखाही आली आणि म्हणाली "तुम्ही बसलात काय, खेळायला चला...! सीमा अमितला कंपनी दे...!" सीमा रेखाच्या शब्दाची फेक समजून गेली. "तू आहेस नं कंपनी दयायला...!" असे म्हणून सीमाने प्रतिशब्द फेकला. तेवढयात अमितने सर्वांना आईस्क्रिम आणले. ते बघून रेखा म्हणाली, कसली पार्टी दिलीस का...? काही विशेष आहे का...? "तुला नेहमी विशेषच दिसतं...!" अमित आईस्क्रिम खात म्हणाला. खेळा खेळात बराच टाईम निघून गेला होता. सूर्यास्त झाला होता. "आता निघायचं नं...?" सीमा म्हणाली. "होऽऽ हो, आता निघूया...!" रेखा सीमाचा हात पकडून गाडीच्या दिशेने जात म्हणाली. रेखाने सीमाला अमितच्या बाजूला पुढे बसविले. रेखा सीमाला अमितच्या जवळ घेऊन येत होती. परंतु अमितवर त्याचा काहीच प्रभाव पडत नव्हता. त्यामुळे रेखाला अमितचा राग येत होता. गाडीत सर्वांनी गाण्याच्या भेंडया खेळायला सुरवात केली. गाणी म्हणत म्हणतच नंदा, उमेश, रेखा झोपून गेल्या, घर कधी आले समजलेच नाही. प्रत्येक जण आपले आपले सामान घेऊन घरी परतले. मात्र सीमा एकदम फ्रेश झाली होती.

नंदाचा दहावीचा रिझल्ट तोंडावर आला होता. रेखाला नंदाच्या कॉलेज ॲडमिशन साठी पैशाची व्यवस्था करायची होती. तरी रेखाने थोडे पैसे जमा केले होते. नंदा रिझल्टची वाट पहातच होती. आणि तो दिवस उजाडला होता. नंदा थोडी टेंशनमध्ये होती. नंदा पास तर होणारच होती. परंतु तिला ऐंशीच्या पुढे टक्केवारी हवी होती. नंदा लवकरच उठून कॉलेजला जायला निघाली. “नंदा थांब, मी सुध्दा येते..! रेखा म्हणाली “ताई, राहू दे ग, मी जाऊन येते...!” नंदा पटकन निघूनही गेली. रेखा तिच्या रिझल्टची वाट पहात राहिली. दोन तीन तासाने नंदा आणि तिच्या काही मैत्रिणी घरी आल्या. सर्व जणी खुश दिसत होत्या. म्हणजे सगळ्यांना  चांगले टक्के मिळाले होते. नंदा घरात येताच “किती टक्के मार्कस् मिळाले नंदा...?” रेखा म्हणाली. तेवढयात नंदा रेखाला मिठी मारत “ताई, सत्याऐंशी टक्के मार्कस् मिळाले मला...!” रेखा आणि नंदाने मिठी मारुन गिरकी घेतली. दोघींना खूप आनंद झाला. रेखाच्या आईने सर्वांना चिवडा व चहा दिला. तेवढयात उमेशही दुकानातून पेढयांचा बॉक्स घेऊन आला. नंदाने सर्वांना पेढे वाटले. त्या दिवशी नंदाच्या यशाबद्दल सर्व जण खूश होते. दुसऱ्या दिवशी कॉलेजला जाऊन कॉमर्सला ॲडमिशन घ्यायचे होते. नंदा व रेखा लवकर उठून तीन-चार कॉलेजला जाऊन ॲडमिशन फॉर्म भरले होते. संध्याकाळी अमित, सुहास, योगेश आणि सीमाही रेखाच्या घरी नंदाचे अभिनंदन करण्यासाठी आले होते. नंदाचा रिझल्ट ऐकून सीमालाही मनातून वाटत होते की मला शिकायला मिळाले असते तर मी कुठल्या कुठे गेले असते परंतु सीमाला कुणाचा आधार नव्हता. नंदा रेखाच्या आधारे शिकत होती. आपले नशीब साकारत होती. आपल्या भावंडांसाठी रेखाने आपल्या आयुष्याचे बलिदान दिले होते.

सीमाला योगेशविषयी रेखाकडे बोलायचे होते म्हणून सीमा रेखाच्या घरी जाण्यास निघाली. “आई, मी जरा रेखाकडे जाऊन येते...!” असे म्हणून चप्पल पायात सरकवत तरातरा निघून

गेली. सीमाच्या आईलाही आश्चर्य वाटले की ही एवढी तरातरा कुठल्या कामासाठी गेली...? येऊ दे तिला, आल्यावरच समजेल...! सीमाची आई कचरा काढतच म्हणाली. सीमाला रेखाच्या आईने बघताच “येऽऽ ये सीमा,” रेखाची आई खुर्ची पुढे सरकवत म्हणाली. इतक्यात रेखा नाश्ता घेऊन आली. “चल, तू सुध्दा आलीस ते बरं झालं. आपण दोघी मिळून नाश्ता करुया...!” रेखा म्हणाली. सीमा प्लेट मधील एक इडली उचलून खात खात म्हणाली “वाऽऽ वा इडली फार छान झाली आहेत. कोणी बनवली...?” कोण बनवणार...? आमची आई...! रेखा आईकडे बघत म्हणाली. आई गालातल्या गालात हसत स्वयंपाक खोलीत गेली “सकाळी सकाळी कशी काय आलीस...? काही विशेष काम होत का..? ” हो ऽऽ जरा महत्वाचं बोलायचं होतं म्हणून मी आले. सीमाने लगेच विषयाला हात घातला. “रेखा, हा योगेश माझा आतेभाऊ, त्याच्या वडिलांनी म्हणजे माझ्या काकांनी रिक्षासाठी माझ्या बाबांना कर्ज दिले होते” असे म्हणून सीमाने आपली सर्व कहाणी रेखाला सांगितली. कहाणी ऐकून “हा तर सौदाच झाला म्हणायचा सीमा...! मग तू काय ठरविलेस ...?” “मला काय करावे काहीच सुचत नाही. बाबांनी घेतलेल्या कर्जासाठी लग्न करावेच लागणार, नाहीतर कर्ज तरी चुकते करावे लागणार...! रेखा आमची थोडी जमीन त्यांच्याकडे आहे, ती बळकावण्यासाठी हे सर्व कारस्थान आहे...!” रेखा हे सर्व ऐकून सुन्नच झाली. ती तर अमितच्या आईच्या सांगण्यावरुन अमितशी सीमाचे लग्न जुळवण्याचा प्रयत्न करत होती आणि हे काय नविनच ऐकायला मिळाले होते. तिच्या पुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. “रेखा, मी आता काय करु तुच सांग..!” सीमा गंभीर होऊन बोलत होती. “खरोखर हा मोठा प्रश्न आहे गं...! असे किती पैसे द्यायचे बाकी आहेत...?” रेखा म्हणाली. तरी पंचवीस तीस हजार बाकी असतील...!” सीमा म्हणाली. आईचे डोळ्यांचे ऑपरेशन झाले, शिवाय नंदाच्या कॉलेज ॲडमिशनसाठी पैसे लागतील त्यामुळे या वेळेला मी मदत करु शकत नाही गं...! “सॉरी सीमा...!” रेखा भावनाविवश होऊन बोलत होती. अमित कडून काही होते का, मी त्याला विचारुन

सांगते...! “नको ऽऽ नको, मला त्याच्याकडून नको, तुझी माझी गोष्ट वेगळी...! आणि अमितने दिले तरी ते चुकते करण्याची माझी ताकद नाही.” असे म्हणून सीमा जाण्यास निघाली. सीमा निराश झाली होती. ती घरी आली पण तिचे मन स्थिर नव्हते. दोन दिवसात तिला आपल्या आयुष्याचा निर्णय घ्यायचा होता. चारी बाजूने जाणाऱ्या वाटा बंद होत्या. त्यामुळे तिला एकच रस्ता दिसत होता. तो म्हणजे योगेशबरोबर लग्न करणे भाग होते. सीमाने आईला तसे होकार असल्याचे सांगितले. गावाहून काका व आत्याही मुंबईला सीमाकडे आले. सीमाच्या आईने त्यांना स्पष्ट सांगितले की सीमा लग्नाला तयार आहे. परंतु आमच्याकडून लग्नाचा खर्च अजिबात होणार नाही...! तेव्हा काका म्हणाले की तुम्ही त्याची काळजी करु नका, दोन्ही कडचा खर्च आम्ही करुं, बाकी तुमच्या मर्जीने तुम्ही तुमचं सांभाळा...! काका म्हणाले. तुमची हरकत नसेल तर आत्ताच आपण साखरपुडा उरकून घेऊया...! आत्या म्हणाली. “ठिक आहे...!” सीमाची आई म्हणाली.

साखरपुडयाचा दिवस होता. सीमाच्या आईने काही पैसे जमवून ठेवले होते. त्यातूनच दोन-तीन साडया आणण्यास सीमाला सांगितले. तसेच तिचे काही सोन्याचे दागिने सीमासाठी सांभाळून ठेवले होते ते तिने सीमाला घालायला सांगितले. सीमाने आपल्या मित्र-मैत्रिणींना बोलाविले होते. तसेच तिने मलाही आमंत्रण दिले होते. तशी तिची फारशी माणसे नव्हतीच. आणखीन आजबाजूचे शेजारी यांना बोलाविले. योगेशचे सर्व नातेवाईक गावी असल्याने त्यांच्याकडचं कोणी नव्हतंच. रेखा मात्र सकाळपासून सीमाकडे आली होती. सीमा घरातील कामातही मदत करत होती. दुपारी तीन वाजता सीमाला सजवायला घेतले. साडेचारचा मुहूर्त होता. चार वाजताच सीमा तयार होऊन गेली. सीमा खूप सुंदर दिसत होती. कुणाचीही दृष्ट लागावी असे तिचे रुप खुलून आले होते. साखरपुडयाची योगेश कडून दिलेली मोरपीशी साडी तिच्या गोऱ्या रंगावर उठून दिसत होती. लांबसडक केसाचा मोठा आंबाडा आणि त्यावर शेवंतीची वेणी. अगदी लक्ष्मी सारखी रुपवान सून

आत्याला मनापासून आवडली होती. सीमा जशी रुपवान होती तेवढीच ती संस्कारी होती. अमित, सुहास, नंदा, उमेश, रेखा, रेखाची आई, अमितची आई असे सर्वजण साखरपुडयाला आले होते. सीमाला बघून सुहासचा खुन्नस अजूनही वाढला होता. आतून त्याचा क्रोध विकोपाला गेला होता. सीमा माझी झाली नाही तर कुणाचीच होऊ देणार नाही या भावनेने तो सीमाकडे इर्षेने बघत होता. रेखा अगदी सीमाच्याबरोबर अगदी पाठराखीणीप्रमाणे वावरत होती. साखरपुडयाच्या कार्यक्रमाला सुरवात झाली होती. त्या दिवशी सीमाचे बाबा आणि अजितच्या फोटोला अगत्याने हार घातलेले होते आणि त्या फोटोसमोरच एकमेकांना अंगठी घालण्याचा कार्यक्रम चालू होता. अंगठी घातल्यावर दोघांनी बाबांच्या फोटोला नमस्कार केला. बाबा अगदी हसतमुख दिसत होते. जणू त्यांच्या मुलीने त्यांची अट पूर्ण केल्याचं समाधान दिसत होतं. मी सुध्दा सीमाला आशिर्वाद दिला. तिला जवळ घेतले नंतर अल्पोपहार करण्यात आला. प्रोग्राम अगदी छान झाला होता. निघतेवेळी मी सीमा व तिच्या आईला येते, म्हणून निरोप घेतला. निघताना मी एवढंच बोलले की, “सीमाची आई, आज मात्र सीमाची दृष्ट काढायला हवी...!” तेव्हा सीमा गालातल्या गालात हसली.

सीमाच्या लग्नाची तारीख एक महिन्यावर ठरवण्यात आली होती. सीमाच्या आईचे मंगळसूत्र देऊन सीमाला सोन्याच्या बांगडया केल्या होत्या. सीमा आपली गहाण ठेवलेली चेन सोडविण्याचा प्रयत्न करीत होती. तेव्हा मी तिला दोन हजार रुपये देऊन तिची चेन सोडवून आणली होती. थोडया फार साडया खरेदी केल्या. सासरकडून मंगळसूत्र आणि हार दिला होता. रेखानेही थोडी फार मदत केली होती. अशा प्रकारे तिचे लग्न व्यवस्थित पार पडले होते. परंतु लग्नाच्या वेळी सीमाने एक अट घातली होती की माझ्या आईला एकटी सोडणार नाही. तसेच योगेशही फोटो स्टूडिओ टाकण्यासाठी मुंबईतच राहणार होता. त्यामुळे दोघेही मुंबईतच सीमाच्या घरी रहात होते. योगेश सुरवातीला सीमावर फार प्रेम करत होता. त्यामुळे सीमाही खुश होती. म्हणतात न कि

खुशीचे दिवस फार छोटे भासतात. त्याप्रमाणे हळू हळू योगेश सुहासच्या सोबत जास्त वेळ राहू लागला होता. सुहासबरोबर बार मध्ये जाऊन नशापान करु लागला होता. जाणून बुजून सीमाचे आयुष्य बरबाद करण्याचा सुहासने जणू विडा उचलला होता. सीमाने योगेशला कितीतरी समजावूनसुद्धा त्याची संगत सोडत नव्हता. लग्नापूर्वीपासूनच त्यांची मैत्री दाट झाली होती. स्टूडिओसाठी जागा शोधण्याच्या निमित्ताने योगेश सुहासला घेऊन इकडे तिकडे फिरत होता. सीमाची आई सुध्दा योगेशला समजावत होती. परंतु योगेशवर त्याचा परिणाम होत नव्हता. राकेशच्या रुमवर बसून तासन्तास पत्ते खेळणं आणि रात्री बारवर जाणं हाच योगेश आणि सुहासचा दिनक्रम चालू होता. त्यामुळे राकेशने सुध्दा सुहासला रुम सोडून जाण्यास सांगितले होते. त्याकारणाने दोघांमध्ये बरेच वादविवाद होऊ लागले होते. कधी कधी मारामारी पर्यंत प्रकरणं जात होते त्यामुळे दोघांमध्ये वितुष्ट आले होते. एक दिवस रात्री सुहास बराच पिऊन आला होता. आणि राकेशला शिव्या देऊ लागला. त्यामुळे राकेश अधिकच भडकला होता. राकेशने सुहासचे सर्व सामानच उचलून बाहेर फेकून दिले. आणि सुहासला बाहेर काढून दरवाजा बंद करुन घेतला. तेव्हा सुहास नशेमध्येच रात्रभर बाहेर झोपून राहिला. सकाळी नशा उतरल्यावर उठून बघतो तर सर्व सामान बाहेर फेकले गेले होते. दरवाजाला कुलूप होते. तो समजून गेला की मी पिऊन आलो म्हणून राकेशने मला बाहेर काढले होते. मनातून सुहास राकेशवर चिडला होता. “बघून घेईन एक दिवस...!” असे म्हणत तो आपले सामान गोळा करु लागला. “आता कुठे जायचे, काय करायचे...?” याचा तो विचार करु लागला. तेवढयात योगेश आला. “अरे हे काय झाले...? सामान घेऊन कुठे निघाला...?” योगेश म्हणाला. सुहासने सारा प्रकार योगेशला सांगितला. “मग आता तू कुठे जाणार...? तू असं कर, हे गार्डन आहे नं त्या गार्डनमध्ये जाऊन बस...!” सुहासला योगेशचं बोलणं जरा खटकलंच. तरी सुध्दा काही न बोलता आपली बॅग उचलून सुहास गार्डनच्या दिशेने जाऊ लागला. योगेशही त्याची छोटी दुसरी बॅग घेऊन सुहासबरोबर चालू लागला. गार्डनमध्ये

एका बेंचवर सामान ठेवून बसणार एवढयात राकेश शिटी वाजवत सुहास जवळ येऊन म्हणाला "सुहास, गार्डनची वेळ आहे संध्याकाळी पाच वाजताची, तोपर्यंत कुणीही इथे बसू शकत नाही. उगाच माझ्या नोकरीवर पाय आणू नकोस...!" जोरजोराने शिटी वाजवून सुहासला व योगेशला गार्डनबाहेर जाण्यास अगतिक केलं.

योगेशच्या अशा बेफिकीर वागण्याने सीमाच्या आईला चिंता वाटू लागली होती. आधी योगेश कसा होता आणि दोन महिन्यात सुहासच्या नादी लागून कसा झाला, याचे सीमाच्या आईला वाईट वाटू लागले होते. आपण योगेशबरोबर सीमाचे लग्न लावून दिले, ही फार मोठी चूक तर नाही केली...? सीमाचे कसे होईल...? असे अनेक विचार तिला खाऊ लागले. त्यामुळे तिच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होऊ लागला. दिवसेंदिवस कमजोरी येऊ लागली. त्यामुळे ती कामाला सुध्दा जाऊ शकत नव्हती. खोकला सुध्दा जास्त वाढू लागला. औषधं सुध्दा सीमाच्या काळजीने व्यवस्थित घेत नव्हती. सीमाने लग्न केले पण तिला सुखही मिळाले नव्हते. योगेश दारुच्या आहारी जाऊ लागला होता. सीमाची हालत बघून तिच्या आईने अंथरुणाला अंग पकडले. डॉक्टरांनी तिची आशा सोडून दिली होती. त्यांनीही सांगितले की जोपर्यंत आहे तोपर्यंत आहे. काही शाश्वती देता येत नाही. सीमा मात्र आईची व्यवस्थित सेवा करत होती. आई म्हणजे सीमाचा मोठा आधार होता. तिने आपल्या सासू-सासऱ्यांना ही परिस्थिती कळविली. योगेशच्या वागणूकीबद्दलही कळविले. तेव्हा योगेशचे बाबा दोन तीन दिवसांसाठी आले होते. योगेशची हालत बघून तेही हादरुन गेले. काय करावे काही समजत नव्हते. त्यांना असे वाटले कि योगेशला पुन्हा गावी घेऊन जावे म्हणजे तो सुधारेल. अशा विचाराने ते पुन्हा मुंबईला आले. सीमाच्या आईचीही तब्येत ठिक नव्हती. त्यामुळे सीमा गावी सासरी जाऊ शकत नव्हती. शेतीचीही कामे बरीच असल्याने ते योगेशला घेऊन गावी गेले. जाताना सीमाला पाच हजार रुपये देऊन गेले. गावी गेल्यावर योगेशवर उपचारही केले. तेव्हा

योगेशमध्ये थोडा फरक पडला होता. योगेशच्या बाबांनी फोटो स्टूडिओच्या दुकानासाठी ॲडव्हान्स म्हणून दिलेले पैसेही असेच उडवून टाकले होते. सीमा आता एकटी पडली होती. आईची तब्येत दिवसेंदिवस खराब होत होती. शेवटी ती कोमात गेली. सीमाला आईचे वॉश करण्यापासून सर्व काही करावे लागत होते. सीमाला शिलाई काम करण्यासाठी सुध्दा वेळ मिळत नव्हता.

नंदा बारावीची परीक्षा पास झाली होती. तिला आता कॉलेज शिक्षणाबरोबर सी. ए. करायचे होते. रेखाने तिला सहयोग दिला होता. "तुला जेवढे शिकायचे तेवढे तू शिक, मी तुझ्या पाठीशी आहे." नंदाला त्यासाठी ॲडमिशन घ्यायचे होते आणि त्यावेळेला रेखाच्या बारवर पोलिसांची धाड पडली. बऱ्याच मुलींना पकडले गेले. परंतु रेखा कशी बशी पळून आली. म्हणून ती सुटली. परंतु समोर एक संकट उभे राहिले. नंदाच्या ॲडमिशन साठी पैसे कुठून आणायचे...? तिची रजिस्ट्रेशन फी तसेच क्लासेसची फी असे तिला वीस पंचवीस हजाराची व्यवस्था करायची होती. या वेळेला तिच्याबरोबर काम करणाऱ्या जेलमध्ये होत्या. काही जामिनावर सुटून घरी परतल्या होत्या. ज्यांच्याकडे पैसे नाहीत अशा जेलची हवा खात होत्या. प्रत्येक जणीची घरची परिस्थिती ठिक नव्हती. कुणाची लहान भावंडं शाळेत शिकत होती. तर कुणाचे घरी कमावणारा नव्हता तर कुणाचे वडील अंथरुणावर अर्धांगवाताने खिळलेले होते. तर कुणी दारुच्या आहारी जाऊन आपल्या मुलीच्या कमाईवर पोट भरत होते. अशा कुटुंबाची काय स्थिती असणार...? या विचाराने रेखाला कुठे पैसे उधार घेण्यासारखे नव्हते. जामिनवर सुटलेल्या मुली बाहेर छुपाछुपी धंदा करुन आपली गृहस्थीची जबाबदारी खेचू लागल्या होत्या. रेखाला काय करावे काहीच समजत नव्हते. नोकरी गेली असे सांगून रेखा घरी बसली होती. त्यामुळे नंदाही चूप होती. तिला रेखाची समस्या समजत होती. म्हणूनच ती म्हणाली "ताई, मी सी. ए. ची फस्ट ईयर ची परीक्षा ग्रॅज्यूएशन नंतरच देईन...! म्हणजे तो पर्यंत तूला दूसरा जॉबही मिळेल. बरोबर नं ताई...?" रेखाला नंदाचे

बोलणे ऐकून मनातून हसू आले. कारण नंदा किती लहान होती. बघता बघता आता किती मोठी झाली. तिला परिस्थितीची जाणीव होऊ लागली होती. तिला आता समज आली होती. त्यामुळे ती कुठल्याही बाबतीत हट्ट करत नव्हती. रेखा कामासाठी इकडे तिकडे फिरत होती. परंतु कुठे काम बरोबर नसायचे. म्हणजे तिच्या घरातील गरजा पूर्ण करण्यासारखा पगार मिळत नव्हता. रेखाचे शिक्षणही नव्हते. कशीबशी आठवी पास झाली होती. त्यामुळे चांगला पगार तरी कसा मिळणार…? रेखाला शिक्षणाचे महत्व चांगलेच समजून आले होते. म्हणूनच आपल्या भावंडाना कुठल्याही परिस्थितीत शिकवायचे असे मनाशी निश्चित केले होते. रेखा समजून होती यावेळेला मी काही केले नाही तर दोघा भावंडांचे शिक्षण अर्धवट राहणार होते. त्यासाठी रेखा सकाळीच कामाच्या शोधात निघाली होती. तेव्हा तिला रस्त्यात बार मधली नीता नावाची मैत्रिण भेटली. तिची सुध्दा परिस्थिती तीच होती. आई आजारी तर बाप दारुडा, एक छोटी बहिण शिकणारी त्यामुळे सर्व जबाबदारी नितावर पडलेली होती. बिचारी बार डान्सर म्हणून काम करुन परिवाराला सांभाळत होती. पोलीसांची धाड पडल्याने निताही घरीच होती. कुठेही काम मिळत नव्हते म्हणून बारमध्ये येणाऱ्या ओळखीच्या एका सावकाराकडून तिला मदत मिळत होती. परंतु तो आपल्या दिलेल्या पैशाची वसूली बरोबर करुन घेत होता. त्यामुळे निताला वाईट वाटायचे. समाजाचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच वेगळा होऊन जातो. प्रत्येक जण आपला स्वार्थ बघत असतो. कुणी मदतीचा हात द्यायला तयार नसतं, असे तिचे विचार तिला अस्वस्थ करत होते. त्यात बापाला दारुला पैसे दिले नाही तर त्याची मारपीट सहन करावी लागत होती. “नको ऽऽ नको, हा मुलीचा जन्म… मुलीचा जन्म म्हणजे पाप आहे… किती ते जुलूम आणि किती ते अत्याचार…. सहन करावं लागतं ते स्त्री जातीलाच… मग ती कुमारी असो वा यौवनातील नवतरुणी असो वा वयस्कर असो…!” नीता डोळयात पाणी आणून रेखाला सांगत होती. निताचे बोलणे ऐकून रेखालाही स्त्री जीवनाच्या सत्यतेची खात्री पटत होती. स्त्री ही गर्भात जन्म घेतल्यापासून ते वृध्दावस्थेपर्यंत ती सहनशीलतेच्या

काटयावर उभी असते. काटे टोचत असतात. तरीसुध्दा ती आपली पायवाट चालत चालत आपल्या जीवनाला यशस्वी बनविते तर कधी हार खाते. असे विचार क्षणभर रेखाला स्पर्शून गेले. रेखाने निताला समजाविले. निताला शांत करण्यासाठी रेखा एका हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी घेऊन गेली. चहाची ऑर्डर देऊन दोघी गप्पा मारत बसल्या होत्या. तेवढयात त्यांच्या समोरच्या टेबलवर एक पुरुष येऊन बसला. त्याचे लक्ष त्या दोघींवर पडले तेव्हा तो थोडावेळ पहातच राहिला. निता व रेखा चहा पिण्यात गुंग होत्या. थोडयावेळाने त्या पुरुषाने रेखाला विचारले. "तुम्ही बारमध्ये काम करता नं... ? मी तुम्हाला ओळखतो आणि तो बार आता बंद आहे हेही मला माहित आहे. माझ्या कंपनीत काही मुली हव्या आहेत. तुमची इच्छा असल्यास तूम्ही काम करु शकता....!" कंपनी कुठे आहे... ? पगार किती देता... ? रेखाने विचारले."आधी कंपनी तर बघा...!" असे म्हणून तो पुरुष चहा पिऊन उठला आणि तीन चहाचे पैसे देऊन दोघींबरोबर  चालू लागला. "ही बघा, ही समोरच माझी कंपनी आहे." रेखा व नीता त्याच्या पाठोपाठ कंपनीत गेल्या. दहा-एक वर्कर काम करत होते. मोटर पार्टस बनविले जात होते. "पगार मी काम बघूनच काय तो सांगेन, उद्यापासून तुम्ही या." ठिक आहे, मी येईन...! रेखा म्हणाली. दुसऱ्या दिवसापासून रेखा कामाला जाऊ लागली. सुरवातीला तिला पगार कमी मिळत होता. परंतु हळू हळू पगार वाढू लागला. रेखालाही नवल वाटू लागले. वर्षभर रेखाने काम केले. त्याप्रमाणे तिचा पगारही वाढत गेला होता. परंतु त्यातून नंदाचे ॲडमिशन होण्यासारखे नव्हते. पैशाची अत्यंत गरज होती. म्हणून रेखाने कंपनीतून कर्ज घेण्याचा विचार केला. त्याप्रमाणे तिने मॅनेजरला विचारले. तेव्हा मॅनेजरने सेठ को पूछके बताता हूँ...! असे बोलून सेठच्या केबिनमध्ये गेला आणि थोडयावेळाने येऊन रेखाला म्हणाला "आपको सेठने बुलाया है...!" रेखा लगेच केबिनमध्ये गेली. सेठ तिचीच वाट पाहत होता. रेखा आत येताच सेठने बसायला सांगितले. त्याने पैसे मागण्याचे कारण विचारले. रेखाने सर्व परिस्थिती सांगितली. सेठने वीस हजार देण्याचे कबूल केले. त्यामुळे रेखाचे टेंशन हलके झाले होते. तरीपण कर्जामुळे रेखाला

ओव्हर टाईम करावा लागत होता. रेखा कधी कधी कंपनीत एकटीच असायची. तेव्हा सेठ तिच्याशी लगटपणा करु लागला होता. परंतु रेखा नाईलाजाने सहन करीत होती. सेठ रेखाच्या गरजेचा फायदा घेत होता. एक दिवस ऑफिस मधील फाईल्स् रेखाला त्याच्या घरी घेऊन आणण्यास सांगितल्या होत्या. सेठ गाडीने पुढे गेला. रेखा पाठीमागून फाईल्स् घेऊन घरी गेली. फाईल्स् कपाटात ठेवल्या आणि रेखा "मी निघते" म्हणून बाहेर पडली. हळू हळू सेठचा कामाचा कारोबार रेखा सांभाळत होती. सेठच्या घरी कोणीच नव्हते. सेठ एकटाच रहात होता. त्याची माहिती रेखाला नव्हती. त्यासाठी रेखा अशीच एक दिवस कामा निमित्ताने सेठच्या घरी गेली होती. तेव्हा सहज बोलता बोलता रेखाने त्याच्या कुटुंबाविषयी विचारले. त्याचे नाव सतिश, त्याचे आई वडील गावी रहायचे आणि बायको दुसऱ्या मुलाबरोबर पळून गेली होती. त्यामुळे सेठ चा मुलींवरील विश्वास उडून गेला होता. रेखाचा आता कामात जम बसत होता. रेखा उशिरापर्यंत काम करुन आपले कर्ज चुकते करत होती. अशीच एक दिवस उशिरापर्यंत काम करत असताना सेठने रेखाला केबिनमध्ये बोलविले आणि रेखाची घरची विचारपूस केली. तिला सहानुभूती दाखविली आणि बोलता बोलता रेखाचा हात हातात घेतला. रेखाने आपला हात पाठी खेचला. तरी सेठने तिला जवळ खेचून मिठीत घेतले. रेखाला हे अनपेक्षित झाल्याने थोडी घाबरुनच गेली. आपली सुटका करुन, जाण्यास निघाली तेव्हा सतिश म्हणाला "जर तू कोणाला सांगशील तर मी तुझ्या घरी तू कुठे काम करत होतीस ते सांगेन." अशी धमकी दिली. या पध्दतीने रेखाला तो ब्लॅकमेल करु लागला. रेखाच्या असहाय्यतेचा फायदा घेऊ लागला. रेखा त्याचे पैसे एकदम देऊही शकत नव्हती. त्यामुळे तिथेच काम करणे भाग पडले होते. रेखा समजू लागली की बारमध्ये काम करण्याऱ्या मुलीने बार सोडून दुसऱ्या चांगल्या ठिकाणी काम करायचा जरी प्रयत्न केला तरी या समाजातील नराधम त्या मुलीला बाहेर येऊ देत नाहीत, त्याच नरकात तिला खेचतात आणि

स्वत:ला मात्र सभ्यतेचे पुतळे समजतात. रेखा आपल्या भावंडांसाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी सर्व काही सहन करत होती.

सीमाची आई कोमात गेल्यापासून सीमाचं बाहेर कुठेच जाणं येणं होत नव्हतं. त्यामुळे रेखाची खुशाली काही समजत नव्हती. अचानक आईची हालचाल बघून सीमा आईजवळ येऊन म्हणाली “आई, काही हवय का…?” थोडं पाणी दे…! सीमाने लगेच धावत जाऊन पाणी आणले आणि तिला पाजले. तिचं डोकं आपल्या मांडीवर घेऊन तिला डोक्यावरुन कुरवाळू लागली. सीमाला आनंद झाला होता. कारण आई कोमातून बाहेर आली होती. दोन दिवस ती शुध्दीत होती सीमाचा हात घट्ट पकडून ठेवायची. बघता बघता शेवटी अर्धा कप दूध मागून सीमाच्या हाताने पिऊन मान टाकली. त्यावेळी सीमा आईला पकडून खूप रडत होती. त्यादिवशी मी सुध्दा दिवसभर तिच्या जवळच राहिले होते. नंतर दोन तीन तासांनी योगेश व त्याचे आई-बाबा आले. सुहास व अमितही आले आजूबाजूचेही आले होते. सर्वांनी मिळून सीमाच्या आईचे अंत्यसंस्कार केले. सीमा एकदम उदास झाली होती. आईच्या फोटोकडे बघून रडतच होती. योगेशच्या बाबांनीच सीमाच्या आईच्या बाराव्याची तयारी केली आणि बाराव्याचे कार्य व्यवस्थित पार पडले. कावळाही थोडावेळ पिंडाला शिवत नव्हता. तेव्हा योगेशच्या बाबांनी “सीमाची काही काळजी करु नका. आम्ही तिला सांभाळू…!” असे म्हटल्याबरोबर कावळयाने पिंडाला चोच मारली. तेव्हा सगळ्यांनी निश्वास सोडला. कार्य करुन योगेशचे आई-बाबा गावी परत जाण्यास निघाले. “आता सीमा तू गावीच चल, तू आमच्याबरोबर रहा…!” योगेशची आई म्हणाली. “नाही आई, मी इथल्या लोकांचं कर्ज फेडत नाही तोपर्यंत मी इथून कुठे जाणार नाही…!” सीमा केसाचा अंबाडा घालत म्हणाली .“तू येत नाही तर योगेशला इथेच राहू देत. तू एकटी राहू नको…!” योगेशचे बाबा धोतरचा काष्टा मारत म्हणाले. सीमाने त्यांना चहा व नाश्ता दिला आणि थोडयावेळात आई बाबा बॅग घेऊन निघाले. योगेशने

बाबांच्या हातातून बॅग घेतली. “बाबा, तुम्ही पुढे व्हा. मी सर्व सामान उचलतो...!” असे म्हणून योगेश व सीमाने त्या दोघांना नमस्कार केला आणि योगेश स्टेशनवर सोडायला गेला. त्यानंतर सात आठ दिवस योगेश व्यवस्थित होता. त्यानंतर हळू हळू पुन्हा तो सुहासबरोबर हिंडू फिरु लागला. बारमध्ये जाऊन दारु पिऊ लागला. असेच एक दिवस एका मुलाचा चालताना धक्का लागला. आणि त्या छोटया कारणावरुन दारुच्या नशेत त्याला एवढे मारले की तो खाली पडून डोक्याला मार लागला आणि डोक्याला जखम होऊन रक्त वाहू लागले. लगेच सुहास त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. पोलीस केस झाल्याने योगेशला पकडून जेलमध्ये टाकले तिथेही योगेश दादागिरी करत होता. त्यामुळे जामिनावर सुध्दा सुटका होत नव्हती. योगेश जेलमध्ये असल्याचा फायदा घेऊन तो सीमाला योगेशविषयी सांगायला गेला. सीमा योगेशचीच वाट पहात चहा पीत होती. सुहासला बघताच तिने ताडकन् खुर्चीवरुन उठून त्याला विचारले “योगेश कुठे आहे...?” अग मी सर्व काही सांगतो, परंतु मला आत तर बोलवशील की नाही...? सुहास दारात उभा राहूनच बोलत होता. “हं ऽऽ हं, ये आत...!” असे म्हणून सीमाने बसायला खुर्ची पुढे केली. सुहासने खुर्चीत बसत योगेशविषयी रस्त्यात घडलेला प्रसंग सांगितला. सीमाने सर्व ऐकून निश्वास सोडला आणि डोक्याला हात लावत म्हणाली “हा कधी सुधारणार आहे देवास ठाऊक...!” असे म्हणून आपला चहाचा कप टेबलावर ठेवत स्वयंपाकखोलीत गेली. लगेच गॅसवर सुहाससाठी चहाचे आधण ठेवले आणि योगेश विषयी विचार करु लागली. तेवढया वेळात सुहासने सीमाच्या चहाच्या कपात गुंगीचे औषध टाकले. सीमा सुहासला चहा देऊन स्वतःचा टेबलावरील चहाचा कप घेऊन खुर्चीत बसली. चहा पीता पीता सीमाला डोळयावर झापड आल्यासारखे वाटू लागले. म्हणून तिने उठून तोंडही धुतले तरीही झापड येतच होती. म्हणून ती पुन्हा खुर्चीत बसली. टेबलावर डोकं टेकवलं. आणि लगेच झोपून गेली. सुहासने आवाज दिला परंतु सीमा काहीच बोलत नव्हती. तिला काही शुध्दच राहिली नव्हती. त्या संधीचा फायदा घेऊन त्या थोबाडीत मारल्याचा वचपा घेतला

होता. आपल्या वासनेची भूक भागवून सीमाचा सूड उगवला होता. सीमा गुंगीतच होती. सुहास दरवाजा लोटून निघून गेला. दोन तास झाले तरी सीमा शुध्दीत आली नव्हती. अजानक जाग आल्यासारखी सीमा अडीच तीन तासाने जागी झाली. तिला डोकं जड झाल्यासारखं वाटत होतं. बाकी काय झाले…? सुहास कधी गेला…? या विषयी तिला काहीच माहित नव्हते. ती उठली इकडे तिकडे बघितले. तिला एवढेच आठवत होते की सुहास आला होता. तिला आता पुन्हा सुहासची भीती वाटू लागली. तिला पुन्हा पुन्हा वाटत होते कि मी अचानक झोपून कशी गेले. मला चक्कर आली होती का…? असे अनेक विचार सीमाला भेडसावू लागले. संध्याकाळचे चार वाजले होते. सीमा योगेशला भेटण्यास पोलीस स्टेशनला गेली. योगेश रागानेच तिच्याकडे बघत होता कारण सीमा बऱ्याच वेळाने पोलीस स्टेशनला आली होती. एवढा वेळ ती कुठे होती…? या विचाराने त्याने सीमाला विचारले "मला पोलीसांनी दुपारी पकडले. सुहास लगेच तुला सांगायला आला होता आणि तू आता येतेस…?" तसं नाही योगेश, माझी तब्येत बरी नव्हती म्हणून मी येऊ शकले नाही…! सीमा म्हणाली. तिथून सीमा इन्स्पेक्टरकडे जाऊन योगेशला सोडविण्याचा प्रयत्न करीत होती परंतु योगेशने पोलीसांवर सुध्दा नशेमध्ये हात उचलला होता. त्याच्या या वागण्याने योगेश लवकर सुटण्यासारखे नव्हते. सीमा काही न बोलता घरी येत होती. रस्त्यात मला ती भेटली. तिने घडलेला सर्व प्रकार मला सांगितला. परंतु त्यावेळेला मी सुध्दा काही करु शकत नव्हते. कारण आमच्या अविनाशचेही लग्न जवळ आले होते. त्यामुळे माझ्याकडून काहीच मदत होण्यासारखी नव्हती. मात्र सावंत वहिनींचा निरोप तिला दिला. सावंत वहिनींना त्यांच्या समीरला सांभाळायला आणि घरातील काम करण्यासाठी एका बाईची जरुरी होती. मी सीमाला म्हणाले "बघ, तुला जमत असेल तर तू कर, ती माणसं सुध्दा चांगली आहेत" हो ऽऽ हो, मी जरुर करेन…! असे म्हणून सीमा घरी आली.

दुसऱ्या दिवशी सीमा सकाळीच माझ्याकडे आली होती. मी तिला घेऊन सावंत वहिनींकडे गेले. सावंत वहिनी पूजेला बसल्या होत्या. म्हणून आम्ही बाहेरच सोफ्यावर बसलो. समीर बाहेरच खेळत होता. आम्हाला बघून समीर आमच्या जवळ आला आणि अंगाखांद्यावर खेळू लागला. पाच मिनिटात समीरची आणि सीमाची ओळख झाली होती. समीर सीमाला आपल्या बोबडया बोलात इंग्लिश कविता म्हणून दाखवत होता. तेवढयात सावंत वहिनी आल्या. समीरला सीमाच्या मांडीवर बसलेला बघून हसत म्हणाल्या "अरे वा ऽऽ मैत्री सुध्दा झाली म्हणायची, चला बरे झाले, सीमाला घेऊन आलात...!" सावंत वहिनी माझ्याकडे बघत म्हणाल्या. "अहो ऽऽ सीमा मला अचानक भेटली म्हणून बरं झालं, नाहीतर मला तरी कुठे वेळ मिळतो तिच्या घरी जायला...!" मी म्हणाले काय घेणार चहा की कॉफी की सरबत? "आता काही नको, नुकताच नाश्ता करुन आम्ही निघालो, ही आहे सीमा, हिला कामाची गरज आहे. त्यासाठी तिला कामाला ठेवायला हरकत नाही. सीमा आपलं घर समजून काम करेल, हिला मी लहानपणापासून ओळखते विश्वासू आहे....!" असे म्हणून मी सीमाला काम दिले जेणेकरुन त्याचे तिला साडेतीन हजार रुपये पगार सावंत वहिनी देणार होत्या. दुसऱ्या दिवशी सीमा खुशीतच उठून घरातील सर्व कामे उरकून योगेशला डबा दिला आणि कामाला हजर झाली. समीरने सीमाला ओळखले आणि धावतच येऊन सीमाला बिलगला. लगेच सीमाने त्याला उचलून त्याचा पापा घेतला. समीर तिचा हात पकडून तिला दुसऱ्या रुममध्ये घेऊन गेला आणि आपली सर्व खेळणी काढून दाखवू लागला. तेवढयात सावंत वहिनींनी सीमाला बोलविले म्हणून स्वयंपाक खोलीत गेली. वहिनी कांदे पोहे बनवत होत्या. "मी काही मदत करु का?" नको ऽऽ नको, पोहे झालेच आहेत. तू समीरला पोहे भरव आणि तूसुध्दा खाऊन घे, आणि समीरला सांभाळ, म्हणजे माझं मोठं काम झालं म्हणायचं...! वहिनी गॅसवरुन पोहे खाली उतरवत म्हणाल्या. एवढयात संदीपभाऊ सुध्दा स्वयंपाक खोलीत आले. "अग, तू कुणाशी बोलत आहेस?" संदीपभाऊ टूथब्रशवर पेस्ट काढत म्हणाले. "अरे हो ऽऽ मी सांगायलाच विसरले, मी

समीरला सांभाळायला सीमाला ठेवले आहे. समीरलाही खेळायला कंपनी होईल...!" वहिनी सीमाला पोहे देत म्हणाल्या. सीमा कामाला रोज येत होती. योगेश जेलमध्येच होता. त्यालाही सीमा भेटून संध्याकाळी घरी येत होती.

नंदाच्या अभ्यास जोरात चालू होता. उमेशही बारावीची परीक्षा देत होता. त्यामुळे दोघंही अभ्यासात गर्क होती. परंतु आपल्या भावंडांच्या शिक्षणासाठी रेखा मोठया पेचात सापडली होती. सतिश म्हणजे कंपनीच्या सेठने रेखाला पैशाची मदत करुन बोलता बोलता तिची शिकार केली होती. वाटेल तसा तो तिचा फायदा उठवत होता. त्यामुळे रेखा एकदम बिझी झाली होती. रेखा अमितला तसेच सीमालाही भेटू शकत नव्हती. बघता बघता नंदाचे ग्रॅज्यूएशन पूर्ण झाले. रेखा ने जमा केलेले पैसे घेऊन नंदाचे सी.ए. च्या एन्ट्रन्स परीक्षेचे पैसे भरले. उमेशच्या ग्रॅज्यूएशनला टाईम होता. त्यामुळे उमेशसाठी पैशाची व्यवस्था करण्यास रेखाला टाईम मिळत होता. आर्थिक चणचण तशी कमी झाली होती. कारण आता नंदाही ट्यूशनस् घेऊ लागली होती. म्हणून रेखाने स्वत:साठी आणि नंदा साठी मोबाईल खरेदी केला. नंदा खुश होती. एकीकडे नंदा एन्ट्रन्स परीक्षेसाठी खूप मेहनत करत होती. ताईची मेहनत फुकट घालवायची नाही शिवाय तिला माहित होते की या परीक्षेचे रिझल्ट फार कडक लावतात. जेमतेम तीन चार टक्के रिझल्ट लागतो. तशी क्लासेसची जरुरत होती. परंतु पैशाच्या अभावी नंदा घरीच अभ्यास करत होती. नंदाला आपल्या ताईबद्दल फार गर्व वाटायचा कारण ताई स्वत: शिकली नाही. परंतु आम्हा भावंडांना शिकवत आहे. तसे पाहिले तर रेखाला शिकवण्यासाठी कोणी नव्हतेच म्हणून नंदाला तिचे वाईटही वाटत होते. एकदम कोवळया वयात तिने आमच्या सर्वांची जबाबदारी घेतली. रेखा कामाला जात होती आणि उशिरा घरी येत होती. परंतु रेखा पहिल्यासारखी दिसत नव्हती. जरा चूपचापच रहात होती. ही गोष्ट रेखाच्या आईच्या लक्षात आली होती. म्हणून एक दिवस तिने रेखाला विचारले "रेखा, कंपनीत

काम बरंच असतं का? आजकाल अशी चूपचाप का असतेस...? तब्येत तर ठिक आहे नं...?" "अगं आई, मी रात्री थकून येते तर मी काय बोलणार...?" रेखा आईचे समाधान करण्यासाठी बोलत होती. तरी रेखाच्या आईला जरा विचित्र वाटत होते. आपली मुलगी किती कष्ट करते, याचे तिला वाईट वाटत होते. तिचे बाबा असते तर ही वेळ तिच्यावर आली नसती असे स्वत:शी बोलून स्वयंपाकाला लागली.

सुहासला राकेशने आपल्या रुममधून काढून टाकले. त्यामुळे दोघांमध्ये वैमनस्य आले होते. सुहास पुन्हा आपल्या घरी राहायला गेला. आपलाच मुलगा म्हणून त्याला इंदू काकांनी त्याला घरात घेतले. परंतु त्याला एक अट घातली की उद्यापासून तुला कामाला जायला पाहिजे. तुझे बाबा तुला कामाला लावतील तिथे तू जा...! इंदूकाकी रागातच बोलत होत्या. सुहासने काम करण्याचे मान्य केले. दुसऱ्या दिवशी बाबांनी सांगितल्याप्रमाणे त्या कंपनीत कामाला जाऊ लागला. त्याच्या हातात पैसे येऊ लागले. त्यातून काही पैसे आपल्या आईच्या हातात देत होता आणि बाकी स्वत:च्या खर्चासाठी ठेवत होता. पुन्हा त्याचा रुबाब वाढू लागला होता. चांगले चांगले कपडे घालू लागला होता. एक चांगला मोबाईलही खरेदी केला. सुहासची वट वाढली होती. राकेश ज्या गोष्टीची वाट पहात होता ती गोष्ट समोर आल्याने त्याने लगेच एक फोटो सुहासला फॉरवर्ड केला. तो फोटो बघताच सुहासच्या पायाखालची जमीनच सरकली. तो फोटो होता तो सीमा आणि सुहासचा. त्याचबरोबर राकेशने फोनही केला की "हा फोटो मी योगेशला दाखवीन...!" घाबरुन जाऊन सुहासने राकेशला बऱ्याच विनवण्या केल्या. परंतु राकेश ऐकेना. तेव्हा राकेशने सुहासला ब्लॅकमेल करायच ठरवलं. जर तू मला दर महिन्याला पाच हजार देशील तर मी चूप बसेन, ही गोष्ट मी कुणाला सांगणार नाही...! सुहासला मान्य करण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. दर महिन्याला राकेश सुहासकडून पाच हजार रुपये घेत होता. सुहास पेचात सापडला होता. काय करावे काहीच

समजत नव्हते. हळू हळू राकेशची डिमांड वाढत होती. सुहास स्वत:च्या बचावासाठी पैसे देत राहिला.

एकीकडे सीमाची तब्येत बिघडत होती. उलटयांवर उलटया होत होत्या. दोन तीन महिने अंगावरच काढले. सावंत वहिनी सुध्दा बोलत होत्या "अगं सीमा, तब्येत ठिक नाही तर डॉक्टरकडे जाऊन ये नं, अशी अंगावर का काढतेस? तब्येतीची काळजी घे." तेव्हा सीमा डॉक्टरकडे गेली. डॉक्टरांनी सीमाला तपासून "तुम्हाला तीन महिने होऊन गेले आहेत, अभिनंदन," डॉक्टर सीमाकडे बघून हसत हसत म्हणाले. सीमाला काहीच समजेना. सीमाच्या लग्नानंतर योगेशच्या कुटुंबात चुलत काका स्वर्गवासी झाले होते. त्यामुळे सीमा व योगेशची लग्नाची पूजा राहून गेली होती. त्यामुळे त्यांचा संबंधच आला नव्हता. त्यामुळे हे कसे शक्य आहे...? या गोंधळात सीमा सुन्न झाली. सीमाचं डोकं गरगरायला लागले होते. त्याच विचारात न जेवताच सीमा झोपून गेली. सकाळी उठून पुन्हा कामाला गेली. तेव्हा सीमाला बघून "आता कशी आहे तब्येत..? औषध आणलंस का डॉक्टरकडून...?" "हो ऽऽ हो आता मी बरी आहे." सीमा म्हणाली. लगेच सीमा कामाला लागली. त्याच संध्याकाळी राकेशने सीमाला भेटायला बोलविले होते.त्याने कशाला बोलविले असेल...? कदाचित योगेशच्या सुटकेविषयी काही मदतीविषयी बोलायचे असेल, असा विचार करुन संध्याकाळी समीरला घेऊन गार्डनमध्ये जायचे ठरविले. त्यासाठी पटापट सर्व कामं आटपून घेतली. समीरही झोपला होता. तो उठल्यावर त्याचे आंघोळ, नाश्ता वगैरे सर्व करायचे होते. तोपर्यंत वहिनींची पूजेची तयार करुन ठेवली. "सीमा, आज संध्याकाळी समीरला घेऊन गार्डनला गेलीस तर पूजेसाठी जरा दुर्वा घेऊन ये...!" वहिनी म्हणाल्या. "हो ऽऽ हो नक्की घेऊन येईन...!" सीमा म्हणाली. तोपर्यंत समीरही उठला. त्याला सीमाने आंघोळ घातली. नाश्ता भरवला आणि समीरबरोबर खेळत बसली. परंतु सीमाचे लक्ष लागत नव्हते. मला दिवस कसे गेले या विचारनेच

ती अस्वस्थ झाली होती. तेवढयात तिला आठवले की ज्या दिवशी सुहास आला होता त्यादिवशी मी बराच वेळ झोपले होते. तसेच कंबरही दुखत होती. हे आठवून तिला सुहासचा संशय येऊ लागला. विचार करता करता दुपारचे तीन वाजले. समीरही खेळून खेळून दमला होता. दूध पीता पीता तो सीमाच्या मांडीवर झोपून गेला. संध्याकाळी समीर उठल्यावर त्याची गार्डनला जाण्यासाठी तयारी करु लागली. समीरही खुश होता. कारण त्याला गार्डनमध्ये खेळायला मिळणार होते. सीमा व समीर हळू हळू चालत चालत गार्डनला गेले. तिथे एका बेंचवर बसले होते. त्यांच्याच बाजूला एक वृध्द जोडपं बेंचवर बसलेलं होतं. समीर लगेच आजी-आजोबा म्हणत त्यांच्याबरोबर खेळू लागला. तशी त्यांची रोजची तोंड ओळख होतीच. समीर त्या आजी आजोबांबरोबर रमून गेला होता. म्हणून सीमाने "मी जरा जाऊन येते, असे सांगून ती तिथून निघाली. तोच आजी ओरडल्या "अगं, लवकर ये हं, उशीर करु नकोस...!" हो ऽऽ हो मी आलेच...! असे म्हणून सीमा तरातरा निघून गेली. ती कुठे गेली? काय झाले? काहीच समजले नव्हते. मी सुध्दा सीमाच्या विचारात अस्वस्थ झाले. पुढे काय झाले...? या विषयी मलाही जाणून घ्यायचे होते. परंतु केस चालू होती. केसची अंतिम सुनावणी मला ऐकायची होती. सीमाचा खून करणारा कोण आहे, हे जाणून घ्यायचे होते.

तो दिवस सुनावणीचा अंतिम दिवस होता. त्यामुळे कोर्टात गर्दी झालेली होती. रेखाही आली होती. आम्ही दोघी समोरच बसलो होतो. वकिलांचे प्रश्नांवर प्रश्न होऊन अंतिम निर्णय समोर येणार होता. न्यायाधिशांनी पेपर हातात घेतले होते. कोर्टात एकदम शांतता पसरली होती. सुहास कटाऱ्यात खाली मान घालून शरमेने उभा होता. थोडया वेळातच न्यायाधिशांनी हातोडा टेबलावर मारला आणि नाकावरचा चष्मा सरसावत पेपर वाचायला सुरवात केली. सुनावणी एक दोन तास चालू होती. त्यातून हेच सिध्द झाले होते की सीमा संदीपभाऊंच्या घरी कामाला

लागल्यापासून तीन चार महिन्यांत सीमाचे जीवन भरकटून गेले होते. थोबाडीत मारल्याचा सूड उगवण्यासाठी सुहासने सीमाला चहातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला होता. त्याचवेळी राकेश अचानक सीमाच्या घरी आला त्यावेळी सुहासची चप्पल दरवाजात बघून संशयाने खिडकीतून डोकावून बघितले. त्यावेळी सुहास सीमाबरोबर अश्लील चाळे करताना बघून त्याने आपल्या मोबाईलने व्हिडीओ तसेच फोटो काढून घेतले. त्या फोटोनेच तो सुहासला ब्लॅकमेल करुन पैसे वसूल करत होता. आणि त्या दिवशी सीमाला फोटो दाखवून ब्लॅकमेल करण्याच्या हेतूने राकेशने सीमाला आपल्या घरी बोलविले होते. त्याप्रमाणे सीमा, राकेशने का बोलविले म्हणून ती गार्डनमध्ये समीरला त्या आजी आजोबांकडे म्हणजे त्या वृद्ध जोडप्याकडे सोडून राकेशकडे गेली होती. तिथे राकेशने सुहास आणि सीमाचा फोटो तिला दाखवला. तेव्हा सीमाच्या सारा प्रकार लक्षात आला आणि लगेच ती सुहासकडे जाण्यास निघाली. तेव्हा राकेशने सीमाला पकडून मिठी मारण्याचा प्रयत्न केला. सीमा हातापाई करून ओरडू लागली."ए...ओरडलीस तर बघ, हा फोटो मी सर्वांना दाखवीन...!" असे म्हणून तिच्यावर जबरदस्ती करायचा प्रयत्न केला. तेव्हा सीमाला एक लाकडी क्रिकेटची बॅट दिसली तीच उचलून राकेशला मारायला गेली परंतु राकेशने ती बॅट हिसकावून घेतली. त्यावेळी सीमा दरवाजा उघडण्यासाठी धावत गेली तोच राकेशने तीच बॅट सीमाच्या डोक्यात पाठी मागून मारली आणि सीमा खाली पडली. परंतु ती कायमचीच. तिच्या डोक्याला मार लागून रक्तस्त्राव होऊन तिचा मृत्यु झाला होता. राकेश घाबरुन गेला. अरे, मी हे काय केले.....? आता काय करणार .....? म्हणून तो थरथरत्या हाताने दाराला कुलूप लावून गार्डनमध्ये गेला. त्याच वेळी ते वृद्ध जोडपं समीरला घेऊन आलेलं होतं. त्यावेळी राकेशची मन:स्थिती ठीक नव्हती म्हणून त्या वृद्ध जोडप्याने सीमाविषयी विचारल्यावर तो त्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्या वृध्द जोडप्याने समीरला आपल्या घरी नेले. आजोबांची तब्येत बिघडल्याने दोन दिवसानंतर समीरला त्यांनी पोलीसांच्या ताब्यात दिले. डयुटी संपवून

राकेश घरी आला आणि रात्री दोन वाजता राकेशने सीमाचा मृतदेह मंदिराच्या पाठच्या झाडीमध्ये लपवून ठेवला. राकेश सुहासला दोन तीन महिन्यांपासून ब्लॅकमेल करत असल्याने आता राकेशला इंगा दाखवलाच पाहिजे असा विचार करून सुहास सीमाच्या खुनाच्या दोन दिवसांनी राकेशकडे जाऊन त्याची कॉलर पकडून त्याला मारपीट करुन त्याने त्याचा मोबाईल काढून घेण्याचा प्रयत्न केला परंतु शेवटपर्यंत त्याला मोबाईल मिळाला नाही. म्हणून तो निघून गेला. सकाळी वॉचमन दिसत नाही म्हणून मंदिराचा भटजी चावीसाठी राकेशच्या रूमवर आला. परंतु दरवाजा न उघडल्याने आजूबाजूचे लोक जमा झाले. पोलीसला बोलावले गेले. दरवाजा तोडून पोलीस घरात शिरले. राकेश जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले होते. शेवटी पोलीसांनी त्याच्या घराती झडती घेतली तेव्हा कपाटात मोबाईल मिळाला. त्यात सीमा व सुहासचे अश्लील फोटो मिळाले व्हिडीओमध्ये सीमाची काहीच हालचाल नसल्याने सीमाला फसवून हे कारस्थान सुहासने केले हे सिद्ध झाले होते. राकेशच्या घरात क्रिकेट बॅटवर सुहासचे व राकेशच्या  हाताचे ठसे मिळाले. त्यामुळे राकेशने सीमाचा आणि सुहासने राकेशचा खून केला हे सिद्ध झाले. तसेच योगेश, सुहास व संदीपभाऊ यांची डी.एन्.ए. टेस्ट केल्याने सुहासने सीमावर बलात्कार केल्याचे सिद्ध झाले. सुहासला राकेशचा खून व सीमावर केलेला बलात्कार याबद्दल पन्नास हजार रूपये दंड व जन्मठेपची शिक्षा ठोठावली गेली.

योगेश आपली शिक्षा पूर्ण करून इथे राहण्यात काही अर्थ नाही असे समजून  आपल्या गावी निघून गेला. परंतु सीमाने आपल्या गरिबीशी झुंज देत शेवटी आपले जीवन संपविले होते. कळी फुलण्याआधीच ती विखरून गेली होती. खरंच गरिबी आणि त्यात शिक्षणाचा अभाव या कारणाने छोटया–छोटया कोवळया मुली कशा अत्याचाराला बळी पडतात हे माझ्या डोळयासमोरील जिवंत उदाहरण होते. सीमाने आपले शील सुरक्षित ठेवण्यासाठी मेहनतीची कामे करुन संघर्षमय जीवनाला

तोंड दिले होते. आपल्या कोवळया छोटया हाताने आपल्या परिवाराचा भार उचलला होता. परंतु या समाजातील वासनेने भुकेलेल्या कुत्र्यांनी तिच्या चारित्र्याचे लचके तोडून टाकले होते. रेखाचीही परिस्थिती तीच होती. नंदा सी. ए. च्या दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेला बसणार होती. तर उमेश एम.बी.ए. च्या पहिल्या वर्षाला ॲडमिशन घेणार होता. त्यासाठी रेखाला एक-दीड लाखाची गरज होती. रेखा विचारात होती. थोडे पैसे कंपनीकडून घेतले तर काही आईचे मंगळसूत्र विकून उभे केले. दिवस जात होते. नंदा जोरात अभ्यास करत होती. अचानक अमित आपल्या आर्केस्ट्राच्या दौऱ्यावरून आला आणि रेखाच्या घरी रेखाला भेटायला गेला. ‘‘काय नंदा, अभ्यास कसा चालू आहे ....?" अमित नंदाच्या टपलीत मारत म्हणाला. “अरे लागतं नं, तू एवढे दिवस कुठे होतास.....? तुझा पत्ता कुठे आहे...?"नंदा डोकं चोळत म्हणाली. “अगं, मी पुण्याला एका कार्यक्रमासाठी ऑर्केस्ट्रामधून गेलो होतो. तिथेच मला एक दीड महिना रहावे लागले." अमित म्हणाला. “मग तुला सीमाविषयी काहीच माहित नसणार." नंदा आपले पुस्तक बंद करत म्हणाली. का... काय झालं...? सगळे ठीक आहेत नं. ...? अमित जरा घाबरून म्हणाला. नंदाने सीमा विषयी सर्व काही सांगितले. “अरे बापरे, मी हे काय ऐकतो ...? मला विश्वासच बसत नाही. निदान फोन करून कळवायचं होतं." अमित म्हणाला. “उगाच तुला शॉक बसेल म्हणून कळवलं नाही, जे व्हायचे ते झाले परंतु सीमाच्या बाबतीत असं व्हायला नको होतं. "नंदा गंभीरपणे बोलत होती. सीमा चांगली मुलगी होती. तिच्या साधेपणाचा फायदा उठवला. आता बरं झालं जन्मभर सडेल तुरूंगात. त्यावेळी रेखा इथे नव्हती. ती कंपनीच्या कामानिमित्त बाहेर गेली होती. अमित उदास झाला होता. एक दीड तास बसून तो जायला निघाला. चल मी आता निघतो. अमित खुर्चीवरून उठत म्हणाला. तेवढयात नंदाने रेखाचा नवीन मोबाईल नंबर दिला. आणि म्हणाली या नंबरवर ताईला फोन कर. अमितने संध्याकाळी भेटण्यासाठी रेखाला फोन केला. परंतु तिला सतिशबरोबर जायचे होते. म्हणून ती अमितला भेटू शकली नव्हती. म्हणून अमित वारंवार तिला

फोन करत होता. परंतु रेखा उचलत नव्हती. उगाच माझ्यामुळे अमितची कोणी निंदा करेल हे रेखाला मान्य नव्हते. मी एक बार डान्सर मुलगी, उगाच अमितची बदनामी व्हायला नको या विचाराने ती अमितला टाळत होती. रेखाने सतिशविषयी अमितला काहीच सांगितले नव्हते. परंतु अमितने बाईक वरुन रेखा व सतिश जात असताना त्यांना बघितले होते. रेखाविषयी त्याला वाईट वाटले. परंतु अमित रेखाला काहीच मदत करू शकत नव्हता. भावंडांच्या शिक्षणासाठी जे काही रेखा करत होती, ती तिची मजबूरी म्हणून तो नाईलाजाने चूपचाप होता.

पोलिसांची धाड पडून बंद झालेला बार पुन्हा चालू झाला होता. अमितचा ऑर्केस्ट्रा पुन्हा चालू झाला. परंतु रेखा तिथे जाऊ शकत नव्हती. कारण सतिश कडून घेतलेले कर्ज डोक्यावर होते. एक वर्ष तर पैशाची बाजू सावरली गेली होती. परंतु पुन्हा दुसरे वर्ष हा चिंतेचा विषय होता. उमेशची दुसऱ्या वर्षाची फी भरायची होती. रेखाला या परिस्थितीचा सराव झाला होता. भावंडांचे शिक्षण होईपर्यंत मी हा मार्ग सोडू शकणार नाही. परंतु शिक्षण पूर्ण झाल्यावर माझा जगण्याचा उद्देश यशस्वी झाल्यानंतर दूर कुठेतरी निघून जायचे. हा तिचा विचार होता. रेखाने वयाच्या लहान वयात अजाणतेपणे हा मार्ग पकडला होता. परंतु या मार्गापासून दूर राहण्याचा प्रयत्न करूनही सीमाला वासनेने बरबटलेल्या नराधमांनी मुक्तपणे जगू दिले नाही. शेवटी काय झाले...? गरिबीच्या जाचात सापडून एका कोवळ्या मुलीचा आदर, सन्मान पायदळी तुडवला गेला नं....? कुठे गेला तो सन्मान...? ज्या स्त्रीजातीने शिवाजी राजांना जन्म दिला, महात्मा गांधींना जन्म दिला असे अनेक महापुरूष जन्माला येऊन भारत देशाचा इतिहास घडवला अशा त्या स्त्री जातीची केवढी मोठी प्रतारणा होत आहे! स्त्री एक उपभोगाची वस्तू समजून तिच्या कमजोरीचा फायदा उठवून चार वर्षाच्या बालिकेवर ही आज बलात्कार होत आहेत....! सीमा सारख्या मेहनतीने जगणाऱ्या मुली अथवा महिला स्वतंत्रपणे जगू शकत नाहीत. म्हणूनच ही व्यथा एका सीमाची नाही किंवा एका

रेखाची नाही तर या दुनियेत अनेक सीमा आहेत, अनेक रेखाही आहेत, अशांना कोण मदतीचा हात देणार....? त्यांच्या व्यथा कोण जाणणार ....? म्हणूनच आजही स्त्री सुरक्षित नाही. आपल्या इच्छेच्या पंखाने मुक्तपणे तसेच सुरक्षितपणे उडणारी स्त्री अजून जन्माला आली नाही की तिला जन्म घेऊ दिला नाही ....? गर्भातच तिचे पंख कापून तिचा जन्म घेण्याचा अधिकार हिरावून घेतात ....? रेखाच्या मनात सामाजिक व्दंव्द चालू होते. स्त्रीला अनेक कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते ते सुद्धा एकटयाने....! एकटयानेच ती आपल्या परिवाराचा भार आपल्या खांद्यावर उचलत असते. रेखानेही आपल्या जीवनाच्या बलिदानातून आपल्या भावंडांना आणि वयस्कर मातोश्रीला जीवदान दिले.... ही परिस्थिती जाणून रेखाने नंदाला शिकवून सक्षम बनविले जेणेकरून दुसरी रेखा जन्माला न येवो.

रेखा रोज सतिशला भेटत होती. त्यामुळे तिची प्रत्येक आर्थिक समस्या सुटत होती. नंदा व उमेशही आपल्या मेहनतीने यश संपादन करत होते. बघता –बघता नंदा सी. ए. ची फायनल परीक्षा पास झाली. ती चार्टड अकाऊंटंट झाली होती. रेखाला खूप आनंद झाला होता. नंदाही खुशीत होती. ताबडतोब तिला एका प्रायव्हेट कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून जॉब मिळाला. चाळीस हजार रू. पगार होता म्हणून नंदा खुश झाली. आता आपल्या ताईला काम करायला नको. एवढी वर्ष ताईने आमच्यासाठी खूप कष्ट काढले, आता मी ताईला आराम देणार. चांगल्या मुलाशी तिचे लग्न लावून देणार जेणेकरून तो माझ्या ताईला सुखात ठेवेल....! नंदा मनामध्ये स्वप्नांचे मनोरे रचू लागली. नंदाला आपल्या ताईच्या सत्य जीवनाची काहीच कल्पना नव्हती. नंदा रेखासाठी चांगल्या मुलाच्या शोधात होती. रेखासाठी स्थळ शोधताना एक मुलगा तिच्या नजरेत भरला. हा मुलगा इंजिनियर आहे, माझ्या ताईसाठी चांगला आहे ....! नंदा मनाशीच बोलत होती. स्वत:चा बिझनेस आहे, एकलता एक मुलगा आहे, घरची श्रीमंती आहे, स्वभावाने शांत आहे. नंदाने लगेच संपर्क करून

बरोबर आपल्या आईला घेऊन त्यांची भेट घेतली. रेखाचा फोटोही त्यांना दिला परंतु आठ-दहा दिवसांत त्यांना नकार आला. नंदा नाराज झाली. ताई आमची दिसायला सुंदर असूनही का नकार आला....? असो, परंतु ताईचं लग्न करूनच द्यायचं असा निश्चय केला होता. नंदाचे प्रयत्न चालूच होते. परंतु सगळी कडून नकारच येत होते असे का होते....? हे नंदाला समजत नव्हते. नंदा अपला जॉबही सांभाळत होती आणि रेखासाठी स्थळही शोधत होती. परंतु रेखाला यावेळी लग्न करायचे नव्हते. कारण रेखावर कर्जाचे ओझे होते. त्या ओझ्याखातर सतिश तिला ब्लॅकमेल करत होता. ही गोष्ट ती नंदाला सांगू शकत नव्हती. नंदा आता रेखाला आर्थिक मदत करत होती. घरातील परिस्थिती हळू हळू सुधारू लागली. उमेशची एम.बी.ए.ची फी नंदाने भरली तसेच ताईचं कर्जही हळू-हळू चुकतं करत होती. परंतु सतिशचे कर्ज रेखाला भारी पडले होते. त्या कर्जासाठी तिने आपले जीवन पणाला लावले होते. तसे तिला लग्न करण्यातला उत्साहही राहिला नव्हता. रेखा आपलं सर्वस्व गमावून बसली होती त्यामुळेच तिला लग्नाला नकार येत होता. दोन तीन वर्षात रेखाचे कर्ज नंदाच्या मदतीने चुकते झाले होते. रेखा आता सतिशच्या कंपनीतले काम सोडणार होती आणि एक चांगले जीवन जगण्याचा रस्ता पकडणार होती. कारण आता नंदा समजदार होती. तिला रेखाविषयी संशय येऊ लागला होता म्हणून तिने एक दिवस रेखाला विश्वासात घेऊन विचारले, “ताई तू खरं सांग तू कुठे कामाला जाते ....?” तेव्हा रेखा काहीच बोलली नाही. नंदाच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे हेच तिला समजत नव्हते. नंदा मनातून नाराज झाली होती. रेखाच्या काहीही उत्तर न देण्याच्या आविर्भावातून नंदा समजून गेली, आजपर्यंत ताईने केलेल्या त्यागाची सत्यता जाणून कशी घेतली नाही....? याची तिला खंत वाटली. ताईने आमच्यासाठी केलेल्या कष्टाची किंमत आज मला समजते आहे....! या विचाराने नंदाचे डोळे पाण्याने भरून आले. आज तिला समजले की ताईला लग्नासाठी नकार का येत होते. ताईच्या समोर उभी राहण्याची सुद्धा नंदाला हिम्मत होत नव्हती कारण ताईने आम्हा दोघा भावंडांना शिक्षण देऊन सक्षम

तसेच स्वावलंबी बनवले होते. स्वत: अंधारात राहून आमचे आयुष्य उजळून टाकले होते. आमच्या परिवाराला सावरले होते. रेखा विषयी आईला किंवा ऊमेशला काही सांगायचे नाही असे मनाशी ठरविले. दिवसांमागून दिवस जात होते. आणि अचानक नंदासाठी एक स्थळ आले. मुलगाही सी. ए. झाला होता. घरची स्थिती योग्य होती. मुलाला कुठलेही व्यसन नव्हते. जॉबही चांगला होता. नंदाची आई नकोच म्हणत होती. रेखाचं लग्न होत नाही तो पर्यंत नंदाचं कसं करणार....? असे आईचे मत ऐकून रेखा म्हणाली, नंदाचे जमत असेल तर उरकून घे, मला एवढयात लग्न करायचे नाही....! रेखा फणकाऱ्यात म्हणाली. नंदाही लग्नाला  तयार नव्हती. परंतु रेखाने तिला खूप समजावून तयार केली. मुलगी बघायचा प्रोग्राम झाला. मुला मुलीने एकमेकाला पसंत केले. आणि लगेच साखरपुडयाची तारीख ठरवली. एका महिन्यातच साखरपुडा होता. त्या दिवशी रेखाने नंदाला खूप सुंदर नटवले होते. जणू आपली मुलगीच या नात्याने रेखा तिचे सर्व काही बघत होती. संध्याकाळी सर्व पाहुणे मंडळी आली होती. त्यांत अमितलाही रेखाने आवर्जून बोलविले  होते. कार्यक्रमात सीमाची मात्र उणीव भासत होती. सीमाच्या आठवणीने रेखाच्या डोळ्यात पाणी आले. सीमा तिची खास मैत्रिण होती. शेवटचं तिला बघूही शकली नाही याची तिला वारंवार खंत वाटत होती. भटजी आल्यावर प्रोग्राम सुरू झाला. दिपक व नंदाने एकमेकांना अंगठी घातली. नंदा खूश होती. परंतु रेखाविषयी तेवढीच उदास होती. आज ताईचा साखरपुडा असता तर मला दुप्पट आनंद झाला असता....! असे तिचे मन म्हणत होते. साखरपुडयानंतर लग्नाचीही तारीख ठरली. लग्नाची तारीख एका महिन्यावरच ठरवली गेली. कारण दिपकला कंपनीच्या कामासाठी सिंगापूरला जायचे होते. बरोबर नंदालाही तो घेऊन जाणार होता. त्यामुळे नंदाने आधीपासून दीड महिन्याची रजा टाकून ठेवली होती. रेखा नंदाच्या लग्नामुळे खूप  खूश होती. लग्नाची शॉपिंग करण्यात दोघीही व्यस्त होत्या. मानपानाच्या साडया, स्वत:च्या परिवारासाठी कपडे, सोन्याचे दागिने, दिपक साठी

चेन व सूट याची खरेदी चालूच होती. रेखा आपल्या नंदाच्या लग्नात कसलीही उणीव ठेवणार नव्हती कारण घरातील हे पहिलेच लग्नकार्य होते.

उमेशही आता एम. बी. ए. ची लास्ट परीक्षा देऊन मोकळा झाला होता. रेखाला वाटत होते की उमेशही चांगला जॉब मिळून सेटल होऊ दे, म्हणजे त्याचेही लग्न करून मी मोकळी होईन. नंदाचे लग्न दोन दिवसांवर आले होते. नंदाला एक भीती होती की ताईविषयी दिपकला समजले तर लग्न फिसकटणार तर नाही....? त्यामुळे नंदा जरा टेंशनमध्येच होती. ही गोष्ट रेखाच्या लक्षात आली होती. जर लग्नात माझ्यामुळे काही विघ्न आले तर मी स्वत:ला माफ करणार नाही....! असे रेखा मनाशीच बोलत होती. लग्न सराईची धांदल सुरू झाली होती. पाहुण्यांची रेलचेल चालूच होती. आणि अचानक दिपकचा फोन नंदाला आला. हॅलो .. नंदा, मला तुझ्याशी थोडं बोलायचं आहे, तू मला एकदा भेट...! तेव्हा नंदा मनातून घाबरली. उद्यावर लग्न आहे आणि दिपकचा असा फोन कसा आला....? नंदा अस्वस्थ होत होती. नंदा पटकन चप्पल घालून दिपकला भेटायला गेली. दोघेही एका गार्डनमध्ये भेटले. नंदाचे हातपाय थरथरत होते. आपल्या कापऱ्या आवाजानेच नंदाने दिपकला विचारले आपण कशाला बोलाविले होते....? नाही... तसं काही नाही, परंतु एक शंका होती. त्यांच समाधान करायच होतं. त्याकारणाने तुला मी बोलावले....! दिपक समाधानाने बोलत होता, नंदा तुमची बहिण रेखा कुठे काम करते ....? कालच मला तिच्याविषयी समजले....! या विषयी मी तुम्हाला सांगणारच होते. परंतु तशी संधी मिळली नव्हती ....! नंदा विषयाला सावरतच म्हणाली. नंदाने जी सत्य घटना आहे ती दिपकला सांगून टाकली. दिपक ऐकता ऐकता गंभीर होत गेला आणि दीर्घ निश्वास सोडला. नंदा ही गोष्ट तुम्ही आम्हाला आधी सांगायला हवी होती. मी तर समजून घेईन परंतु आई-बाबांचे मी काही सांगू शकत नाही. मी तर त्यांना सांगणार नाही. दिपक समजदारीने बोलत होता. नंदानेही आपली बाजू सावरून दिपकचे समाधान

केले. नंदा घरी आली. परंतु तिचे मन स्थिर नव्हते. ताईची सुद्धा चूक नव्हती. त्यामुळे तिलाही दोष देता येत नव्हता. नंदाला सर्व बायकांनी हळद लावली. गाणी सुद्धा गात होते. सर्व खुशीत होते. परंतु नंदाच्या मनाच्या एका कोपऱ्यात भीती होती. परंतु ताईला याविषयी काही बोलायची हिम्मत होत नव्हती. आज जी मी आहे ती ताईमुळेच....! आधार नसता तर मी सी.ए. झाली नसती. उमेश सुद्धा एम.बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेऊ शकला नसता. ताईने केलेला त्याग हा सर्वात मोठा त्याग होता. लग्नाचा दिवस उजाडला. नंदा त्यादिवशी खूपच सुंदर दिसत होती. लग्नाचे सर्व विधी व्यवस्थित पार पडले. नंदा आपल्या सासरी जाणार होती. नंदाने आपल्या आईच्या तसेच रेखाताईच्या पाया पडून आशिर्वाद घेतला. सर्वाना सोडून जाताना नंदा सर्वाना मिठी मारून रडू लागली. रेखाने तिला सावरले. "अगं रडतेस काय ....? आम्ही आहोतच नं....... जेव्हा तुला आमची आठवण होईल तेव्हा तू कधीही येऊ शकतेस....! असे म्हणून रेखाने तिच्या मस्तकाला चुंबले व तिच्या डोळयातील पाणी पुसले. आई सुद्धा डोळे पुसत होती. पाण्याने भरल्या डोळ्याने नंदा सर्वाना टाटा करून दिपक बरोबर गाडीत बसली. शेवटपर्यंत नंदा वाकून वाकून सर्वांना बघत होती. हळू हळू गाडी नजरेआड झाली. नंदा नसल्याने घर सुने सुने झाले होते. नंदाची कमी सर्वांना जाणवत होती. आता रेखा जवळ तिची जिवलग मैत्रिण सीमाही नव्हती. आणि जीवाभावाची छोटी बहिण नंदाही नव्हती. रेखाला एकदम एकाकी वाटत होते. तरी रेखाला आपल्या जबाबदारीतून अर्धी जबाबदारी संपल्यासारखी वाटत होती.माझा नाही परंतु माझ्या छोट्या बहिणीचा संसार थाटायला सुरूवात झाली होती. यातच रेखाला मनापासून समाधान वाटत होते. चार पाच दिवसानंतर रेखा पुन्हा डान्स बारमध्ये जाऊ लागली होती. दिवसांमागे दिवस जात होते. दिपकबरोबर नंदाही सिंगापूरला गेली.

डान्सबार  वर पुन्हा पोलीसांची धाड पडली आणि सात आठ मुली पकडल्या गेल्या. दोन तीन तासाने बारच्या मालकाने येऊन जामिनावर सगळयांना सोडवले. त्यात रेखाही होतीच. सगळ्याजणी पोलीस स्टेशनबाहेर जात असताना एका इन्स्पेक्टरने रेखाला बोलवले. रेखा घाबरतच त्याच्या टेबलाजवळ जाऊन उभी राहिली. इन्स्पेक्टर रेखाकडे बघून बोलला, ‘‘क्या तुम यह काम छोड नही सकती.... ? ’’ लगती तो हो अच्छे घर की, देखो, तुम यह काम सचमुच छोडना चाहती हो तो मै तुम्हे एक अच्छा काम दिलाता हूँ....! एक प्रिटींग प्रेस है वहा एक लडकी की जरूरत है, वहा जाके तू मेरा यह कार्ड दिखा देना तो वह आदमी तुझे रख लेगा....! रेखाने ते कार्ड घेऊन प्रेसमध्ये गेली. तिला कामही मिळाले. रेखा खुश झाली. रेखा नियमितपणे कामाला जात होती. असेच कामावरून येताना तिला तो इन्स्पेक्टर भेटला. ‘‘ कोई घरकाम करने लिए बाई मिलेगी  क्या ...? सिर्फ पंधरा दिन के लिए चाहिए....!’’ इनस्पेक्टर बाईक वरून उतरत म्हणाला. ठीक है मैं देखती हूँ....। असे म्हणून रेखा चालू पडली पंधरा दिवसांची तर गोष्ट आहे मीच करून देईन नं .... रेखा मनातल्या मनात बोलत होती. रेखाने दुसऱ्या दिवशी कामावरून येताना त्याच्याकडून चावी घेतली. आणि दररोज येऊन ती त्याच्या घरातील सर्व काम करून घरी जात होती. असेच एक दिवस रेखा संध्याकाळी त्याच्या घरात काम करत असताना इन्स्पेक्टर आला. ड्रेसवर चहा सांडला म्हणून बदली करायला आला. थोडी चाय बनाके दोगी क्या....! हा .. हा.. क्यु नही.... ? रेखा किचनकडे जात म्हणाली. रेखाने चहासाठी लगेच आधण ठेवले आणि उकळी येई पर्यंत उभी राहिली. तेवढयात इन्स्पेक्टर ने तिला मिठीत  घेतली. रेखाने लगेच  सुटण्याचा प्रयत्न केला आणि त्याला जोरात ढकलून दिले. ‘‘ अरे, तू तो बार डान्सर का काम करनेवाली, बार में तूझे कितने मर्द हात लगाते है और मुझे हकाल देती है ....! मैने ऐसेही तुझे काम पे लगाया क्या.... ? उसका मै वसूल तो जरूर करूंगा। असे म्हणून पुन्हा त्याने रेखावर झडप घातली परंतु रेखा धावत येऊन दार

उघडून निसटून गेली. पर्समध्ये त्याची चावी द्यायची होती ती द्यायची राहून गेली. बारमध्ये काम केल्याने लोकांच्या नजरा किती बदलून जातात. तिची परिस्थिती कुणी समजून घेत नाही. उलट तिच्या अगतिकतेचा फायदा घेऊन आपली भूक कशी भागवता येईल याचा विचार करतात. रेखाच्या मनात अनेक विचार तिला सलत होते. तिचे मन अस्थिर होऊन गेले म्हणून दोन तीन दिवस कामाला गेली नाही. दोन तीन दिवसानी रेखा चावी परत करायला म्हणून सकाळी कामाला जाते वेळी इनस्पेक्टरच्या घरी गेली. दाराला कुलूप नव्हते म्हणून तिने दारावरची बेल वाजवली. तेव्हा एका स्त्रीने आपल्या दोन तीन महिन्याच्या बाळाला आपल्या कुशीत सावरत दार उघडले. रेखा क्षणभर काही न बोलता तिच्याकडे बघतच राहिली. “ कौन हे.... ? कौन चाहिये .... ?” असे त्या स्त्रीने रागानेच रेखाला विचारले. पाठोपाठ इन्स्पेक्टरही येऊन ऊभा राहिला. ती इन्स्पेक्टरची बायको असावी असा तर्क करून रेखाने चावी दिली. यह औरत कौन है.... ? हमारी चाबी इसके पास कैसे.... ? असे त्या स्त्रीने संशयानेच इन्स्पेक्टरला विचारले. “गुस्सा मत करो, यह तो कामवाली है। इसलिए उसको चाबी दिया था।” अच्छा.. अच्छा तो अंदर आ जाना .... ! ती त्याची बायको म्हणाली. परंतु रेखा तिथे उभी राहिली नव्हती. ती लगेच कामावर निघून गेली. प्रेसमध्ये तिचे लक्ष लागत नव्हते. त्या दिवशी तिला तिची खरी किंमत कळत होती. स्वत:ची बायको असतानाही बाहेरच्या मुलीवर नजर टाकायला या पुरूषांना शरम वाटत नाही. असे विचार येऊन रेखा रागात होती. तेवढीच ती दु:खीही झाली. एकदा बारमध्ये काम केले की तो एक शिक्काच लागून जातो मग चांगल्या ठिकाणीसुद्धा त्या मुलीला काम करण्याची संधी मिळत नाही. हा समाज तिला सुधारण्याची संधी देत नाही.

उमेश एम.बी.ए. करून सीमेन्स कंपनीत जॉब करत होता. तीन चार वर्षांनी तो सेटलही झाला. रेखाला आता त्याच्या लग्नाचे टेंशन होते. बऱ्याच मुली बघितल्या परंतु कुठूनही होकार येत

नव्हता. रेखाला काळजी वाटत होती.  तिचे मन तिला खात होते. उमेशला मुलगी का मिळत नाही....? डान्स बारमध्ये काम कराणाऱ्या मुलीच्या घरात मुलगी कशी द्यायची....? घराणं चांगलं नाही... असा विचार लोकांचा सहाजिकच होतो परंतु सत्य काय आहे....? हे कोणी जाणून घेत नाही म्हणून रेखाने घर सोडून जाण्याचा  विचार केला. परंतु घरातले या गोष्टीला मान्यता देतील का ....? हा मोठा प्रश्न होता. तरी सुद्धा माझ्या छोटया भावासाठी मला हे करायलाच हवे. तरच उमेशचे लग्न होईल असे रेखाचे मन म्हणत  होते. त्यानुसार रेखाने आपल्या आई जवळ थोडीशी कल्पना दिली. ‘‘आई, आमची प्रेस आता पुण्याला जाणार आहे तर कादाचित तिथे मला जावे लागेल’’. काही नको, तुला कुठे जायची आता गरज नाही. तू आता काम सोड आणि घरी बस....! आई फणकाऱ्यातच बोलत होती. ‘‘अगं आई, मी कायमची थोडीच जाणार आहे ....? थोड्या दिवसांचा तर प्रश्न आहे ....! ’’  रेखा म्हणाली. परंतु रेखाला असे करावेच लागणार होते म्हणून रेखा हळू हळू उमेशच्याही कानावर ही गोष्ट घालण्याचा प्रयत्न करीत होती. उमेश हे ऐकून चूपचाप होता. थोड्या वेळाने म्हणाला, ‘‘ताई, तू आता आराम कर. मी कमवायला लागलो आहे नं. ....? मग तुला कामाला जायची काय गरज आहे ....? ’’ उमेश रेखाची सत्य परिस्थिती समजून होता. कितीही झालं तरी ती त्याची ताई होती. आणि ताईनेच आपल्याला जीवन दिले, इज्जत दिली, सन्मान दिला. परंतु आपले स्वत:चे सर्वस्व हरविले. याबद्दल उमेशला ताईसाठी वाईट वाटत होते. उमेश ताईला सोडायला तयार नव्हता. रेखा त्याची समजूत घालत होती. तरी उमेश मान्य करत नव्हता.

रेखा आता घरीच  रहात होती. उमेशच्या लग्नासाठी प्रयत्न करत होती. अखेरीस एक स्थळ उमेशसाठी चालून आले. बघण्याचा प्रोग्राम झाला. देण्या घेण्याच्या गोष्टी झाल्या. साखरपुडयाची तारीख ठरली. रेखाने नंदाला फोन करून उमेशच्या साखरपुडयाविषयी कळविले.

परंतु दिपकने साखरपुडयाला जाण्यास विरोध केला. त्यामुळे नंदाचा नाईलाज झाला. आपल्या छोट्या भावाचा साखरपुडा होणार आणि मी बहिण जाणार नाही ही गोष्ट नंदाला फार खटकत होती. रेखाच्या गैर चारित्र्यामुळे दिपक त्यांच्याशी संबंध ठेऊ इच्छित नव्हता. आता न येण्याचे कारण काय सांगावे हा नंदाला मोठा प्रश्न पडला होता. नंदा दिपक पुढे काहीच बोलू शकत नव्हती. रेखाची बाजू सकारात्मक रीतीने मांडूनही दिपकच्या मनात रेखाविषयी अढी होती. नंदाने रेखाला रजा मिळत नाही तरी येण्याचा प्रयत्न करते, असे फोन वर सांगून रेखाचे व उमेशचे समाधान केले. साखरपुडयाचा दिवस उजाडला. संध्याकाळी पाहुणे मंडळी, मित्र संबंधी येऊ लागले. संध्याकाळी बरोबर पाच वाजता भटजी येऊन मुला मुलीने एकमेकांच्या बोटात अंगठी घातली. विधीनुसार कार्यक्रम संपन्न झाला. रात्री सर्व जेवून मग एकमेकांचा निरोप घेतला. नंदानेही फोन वरून साखरपुडयाच्या उमेशला शुभेच्छा व्यक्त केल्या. तेव्हा उमेशच्या लक्षात आले कि भावोजींनी फोन केला नाही. आता रेखाची साखरपुडा झाल्याने बरीचशी जबाबदारी पार पडली होती. लग्नात उगाच विघ्न नको म्हणून रेखा कुठे बाहेर पडत नव्हती. साखरपुडयाच्या तीन चार दिवसांनी अचानक उमेशच्या सासऱ्यांचा उमेशला फोन आला. “आम्हाला खेद वाटतो, तरी पण सांगणे जरूरीचे आहे, आम्हाला आताच समजले की तुमच्या बहिणीचे चारित्र्य ठिक नाही. त्यामुळे आम्ही आमची मुलगी तुमच्या घरात देऊ शकत नाही, आमच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. तरी क्षमस्व …! ” उमेश एकदम सुन्न होऊन गेला. त्याला अशा अचानक आलेल्या फोनमुळे काय बोलावे काहीच समजेना. आता ही गोष्ट घरात कशी सांगायची, याचे उमेशला टेंशन आले. दोन दिवस त्याने कुणालाच काही सांगितले नाही. मात्र त्याने नंदाला फोन करून ही गोष्ट सांगितली. नंदाला ज्या गोष्टीची भीती होती तीच गोष्ट समोर आली होती. परंतु यामध्ये दोष कुणालाच देता येत नव्हता. उमेश आताच तू घरी काही बोलू नकोस, वेळेनुसार जेव्हा समजेल तेव्हा तू सावरून घे….! नंदा उमेशचे समाधान करत होती. रेखाविषयी आईला समजले तर आईला धक्काच बसेल. या विचाराने उमेश चलबिचल

झाला होता. महिना होऊन गेला तरी उमेश घरात काहीच बोलत नव्हता. परंतु आईने उमेशला विचारले “अरे, तिथून काही फोन आला की नाही....? मान पानाच्या विषयी काही सांगितले का ....? ” अगं त्यांचा काही अजून फोन आला नाही ....! एवढे बोलून उमेश चूप बसला. आईने दोन तीन वेळा प्रश्न विचारूनही उमेश काहीच उत्तर देत नव्हता म्हणून आईला संशय आला. आईने ही गोष्ट रेखाला सांगितली. रेखाने त्याला विचारले परंतु उमेश काहीच बोलत नव्हता. शेवटी उमेशने रेखाला त्या मुलीचे एका मुलाबरोबर प्रेमप्रकरण आहे म्हणून मी या लग्नला विरोध केला आहे.मला त्या मुलीशी लग्न करायचे नाही....! उमेश गंभीरपणे बोलत होता. परंतु रेखाला संशय आला की उमेश काहीतरी लपवत आहे. त्या मुलीचे दुसऱ्या मुलाबरोबर प्रेमप्रकरण असते तर तिने साखरपुडा होऊ दिला नसता. साखरपुडा होईपर्यंत तिने ही गोष्ट का सांगितली नाही....? बाहेरच्या बाहेर त्या मुलीला भेटावे का....? विचारून तर बघावे....! या विचाराने शांतपणे दोन दिवस रेखा विचार करत होती. रेखाने याविषयी आईला काहीच सांगितले नाही. उगाच टेंशन घेऊन आई आजारी पडायची म्हणून रेखाने नंदाला फोन केला. नंदाला हा सारा प्रकार उमेशकडून समजलाच होता. परंतु नंदाने काहीच माहीत नाही असे दाखविले आणि रेखाला कुठे काही विचारायला जाऊ नकोस म्हणून सांगितले. तरी रेखाला उमेशची काळजी वाटू लागली. म्हणून सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी रेखाने त्या मुलीला बाहेर फोन करून बोलावून घेतले आणि तिला विचारले. परंतु ती काहीच बोलत नव्हती. कारण लग्न मोडण्याचे कारण वेगळे होते. आणि रेखा तिला दुसरे काही बोलत होती. परंतु रेखाला कुठल्या शब्दांत सांगणार या संभ्रमाने ती चूप बसली. तिच्या चूप बसण्याचा अर्थ समजून रेखाने उमेशच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. आणि घरी परत आली. शेवटी आईला ही गोष्ट सांगायलाच हवी म्हणून तिने आईला शांतपणे समजावून ही गोष्ट सांगितली. “आई, आता काही विचार करू नकोस आपण दुसरी मुलगी बघूया ....! उगाच विचार करून तब्येत खराब करून घेऊ नकोस ....!” रेखा म्हणाली.

नंदाला दिवस जाऊन दोन महिने झाले होते. त्यामुळे नंदा आता सिंगापूरलाच दूसरा जॉब करू लागली. कसेही करून बाळंतपण माहेरी होण्यासारखे नव्हते. कारण दिपक महेरी पाठवणार नव्हता. परंतु उमेशच्या लग्नाविषयी नंदाला काळजी वाटणे साहजिकच होते. नंदाला वाटत होते की उमेशला जर इकडचीच सिंगापूरची मुलगी बघावी म्हणजे काही प्रॉब्लेम येणार नाही. परंतु उमेशच्या जॉबचा प्रश्न होता. त्यामुळे नंदालाही उमेशच्या लग्नविषयी काय करावे काही समजत नव्हते. आईने रेखाला भाजी आणायला मार्केटला पाठविले होते तेव्हा नंदाची सासू रस्त्यात रेखाला भेटली होती. ‘‘काय ग, रेखा कशी आहेस ....? बऱ्याच दिवसांनी दिसलीस ....! आमच्या सूनबाईला दिवस गेले आहेत, मग तिचे बाळंतपण कुठे होणार ....? दिपक तर नंदाला माहेरी सोडेल की नाही ही शंका आहे ....! ’’ नंदाची सासू रेखाला मुद्दामच खोचून बोलत होती. परंतु यातील रेखाला काहीच माहित नव्हते. परंतु तिने तसे न दाखवता म्हटले, ‘‘हो.. हो.., आम्ही तिचे बाळंतपण करू नं, तसेही पहिले बाळंतपण माहेरीच असते ....!’’ रेखा हसत हसत म्हणाली. तरी ती आतून नाराज होती. कारण ही गोष्टी रेखाला जाणून बूजून नंदाने कळविली नव्हती. आणि काय गं, उमेशचं लग्न मोडलं असं ऐकलं, खर आहे का....? अस काय कारण झालं ....? रेखाने सर्व काही सांगितले परंतु नंदाच्या सासूने म्हटले, ‘‘नाही, आम्हाला तर दुसरेच कारण समजले. कारण उमेशची मुलगीही आमच्याच दूरच्या नात्यामधली आहे ....!’’ असे नंदाची सासू बोलत होती. मग काय कारण आहे ....? रेखा अस्वस्थ होत म्हणाली. तेव्हा नंदाची सासू तावातावाने बोलू लागली. तुम्ही लोकांनी आम्हालाही फसवलंत. तुझ्या विषयी आम्हाला आधी समजले असते तर तुमच्या नंदाला आम्ही स्वीकारलं नसतं ....! आणि म्हणूनच दिपक नंदाला माहेरी पाठवायाला तयार नाही. उमेशच्या लग्नालाही आम्ही कोणी येणार नाही. तुझ्यामुळे आमच्या घराण्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न येतो, तुझ्यामुळे लोक आम्हाला काळं फासतील, आता तू कुठे दूर निघून जाशील तर उमेशचे

लग्न होईल नाहीतर अशा घराण्यात कोण मुलगी देणार ....? असे म्हणून ती तरातरा निघून गेली. रेखा मात्र तिच्याकडे एकटक सुन्नपणे पहातच राहिली.तिचे एक एक शब्द रेखाच्या कानात आग ओतत होते. तिला ते असहय झाले. उमेशही तिच्याशी खोटं बोलला होता आणि नंदानेही दिवस गेल्याचे तिला कळविले नव्हते. या विचारातच रेखा जमिनीला पाय खिळल्यासारखी स्तब्ध उभी राहिली होती. डोळ्यात आलेले पाणी पूसत इकडे तिकडे बघून हलकेच घरचा रस्ता पकडला. भाजी घ्यायची विसरूनच गेली. हे लक्षात येऊन मिळेल ती भाजी पटापट घेऊन घरी आली. आई दारातच उभी राहून रेखाची वाट पहात होती. रेखाच्या हातातील भाजीची पिशवी घेत आई म्हणाली "रेखा, एवढा ऊशीर का झाला ...? दुसरीकडे कुठे गेली होतीस का ...? " "नाही गं आई, एक मैत्रिण भेटली होती तर बोलता बोलता वेळ झाला ...!" रेखा खोटं बोलतच स्वयंपाक खोलीत गेली. बाथरूममध्ये हात पाय धुऊन स्वयंपाकाला लागली. परंतु तिचे मन कशातच लागत नव्हते. तिला तिचेच मन खात होते. आपल्यामुळे उमेशचे लग्न मोडले याची तिला खंत वाटत होती. तसेच नंदाही आता माहेरी येणार नाही याचे रेखाला वाईट वाटले. तिचे मन तिला हीच ग्वाही देत होते की माझ्या शिक्षणाच्या अभावाने मला त्यावेळी हा चुकीचा मार्ग पत्करावा लागला. माझ्यावर त्यावेळी जबाबदारी मोठी होती मला शिक्षण द्यायला कोणी नव्हते. मला शिक्षणाची आवड तर होतीच परंतु ती पूरी करण्यास कुणाचा आधार नव्हता. शिक्षणाचे महत्व जाणत होते म्हणूनच माझ्या भावडांना शिक्षण देऊन सक्षम बनविले आणि माझ्यामुळेच जर त्यांच्या आयुष्यात अडथळे येत असतील तर माझ्या आयुष्याचे बलिदान व्यर्थ जाईल. त्यासाठी त्यांच्या जीवनावर माझी सावली देखील मी पडू देणार नाही... माझी मैत्रिण सीमाही परिस्थितीने गरीब होती. तिने आपले जीवन चांगल्या मार्गाने जाऊन आपल्या परिवाराला सांभाळण्याचा प्रयत्न केला. तरीसुध्दा या समाजातील नराधमाने तिला जगण्याचा अधिकार दिला का ...? रेखाच्या मनात उलटे सुलटे विचार येऊन मनस्थिती चलबिचल

होत होती. यातून कसा मार्ग काढायाचा ही मोठी समस्या रेखा समोर आली होती. आईचे कसे समाधान करायचे आणि या गोष्टी तिच्या समोर कशा मांडायच्या हा मोठा प्रश्न होता.

रेखाला विचार करून मनाला ताण पडत होता. आई समोर जाऊन सर्व काही सांगायची हिम्मत होत नव्हती. आजवर परिवारासाठी जे काही केले होते त्यावर पाणी पडणार होते. आईच्या नजरेतून मायेची ममता विरून जाणार होती. यांची रेखाला भीती वाटत होती. रेखाच्या मनावर दडपण येत होते. ते दडपण असहय होऊन रेखाने घर सोडून जाण्याचा विचार केला. त्या प्रमाणे रेखा संधीची वाट पहात राहिली आणि एक दिवस आई मंदिरात गेली असताना उमेशही कामाला निघून गेला होता. त्यावेळी संधीचा फायदा घेऊन रेखाने आपले कपडे बॅगेत भरली. थोडे फार पैसे जवळ ठेऊन एक चिठ्ठी लिहून टेबलावर ठेऊन घराबाहेर पडली. त्यावेळी घराबाहेर पाऊल बाहेर ठेवताना रेखाचे डोळे पाणावले. त्या घरात आपलं बाळपण आणि तारूण्य गेलं त्या घराला सोडून जाताना तिचे आयुष्यातील सारे क्षण डोळ्यासमोर तरळू लागले. आपल्या भावंडांचा सहवास त्यांच्यातलं हसणं, रडणं, बागडणं यांचे क्षण मोहपाशात पाठी खेचू लागले. पाऊल पाठी जात होतं परंतु पुढचा रस्ता जबरदस्तीने पकडायचा होता. पुढे पुढे जायचे होते परंतु आईच्या मायेची ममता सोडत नव्हती. एवढयात आई येईल म्हणून रेखाने स्वत:ला सावरलं आणि एक एक पाऊल पुढे टाकत साऱ्या आठवणींना मागे टाकत जीवनाच्या नवीन प्रवासाला सुरवात केली. रेखा आता एकदम एकटी पडली होती आणि एकटयानेच आलेल्या परिस्थितीला तोंड द्यायचे होते. रेखा बाहेर तर पडली पण जायचे कुठे...? अमित तिचा जवळचा मित्र होता त्याला सुद्धा तिने दूर ठेवले होते की जेणकरून त्याचे जीवन आपल्यामुळे बदनाम होऊ नये. परिस्थिती अशी होती की डान्सबारमध्ये काम केल्याने रेखाची बदनामी झाली होती. अशा वेळी तिला कुणीही आधार देण्यासारखे नव्हते. हे रेखा ओळखून होती. शेवटी तिला बारमध्ये काम करणारी माया ही तिची मैत्रिण एकटी रहात होती.

परंतु ती आता पुण्याला रहात होती. तिची आठवण झाली. तिचे आईवडील आणि एक भाऊ व बहिण गावी  होते. माया छोट्या गावात राहणारी, घरची परिस्थिती गरिबीची म्हणून गाव सोडून मुंबईला कामाच्या शोधात आली. मुंबईची रोषणाई हॉटेल्सची रंगत, मौजमजा, पैसा बघून खोटया दुनियेत माया अडकून गेली होती. पैसा कधी बघितला नव्हता.  ती पैसा कमवू लागली. परिवाराच्या गरजा पुरवू लागली.परिवारातिल लोक  खुश होते. बहिण भावाचे शिक्षण होऊ लागले. यातच मायाला समाधान वाटत होते. वय लहान असल्याने पाहिजे तेवढी समज नव्हती. हळू हळू त्या  दुनियेत मुरून गेली. पूर्ण समज आली तेव्हा यातून बाहेर निघू म्हणता बाहेर पडू शकत नव्हती. तशीच रेखाची गत झाली होती. रेखा मायाच्या घरी गेली.  दारावरची बेल दाबताच  दार उघडले गेले आणि समोर एक  बारा तेरा वर्षांची सुंदर  गोरी गोमटी मुलगी  समोर आली. अगदी मायाचा चेहरा घेतला होता. रेखा जरा गोंधळून गेली. रेखाने त्या मुलीकडे बघत विचारले, ‘‘माया आहे कां, …?’’ मम्मी कोण आलंय…! तेवढयात माया दरवाजात  डोकावून बघू लागली, कोण आहे …? ‘‘ अरे, रेखा तू … किती वर्षांनी भेटतेस, ये .. ये आत ये …!’’ असे म्हणत मायाने हात पकडून रेखाला आत घेतले. क्षणभर दोघी हातात हात गुंफून एकमेकींकडे प्रेमाने बघतच राहिल्या. दोघींच्या डोळयात बऱ्याच वर्षांनी भेटल्याचा आनंद दिसत होता. त्या आनंदात दोघींचे डोळे पाण्याने भरून आले ‘‘अगं, ही बॅग वगैरे घेऊन कुठे चाललीस, की कुठून आली आहेस…?’’ रेखाने मायाच्या प्रश्नाला काहीच उत्तर दिले नाही. तेव्हा मायाच स्वत:शी म्हणाली, मी पण काय आहे…? ‘‘तुला पाणी सुध्दा दिले नाही आणि प्रश्नावर प्रश्न विचारतेय…! मनिषा जा जरा मावशीला पाणी घेऊन ये बेटा …! मनिषा लगेच पाण्याचे तांब्या भांडं घेऊन आली. रेखाने पाणी पिऊन ग्लास  टेबलावर ठेवतच इकडे तिकडे नजर फिरवली – घरात कुणीच दिसत नव्हते. तेवढयात मायाने विचारले ‘‘काय म्हणतेस …? कशी आहेस …?’’ असे विचारत माया चहाचं आधण ठेवायला आत गेली.

ती मुलगी म्हणजे मायाची मुलगी मनिषा होती. रेखा समजून गेली मनिषा काहीच बोलत नव्हती. म्हणून रेखानेच तिला विचारले काय करतेस तू...? मी सातवीला आहे. मी हॉस्टेलला असते. सुट्टी आहे म्हणून आईला भेटायला आले ...! मनिषा शांतपणे बोलत होती. तेवढयात माया चहा घेऊन आली बरोबर कांदे पोहे सुद्धा होते. ते बघून रेखा म्हणाली, एवढं कशाला बनवत बसलीस, नुसता चहा चालला असता ...! घे ग, एवढया लांबून आलीस ...! माया म्हणाली. मनिषाविषयी रेखाला जाणून घ्यायाची उत्सुकता होती. त्या उत्सुकतेनेच तिने मायाला विचारले की काय लग्न केलेस काय ...? नाही ग, आपल्या सारख्यांशी कोण लग्न करणार...? माया उदास होऊन म्हणाली. तेवढयात मनिषा समोर आहे बघून मायाने मनिषाला होमवर्क कर जा ...! असे म्हणून मनिषाला बाहेर पाठविले. मायाने डोळयात आलेले पाणी पदराने हलकेच टिपले आणि म्हणाली, रेखा आपल्यासारख्यांना या समाजात काहीच स्थान नाही. जो पर्यंत हे तारूण्य आहे तो पर्यंत आपली किंमत आहे. पुढे आपलं काय...? म्हणूनच जेव्हा मला दिवस गेले तेव्हा मी विचार केला या गर्भाला पाडायचं नाही. त्याला या दुनियेत येऊ द्यायचं. खूप शिकवायचं आणि सक्षम बनवून त्याचं सुशील जीवन साकारायचं म्हणूनच मी मनिषाला जन्म दिला. तिला चांगले संस्कार मिळावे म्हणून तिला हॉस्टेलवरच ठेवले आहे. हॉस्टेल सुद्धा सरकारी आहे. त्यामुळे जास्त खर्चही येत नाही. मी तिला एका दिवसाच्या वर इथे ठेवतही नाही. काल रात्रीच ती इथे आली, आज रात्री तिला तिथे सोडून येणार...! तिलाही माझी आठवण येते नं...! माया हे सर्व आत्मविश्वासाने बोलत होती. रेखाला मायाचे विचार ऐकून खूप बरं वाटलं. रेखा आता तुझी खुशाली सांग...! घरचे सगळे कसे आहेत...? मायाने विचारले. रेखाने आपल्याविषयी सर्व सांगितले. रेखाची जीवनकहाणी ऐकून मायाला फार वाईट वाटले. थोडावेळ दोघींमध्ये स्तब्धता झाली. दोघीही सुन्न होऊन शून्य दृष्टीत बघत राहिल्या. मग आता तू काय करायचे ठरविले आहेस...? माया म्हणाली. “काय करणार, घराबाहेर तर पडले परंतु पुढचा काही विचार नाही केला ...!” “ रेखा, तुला जोपर्यंत आश्रय

मिळत नाही तोपर्यंत तू माझ्याकडे निर्धास्तपणे राहू शकतेस ...!" असे म्हणून माया किचनकडे वळली. तिच्या पाठोपाठ रेखाही गेली.

इकडे रेखाच्या घरी सर्वजण रेखाची वाट पहात होते. अचानक उमेशची नजर टेबलावर असलेल्या रेखाच्या चिठ्ठीवर पडली. उमेश चिठ्ठी उघडून वाचू लागला. रेखाने हेच लिहिले होते की मला उमेशचे लग्न मोडण्याचे खरे कारण माहित झाले आहे. तसेच माझ्याविषयी जिजूला माहित पडल्याचे समजले आहे तरी मी माझ्याकडून तुम्हा सर्वांना त्रास होऊ नये म्हणून ही गोष्ट लक्षात घेऊन मी तुमच्यापासून दूर गेले आहे. मी सुखरूप आहे. काळजी करू नये. तसेच मला शोधण्याचा प्रयत्न करू नये...! उमेश आईची काळजी घे, तुझे लग्न आता लवकरच होईल. तसेच नंदा सुद्धा आपल्या बाळाला घेऊन माहेरी येऊ शकेल. यातच मला आनंद आहे ...! चिठ्ठी वाचता वाचता उमेशचे डोळे पाण्याने भरून आले. आईने ते नजरेने टिपले आणि विचारले काय झालं...? रेखाची चिठ्ठी आहे का...? होय, ताईची चिठ्ठी आहे परंतु ताईने असं करायला नको होतं...! उमेशही जाणून होता की आम्ही जे आहोत ते ताईच्या हिमतीवर आहोत. भले ताईने चुकीचा रस्ता पकडला परंतु ताई किती लहान होती, नुकती तारूण्याला स्पर्श केलेली, चांगल्या वाईटाची समज नसणारी, तिला फक्त आपला परिवार दिसत होता. वडिलांची छत्रछाया गेली, भावंडं उपाशी तडफडत होती. शिकायची आवड असून शिकायला पैसा नव्हता अशा परिस्थितीत लोकांच्या बहकाव्यात येऊन त्या रस्त्याला वाहवत गेली. यामध्ये ताईची काय चूक आहे...? या वेळी उलट ताईला आम्ही सर्वांनी आधार द्यायला हवा...! परंतु आमच्या सुखासाठी ताईने आपल्या आयुष्याची बाजी लावली होती. धन्य आहे आमची ताई...! तिला माझे शतशः प्रणाम...! उमेश भावनाविवश होऊन विचार करत होता. आई काय विचारते याकडे लक्षच नव्हते. भानावर येऊन त्याने आईला समाधानपूर्वक समजावून सांगितले. जेणेकरून आईला धक्का बसणार नाही. आई

उमेशचे बोलणे ऐकत होती आणि डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहत होत्या. आपल्या मुलीचा केवढा मोठा त्याग...! या विचाराने उमेशची आई सुन्न होऊन रेखाच्या फोटोकडे बघून डोळे पूसू लागली. रेखामुळेच मला गेलेली दृष्टी मिळाली हे तिचे उपकार मी कसे विसरू...? उमेशकडे बघून म्हणाली "अरे, तिला फोन तरी कर...!" फोन तिचा स्वीच ऑफ येतोय गं...! असे म्हणून उमेशने नंदाला फोन लावून रेखाविषयी सर्व सांगितले. नंदाला आश्चर्य वाटले. एकाएकी रेखाने घर का सोडले असावे बरं...? कदाचित सत्य परिस्थिती रेखाला समजली असावी. त्यामुळे रेखाची काय मन:स्थिती झाली असेल...? खरं म्हणजे आज तिला आमची गरज होती. आम्ही तिच्या जवळ असायला हवे. परंतु तीच आमच्या भवितव्यासाठी दूर निघून गेली. शून्यातून तिनेच आमचे आयुष्य घडविले परंतु तिने कधीच आपल्या शून्यात जाणाऱ्या आयुष्याचा विचार केला नाही...! तिला फोन केला तरी लागत नाही ...! नंदा अस्वस्थ झाली होती.

इकडे मनिषाचे हॉस्टेलमध्ये शिक्षण चालू होते. मनिषा आता समजदार झाली होती. अभ्यासात ती विशेष लक्ष घालून पहिल्या नंबरने पास होत होती. प्रत्येक स्पर्धेत पारितोषिक जिंकत होती. मनिषा स्कूलमध्ये स्कॉलर म्हणून ओळखली जाऊ लागली. दहावीला तिने सत्याऐंशी टक्के मार्कस घेतले. पुढे मायाने तिला कॉलेज ॲडमिशन करून दिले. परंतु हळू हळू मायाची तब्येत जरा नाजूक होत चालली होती. त्यामुळे ती जास्त करून घरीच रहात होती. रेखा मात्र एका कंपनीत काम पकडून स्वत:चा खर्च काढत होती. अधून मधून मायालाही पैसे देत होती. पैसे जमा करून रेखा स्वत: साठी भाडयाची रूम शोधत होती. ही गोष्ट मायाला समजली तेव्हा माया तिच्यावर नाराज झाली. "रेखा, तुला इथे रहायला आवडत नाही का ...? तसे असेल तर तू जा, परंतु तू मला बहिणीसारखी आहेस. माझीही तब्येत ठीक नसते. तेव्हा तू इथे राहिलीस तर मलाही तुझी सोबत होईल ...!" माया म्हणाली. "मी इथे राहीन परंतु एका अटीवर राहीन...! मी जे पैसे

तुला देईन ते तुला घ्यायला हवे, कबूल आहे ... ?" रेखा म्हणाली. बरं बाई, कबूल आहे...! असे म्हणत मायाने रेखाच्या पाठीत हलका धपाटा मारला. रेखा कामाला जात होती. येताना भाजी तसेच मायासाठी फळं आणत होती. माया दिवसेंदिवस अशक्त झाल्यासारखी वाटत होती. म्हणून रेखा मायाला डॉक्टरकडे घेऊन गेली. डॉक्टरने मायाला तपासले आणि ब्लड टेस्ट करायला सांगितले. घरी जाता जाता लॅबमध्ये जाऊन मायाचे ब्लड सॅम्पल दिले. संध्याकाळी रिपोर्ट घेऊन डॉक्टरकडे गेली. डॉक्टर रिपोर्ट बघून गंभीर झाले आणि म्हणाले की "माया यांना एड्सची लागण झाली आहे." रेखा ऐकूनच घाबरून गेली. डॉक्टरांनी औषध लिहून दिले. ती घेऊन रेखा घरी आली परंतु मायाला या विषयी काही सांगितले नाही. थोडा बारीक ताप आहे एवढंच बोलून तिने मायाला जेवायला देऊन औषध दिले. औषधाच्या गुंगीने माया शांत झोपी गेली.

दिवसांमागून दिवस जात होते. परिस्थिती बदलत होती. नंदा माहेरी येऊन बाळंत झाली. तिला मुलगी झाली. परंतु नंदाची सासू नाराज झाली. तिला मुलगा हवा होता. त्यामुळे ती बडबड करत होती. नंदाने कशीबशी तिची समजूत घातली. तेव्हा ती शांत झाली. बारा दिवसाने मुलीचं बारसं करण्याच्या निमित्ताने घरात धांदल चालू झाली. दिपकला बारसं जोरात करायचं होतं. म्हणून एक छोटा हॉल बुक केला. जेवणा – खाण्याची ऑर्डर दिली गेली. नातेवाईकांना आमंत्रण दिले गेले. परंतु या कार्यक्रमात रेखाची कमी जाणवत होती. रेखाच्या आईला राहून राहून रेखाची आठवण येत होती आणि डोळे पाण्याने भरून येत होते. माझी पोर कुठे असेल, कशी असेल... ? कुठल्या परिस्थितीत असेल...! असे विचार तिला अस्वस्थ करत होते. मुलीचे नाव नंदाने दीपिका ठेवले. सगळे जण तिला दिपू... दिपू... म्हणून बोलू लागले. बारसं व्यवस्थित झालं. सर्व रेखाविषयी नको नको ते बोलत होते. त्याला नाईलाज होता. परंतु नंदा दुर्लक्ष करत होती. तरी आतून संकोचल्यासारखे होत होते. नंदाला तीन महिन्याची सुट्टी होती. त्यामुळे त्या सुटीत उमेशचे

लग्न जमले तर चांगले असा ती विचार करत होती. नंदा प्रयत्न करत होती. परंतु होकार येत नव्हता. एकदा लग्न मोडले म्हणजे पुन्हा लग्न जमवताना अडचणी येणारच...! पण म्हणून नंदा हार मानत नव्हती.

दिवसेंदिवस मायाची तब्येत क्षीण होत होती. रेखालाही मायाची काळजी वाटू लागली. मायाही समजून गेली की आपलं आता खरं नाही. तिला मनिषाची काळजी वाटत होती. म्हणून एक दिवस रेखाला जवळ बसवून मायाने स्वत:विषयी सांगितले. ‘‘रेखा माझा आजार काय आहे हे मी समजून आहे परंतु ही गोष्ट मनिषाला सांगू नकोस.... मी आता किती दिवस जगते सांगू शकत नाही. जर माझे काही बरे वाईट झाले तर मनिषाची जबाबदारी मी तुझ्यावर सोपविते. त्यासाठी ही माझी रूम मी मनिषाच्या नावावर केली आहे. माझे थोडे दागिने आहेत ते तिच्या लग्नासाठी तसेच शिक्षणासाठी बँकेत थोडे पैसे ठेवले आहेत...ही माझी अमानत तुझ्याजवळ सोपविते.’’ असे म्हणून मायाने कपाटातून एक डबा बाहेर काढला आणि रेखाच्या हातात दिला. ‘‘रेखा, आपल्या सारखे मनिषाचे आयुष्य जायला नको म्हणून मीही सर्व तयारी करून ठेवली आहे...मी तिला काही कमी पडू देणार नाही...!’’ असे म्हणून मायाने डोळयात आलेले पाणि पदराने पुसले. मायाला मनावरील मोठा भार हलका झाल्यासारखे वाटत होते. तिने दीर्घ निश्वास सोडला. दिवसेंदिवस मनिषा कॉलेजमध्ये आपलं प्रभुत्व गाजवत होती. तिचं आता शेवटचं वर्ष होतं. परंतु माया अगदी अशक्त झाली होती. जेवणही सुटलं होतं. जेमतेम दोन घास जबरदस्तीने खात होती. तिला स्वत:वरचा भरवसा राहिला नव्हता म्हणून मायाने मनिषाला बोलवायला सांगितले. रेखाने हॉस्टेलवर फोन करून मनिषाला बोलवून घेतले. मनिषा आईची तब्येत खूपच खराब झालेली बघून उदास झाली. ‘‘मावशी, आईला काय झाले...? औषधं बरोबर घेते नं....? आई, चल, तुला हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करूया म्हणजे तुला बरं वाटेल ...!’’ मनिषा तिच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली.

मनिषा आईजवळ दोन दिवस राहिली होती. तिला आईची स्थिती बघवत नव्हती म्हणून मनिषाने जबरदस्तीने आईला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. मायाचे ब्लड टेस्टचे रिपोर्ट डॉक्टरानी बाघितले आणि टेबलावर ठेवून दिले. डॉक्टर काही न बोलता निघून गेले. परंतु मनिषाने तेच रिर्पोट घेऊन वाचू लागली तेव्हा तिला थोडेफार समजले की आईला एड्स आहे. रेखा मनिषाकडे बघत होती. परंतु मनिषा काहीच बोलली नाही. मनिषा लगेच डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेली आणि  डोळ्यातील पाणी पुसत म्हणाली, डॉक्टर माझी आई बरी होईल नं...? ‘‘तुम्ही तिला फार उशीरा आणले. त्यामुळे काही सांगू शकत नाही. तरी आम्ही तिला बरी करण्याचा प्रयत्न करतच आहोत...!’’ डॉक्टर म्हणाले. मनिषा वॉर्डमध्ये आली आणि आईला डोक्यावरून कुरवाळत बसली. रात्रभर मनिषा व रेखा मायाजवळच थांबल्या होत्या. सकाळ झाली तेव्हा मायाने मनिषाच्या हातून दूध प्यायले. मनिषाचा हात आणि रेखाचा हात हातात घेऊन एकटक मनिषाकडे बघत राहिली. ती तिची शेवटची नजर भेट ठरली. मनिषाचा व रेखाचा पकडलेला हात सैल पडला. लगेच रेखाने मायाच्या डोळ्याच्या पापण्या बंद केल्या. मनिषा खूप रडत होती. परंतु रेखाने तिला सावरले आणि धीर दिला. बारा दिवस मनिषा घरीच होती. सर्व  विधी उरकून मनिषा आपल्या आईच्या फोटोला नमस्कार करून कॉलेजला जायला निघाली. रेखालाही तिने खाली वाकून नमस्कार केला आणि आवरलेला हुंदका गळ्याबाहेर पडला. रेखाने तिला जवळ घेतले आणि पाठीवरुन हात फिरवत म्हणाली ‘‘मनिषा, मी आहे, तुला मी सोडून जाणार नाही. तुझी परीक्षा झाली की तू इथेच रहायला ये...!’’ असे म्हणून रेखाने मनिषाला निरोप दिला.

मनिषाने बी.कॉम. पास करून एम.कॉम. ची परीक्षासुद्धा दिली. मनिषा आता हॉस्टेल सोडून घरी आली होती. मनिषा जशी हुशार होती तशीच समजंस होती. तिला आपल्या आईच्या व रेखामावशीच्या जीवनाविषयी कल्पना आली होती. रेखा प्रायव्हेट कंपनीत काम करून आपला

थोडया पगारात निर्वाह करीत होती. मनिषा मनातल्या मनात विचार करत होती की गरिबी किती भयानक असते. ही गरिबी माणसाला कुठल्या कुठे भरकटत घेऊन जाते. मग ती स्त्री असो वा पुरूष...माझी आई तसेच रेखामावशी यांचेही तेच झाले... यौवनाच्या उंबरठयावर यायच्या आधीच परिवार भार उचलला. शिक्षणाला वंचित राहिल्या. जशी तारूण्याची बंद कळी ऊमलताना एक वादळाचा झोका येतो आणि त्या कळीच्या नुकत्या उमलून येणाऱ्या स्वप्नांच्या पाकळ्या इतस्तत: विखरून टाकतो, काही पाकळया पायदळी तुडवून चिरडल्या जातात तर कार्हीची भरकटत भरकटत वाऱ्याच्या ओघाने दिशाभूल होते. त्या उमलत्या कळीचे अस्तित्वच नष्ट होऊन जाते. म्हणजे जीवनच शून्याच्या चक्रात समाप्त होते. असे मला होऊ दयायचे नाही. या उमलत्या कळयांना विकसित करायचे आहे. या साठी मला काही केले पाहिजे ...! आज भारत स्वतंत्र झाला आहे परंतु स्त्री स्वतंत्र नाही. आजही ती रात्रीच्या वेळी एकटी जाऊ - येऊ शकत नाही. आपल्या स्वतंत्र विचाराने चालू शकत नाही. प्रेमाला नकार दिला, लग्नाला विरोध केला, सासरच्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर होणारे विविध अत्याचार...सूड बूद्धीने केलेला बलात्कार, लैंगिक शोषण, आपल्या वासनेची भूक भागवण्यासाठी चार वर्षाच्या बालिकेचा बलात्कार अशा कृत्याला मुली बळी पडतात. नोकरीचे आमिष दाखवून देहविक्रय करणारे, ब्लॅकमेल करणारे नराधमही या समाजात कमी नाहीत ... मुलीच्या चेहेऱ्यावर ॲसिड फेकून चेहेऱ्याला विद्रूप करणारे निर्दयी सुद्धा आहेतच...! यापासून स्त्री जातीची जागृती करण्यासाठी मला काही तरी केलेच पाहिजे...! या विचाराने मनिषाचे मन अस्थिर झाले होते. या साठी रेखामावशीची मदत घ्यायची असे तिने मनाशी ठरविले. मनिषाने विचार केला या गोष्टी अमलात आणण्यासाठी मला स्वत:ला आधी तयार व्हायला पाहिजे. त्यासाठी मनिषा कराटे क्लसिसला जाऊ लागली. त्याबरोबर योगा क्लासेसही चालू केले. तीन चार वर्षात तयार होऊन रेखामावशीला घेऊन महिलांचा ग्रुप तयार केला. सर्वप्रथम त्या ग्रुपला तयार केले आणि स्त्री जागृती संघटनेची स्थापना केली. आणि छोट्या छोट्या गावात

जाऊन छोट्या मुलींना, तसेच तरूण मुली व वयस्कर महिलांपर्यंत योगा व कराटेचे शिक्षण देऊ लागली. स्वसंरक्षणाचे धडे देऊ लागली. त्यांच्यात आत्मविश्वास जागृत करू लागली. हळू हळू अनेक गावात मनिषाची **"स्त्री जागृती संघटना"** प्रसिद्ध होऊ लागली. मनिषाचा कारोबार दिवसेंदिवस वाढू लागला. मनिषाची संघटना सरकार मान्य झाली. मनिषा व रेखा अनेक छोट्या गावात तसेच छोट्या गावापासून शहरापर्यंतच्या माहिला व मुली चांगला प्रतिसाद देत होत्या. त्यामुळे सर्वत्र ही संघटना पुढे पुढे सरकत होती. गरिबीने पिचलेल्या तसेच आपल्या परिवाराचा बोझ सावरणाऱ्या तरूण मुलींना-महिलांना उद्योग चालू करून दिले. जेणेकरून आपल्या परिवाराचे पोषण करून सोबत शिक्षण घेणेही सहज झाले. सरकारकडून मिळणारी शैक्षणिक मदत मिळवून दिली. दोन-तीन वर्षात मनिषाने संघटनेचे नाव पुढे आणले आणि सरकार कडून पुरस्कारही मिळवला. हा पुरस्काराचा कार्यक्रम फार मोठा झाला आणि पेपरमध्ये व्ही.आय.पी. कडून पुरस्कार घेताना मनिषा व रेखा यांचा फोटोही आला.

उमेशने चहा पीत पीत दारात पडलेले वर्तमान पत्र उचलले. पहिल्याच पानावर रेखा ताईचा फोटो बघून चकित झाला. आनंदाने उमेशने ते वर्तमान पत्र नंदा व आईला दाखविले. त्या दोघीही खूप खूश झाल्या. लगेच त्या फोटोवरून रेखाचा शोध घेऊन तो पुण्याला रेखाकडे गेला. दरवाजात मनिषा उभी होती. गोरीपान, लांबसडक केस, गोल चेहरा, निळसर डोळे अशी मुलगी बघून उमेश तिच्याकडे बघतच राहिला. त्याला आठवले, वर्तमान पत्रात ताईच्या बाजूला ही मुलगी होती. तेवढयात मनिषाने रेखाला हाक मारली "मावशी, कोण आलंय ते बघ...!" असे म्हणून मनिषा आत गेली. रेखा दरवाजाकडे बघू लागली. रेखाचा आपल्या डोळयावर विश्वासच बसेना. रेखा थोडावेळ बघतच राहिली. एकदम भानावर येऊन म्हणाली. "अरे उमेश......ये नं आत, कसा काय आलास...? आई कशी आहे...?" असे विचारता विचारता रेखाच्या डोळ्यात पाणी उभे

राहिले. नंदाचे बाळंतपण झाले का...? उमेश तिच्या एका दमात विचारलेल्या सर्व प्रश्नांना शांतपणे उत्तर देत होता. मनिषा बेटा, जरा चहा कर...! रेखा म्हणाली. तोपर्यत दोघं गप्पा मारत राहिले. थोडयाच वेळात मनिषाने टेबलवर चहा ठेवत उमेशकडे चोरटा कटाक्ष टाकला तेव्हा रेखाने हा माझा लहान भाऊ आणि ही आहे माझ्या मैत्रिणीची मुलगी ...! असे म्हणून मनिषाला खुर्चीत बसायला सांगितले. परंतु मनिषा तिथे बसली नाही. तर लाजून किचनमध्ये गेली. उमेश व रेखा बऱ्याच वेळ एक दुसऱ्याची खुशाली विचारत होते. शेवटी निघताना उमेशची नजर मनिषाला शोधत होती. परंतु मनिषा दिसली नाही हे रेखाने हेरले होते. रेखा, आता आई साठी तरी घरी भेटायला ये...! नाही उमेश, आता तर संघटनेची मोठी जबाबदारी हाती घेतली आहे. त्यामुळे येणं अशक्य आहे...! उमेश निघून आला. परंतु तो त्याच्या मानतून मनिषाला विसरू शकत नव्हता. मनिषा उमेशच्या मनात भरली होती. रेखालाही हे जाणवले होते परंतु उमेशला मनिषा विषयी काहीच माहीत नव्हते. ती एका वेश्येची मुलगी होती हे माहित पडले तर कदाचित उमेश पाऊल पाठी घेईल असे रेखाचे मन म्हणत होते. म्हणून रेखाने उमेशला किंवा मनिषाला तसे दाखविले नाही की मी तुम्हा दोघांच्या भावना जाणते.

हळू हळू मनिषा व उमेश जवळ येऊ लागतात. मोबाईल वर तासन्तास बोलत राहतात. मनिषाच्या रोजच्या वागण्यात फरक दिसू लागला म्हणून समोरूनच रेखा मनिषाला विचारते, ‘‘मनिषा, हल्ली तू गुपचूप गुपचूप असतेस... तब्येत तर बरोबर आहे नं...? अं...अगं मावशी, मला काय झालंय...? मी ठीक आहे ...! मनिषा म्हणाली. ‘‘मग तू मोबाईलवर तासन्तास कोणाशी बोलत असतेस...? खर सांग, माझ्यापासून लपवू नकोस... जरा तुझा मोबाईल देशील का...’’ ‘‘नाही मावशी,’’ असे म्हणून मनिषा चोरी पकडल्यासारखी आपले तोंड हाताच्या ओंजळीत लपवत तिथून उठून बाहेर जाऊन उभी राहिली. तेव्हा रेखाही तिच्यापाठोपाठ गेली आणि

विचारले “मनिषा, मी तुला स्पष्टच विचारते, तुला उमेश पसंत आहे का…?” मनिषाने मान हलवूनच होकार दिला. “ठीक आहे तर, मी उमेशलाही फोन करून विचारते…!” त्याप्रमाणे रेखाने उमेशलाही विचारले. उमेशनेही होकार दिला. तेव्हा उमेशला “भेटायला येऊन जा…!” असे सांगून फोन ठेवला. दोन दिवसांनी उमेश रेखाला भेटायला गेला. त्यावेळी रेखाने सांगितले की “मनिषा वेश्येची मुलगी आहे तुला चालेल का…? तू नीट विचार कर, नंदालाही विचार, आईला सांग आणि मगच निर्णय घे …! मी तिची माहिती दिली आहे, नंतर तू मला दोष देऊ नकोस…! ” रेखा म्हणाली.

उमेश मनिषा विषयी ऐकून जरा अपसेट झाला होता. परंतु त्याने विचार केला की मनिषा तर शुद्ध आहे, पवित्र आहे. तिचा दोष एवढच होता की तिने वेश्येच्या पोटी जन्म घेतला होता. परंतु मायाही रेखा प्रमाणेच मजबूर होती. माया कामानिमित्त मुंबईत आली होती. आणि या खोट्या दुनियेत फसली गेली होती. म्हणूनच मायाने मनिषाला आपल्यापासून दूर ठेवले होते. तिला शिक्षण देऊन सक्षम बनविले होते. आईच्या चुकीमुळे मुलीला का शिक्षा मिळावी …! या विचाराने उमेशने मनिषाबरोबर लग्न करण्याचे ठरविले. उमेशचे विचार ऐकून रेखाही खूश झाली. आणि ही गोष्ट मनिषाला सांगितली. मनिषाही खूश झाली. साखरपुडयाची तारीख ठरली. साखरपुडा पुण्यालाच करायचे ठरविले. रेखा तर दोन्ही बाजूची पाहुणी होती. रेखाला व मनिषाला मायाची आठवण येत होती. माया असती तर किती खूश झाली असती…! रेखा मायला दिलेले वचन पूर्ण करत होती. साखरपुडा व्यवस्थित पार पडला. त्यानंतर थोड्या दिवसातच लग्नाची तारीख ठरली आणि लग्नाची जोरात तयारी सुरू झाली. नंदाही शॉपिंग करण्यात मग्न होती. लग्नात अमितच्या आर्केस्ट्राला आर्डर दिली होती. हॉल बुक झाला. मनिषाचे आईने दिलेले दागिने तयार होते. उमेशकडूनही मंगळसूत्र तसेच बांगडया मिळणार होत्या. रेखाने उमेश साठी सूट बूट आणि एक

सोन्याची चेन घेतली. हा..हा म्हणता लग्न येऊन ठेपले. मनिषा नववधूच्या रूपात खूपच सुंदर दिसत होती. नजर लागावी असे तिचे रूप होते. सर्व पाहुणे मंडळी आली. भटजी आले आणि लग्नाचे विधी सुरू झाले. उमेशने मनिषाच्या गळ्यात मंगळसूत्र घातले. दोघेही पवित्र बंधनात बद्ध

झाले. रिसेप्शन झाले. नंतर दुपारचे भोजन करून सर्वांनी निरोप घेतला. मनिषा उमेशबरोबर लक्ष्मीच्या पायाने घरात प्रवेश करत होती. तेव्हा रेखाच्या डोळ्यात पाणी आले. जणू तिची मुलगी तिला सोडून सासरी जात होती. मीसुद्धा या लग्नाला उपस्थित होते. मी पुढाकार घेऊन नंदाच्या व उमेशच्या संमतीने अमित व रेखाला स्टेजवर आणून एकमेकांना अंगठी घालण्याचा अनपेक्षित विधी संपन्न केला आणि सर्वांनी तो मान्यही केला. रेखाचे जीवन आता संपूर्णत: बदलून गेले होते. म्हणून अमितनेही रेखाचा स्वीकार केला. परंतु आशिर्वाद द्यायला अमितची आई जिवंत राहिली नव्हती. एक महिन्याने रेखाही विवाहबद्ध झाली. दिवस आनंदात जात होते. लग्नसराईमुळे **"स्त्री जागृती संघटना"** चे काम स्थगित झाले होते. पुण्याहून मुंबईला सारा कारोबार आणायचा म्हणजे मनिषाला विलंब होणार होता. मुंबईत संघटनेची स्थापना नव्याने करावी लागणार होती. कारण पुण्याचा स्त्रियांचा ग्रुप मुंबईला येऊ शकत नव्हता. त्यामुळे मनिषाला थोडया दिवसांसाठी ब्रेक घेणे आवश्यक झाले. रेखाही आता अमितकडे राहायला आली. त्यामुळे दोघींनी मिळून महिलांचा ग्रुप तयार करण्यास सुरूवात केली. मनिषा व रेखा यांच्या लग्नाला तीन महिने होऊन गेले आणि रेखाला दिवस गेले. रेखाला मदतीसाठी अमितची आत्या बऱ्याच वर्षांनी मुंबईला अमितच्या घरी रहायला आली. अमितला वाटले आत्या आली ते बरं झालं....परंतु काही दिवसांनी तिने आपले खरे रूप दाखवायला सुरूवात केली. रेखा, आपल्या घराण्यात मुलीच जास्त आहेत. आता आपल्याला मुलगा पाहिजे. मुलगा आपल्या वंशाचा दिवा असतो. समजलं का....! आत्या तांदूळ निवडता निवडता बोलत होती. आत्याचा या विषयावर दिवसातून पाच सहा वेळा तरी लकडा ऐकू

येत होता. त्यामुळे रेखा जरा टेंशनमध्येच आली होती. आत्याची कशी समजूत घालावी हे रेखाला समजत नव्हते. तरी ती आत्याला समजावण्याचा प्रयत्न करीत होती. "आत्या, पहिली वेळ आहे तर मुलगी झाली काय किंवा मुलगा झाला काय, फरक पडत नाही. मला तर मुलगीच आवडते, पहिली बेटी, धनाची पेटी....!" असे म्हणून रेखा स्वंयपाकाला लागली. कितीही झालं तरी आत्या जुन्या विचारांची होती. कधी कधी तर गर्भचाचणी करून घेण्यासाठी मागे लागायची. रेखाला वाटू लागले की आत्या आली नसती तर बरे झाले असते. आत्या तशी सर्व कामं करत होती. डॉक्टरांनी बेडरेस्ट घ्यायला सांगितले होते. त्यामुळे आत्याला बोलावणं भाग पडलं. रेखा मात्र खूश होती. कारण ती आई होणार होती. ही गोड संधी तिच्या आयुष्यात येईल असे तिला वाटले नव्हते आणि म्हणूनच ती आपल्या बाळाबरोबएकटीच बोलत असायची. परंतु आत्याचे विचार आठवून ती आपल्या बाळाला पोटावर हात फिरवून गोंजारायची. तेव्हा तिला बाळ म्हणायचे, "आई, मला दूर करू नकोस गं.... मला या दुनियेत यायचे आहे....या चिमुकल्या डोळ्यांनी या दुनियेला बघायचे आहे.... आई, ही दुनिया किती निष्ठुर आहे गं.... आमच्यासारख्या कोवळ्या जीवाचा कसा घात करतात..... आमच्या कोवळ्या अर्भकालासुद्धा भावना असतात गं आई..... त्या भावना कुणी समजू शकत नाही का गं..... आम्हाला या दुनियेत येण्याचा अधिकारच नाही का ..... आमच्यामुळेच तर संत पुरूषांनी, महापुरूषांनी, क्रांतीकारकांनी जन्म घेतला. आणि आज मलाच जन्म घेण्यास विरोध होत आहे. ..... कुठे गेला तो माझा सन्मान ..... कुठे गेली ती माझी थोरवी...? रेखाचे आपल्या बाळाचे आक्रोशदायी बोल ऐकून डोळे भरून आले आणि आपल्या बाळाला शपथ दिली, "मी तुला जन्म देईन, ही दुनिया तुला दाखविन परंतु बाळा ही दुनिया फार निष्ठुर आहे. आपल्या स्त्री जातीची मर्यादा नष्ट झाली आहे. ती एक उपभोगाची वस्तू समजून तिच्याशी व्यवहार होत आहे. तिचे महत्व आज त्यांना दिसत नाही. त्यांच्या डोळ्यावर कामवासनेची पट्टी बांधली आहे आणि त्या अंधारात बाप मुलीला, मुलगा आईला, भाऊ बहिणीला

विसरून गेला आहे. आणि तुला या दुनियेत जन्म घेऊन त्या नराधमांना धडा शिकवायचा आहे. माझे जीवन ज्या पद्धतीने गेले तसे तुला जगायचे नाही. या दुनियेतील अत्याचाराला बळी पडायचे नाही.....! रेखाने भानावर येऊन डोळ्यात आलेले पाणी पुसले. आणि पोटावर हात ठेवून बाळाचा गोड पापा घेतला.

रेखाला आता सातवा महिना सुरू झाला. रेखाची वाडी भरायचा कार्यक्रम करायचा होता. रेखाने फोन करून नंदाला बोलाविले. परंतु नंदा आताच तीन महिन्यांची सुटी संपवून नुकतीच कामावर हजर झाली होती. त्यामुळे नंदाला रजा घेणे शक्य नव्हते. मनिषानेच कार्यक्रमाची सर्व तयारी केली. सगळ्यांना पाच वाजता बोलाविले होते. पाहुणेमंडळी हळू हळू येतच होती. रात्रीसाठी जेवणाची तयारीही चालू होती. अमितही खूश दिसत होता. मनिषाने खास रेखासाठी हलव्याचे मुकूट, हार, बाजूबंद, कमरपट्टा, कर्णफुले बनविले होते. मनिषाने चहापानानंतर रेखाला सजवायला घेतले. रेखा आता खूप सुंदर दिसत होती. तिच्या तोंडावर गर्भारपणाचे तेज दिसत होते. ते तेज बघून रेखाची आई म्हणाली ‘‘रेखा, चेहऱ्यावर खूप तेज चमकतंय, वाटतं की लक्ष्मीच जन्माला येणार आहे..!’’ हे ऐकून अमितची आत्या जरा कपाळाला आठ्या पाडून रेखाच्या आईकडे बघू लागली. तेवढयात अमित म्हणाला, ‘‘मग चांगले आहे न, घरात पैसाच पैसा येईल....!’’ हे ऐकून सर्वजण हसू लागले. आजूबाजूच्या बायका येऊ लागल्या होत्या. रेखा लक्ष्मी सारखी सजून बसली होती. अमित रेखाचे फोटोंवर फोटो काढत होता. पाच जणींनी रेखाची ओटी भरली. मुद्दामहून सर्वजणी रेखाला नाव घ्यायला सांगत होत्या. तसेच उमेशनेही अमितला नाव घ्यायला सांगितले. कार्यक्रम हसून खेळून पार पडला रात्री रेखा आई बरोबरच माहेरी जाणार होती. त्याप्रमाणे अमितने मित्राची गाडी आणून जायची तयारी केली होती. सर्वांची जेवणं झाल्यावर रेखाने आत्याला नमस्कार केला आणि ‘‘मी येते....! ’’ असे म्हणून सर्वांच्याबरोबर गाडीने माहेरी गेली.

दोन महिने उलटलेले होते. रेखाची आई रेखाची चांगली जपणूक करत होती. खाण्यापिण्यापासून ते औषधपाण्यापर्यंत ती स्वत: रेखाला जपत होती. रेखा आता अवघडलेली दिसत होती. दिवस भरत आले होते. जवळच्याच हॉस्पिटलमध्ये नाव घातलेले होते. अमितही वरचेवर तिला फोन करून तिची विचारपूस करत होता आणि एक दिवस अचानक रेखाच्या पोटात दुखू लागले म्हणून मनिषाने अमितला कळविले. अमितने लगेच गाडी आणली. त्या गाडीत रेखाला बसवून हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. रेखाला कळा सहन होत नव्हत्या. डॉक्टर येऊन तपासून जात होते. तेव्हा अमितने विचारले काही प्रॉब्लेम आहे का....? हो... बाळ आडवं आहे. तेव्हा ऑपरेशन करावे लागेल. लगेच सिस्टर व डॉक्टरांची धावपळ सुरू झाली कारण लवकरात लवकर ऑपरेश्न नाही केले तर रेखाच्या जीवाला धोका आहे....! असे डॉक्टर बोलून गेले होते. रेखाला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन गेले. एक तासाने एक सिस्टर सफेद कपडयात लपेटलेली छोटीशी दुसरी रेखा घेऊन आली. सर्वप्रथम अमितने आपल्या हातात तिला घेतली. ते छोटसं बाळ आपल्या लुकलुकत्या डोळ्यांनी अमितकडे पहात होते. अमितने बाळाला सिस्टरच्या हातात देत विचारले, “रेखाची तब्येत कशी आहे ....?” त्यांची तब्येत नाजूक आहे. अमितने लगेच डॉक्टरांच्या केबिनकडे धाव घेतली. तेवढयात डॉक्टर म्हणाले या..या.. मीच तुम्हाला बोलवणार होतो. तुम्ही आलात ते बरं झालं .... खरं सांगायचं म्हणजे त्यांना विश्रांतीची अत्यंत गरज आहे. त्यांचे बाळ मात्र सुखरूप आहे....! असे म्हणून डॉक्टरांनी काही औषधं आणण्यास सांगितली. अमितने तात्काळ औषधं आणून सिस्टरकडे दिली. रेखाला वॉर्डमध्ये आणले गेल्यावर मनिषा, रेखाची आई, नंदाची सासू, उमेश असे सर्वजण रेखाजवळ गेले. त्या वेळेला रेखा थकलेली होती. अर्धा एक तासात तिने डोळे उघडले. तेवढयात सिस्टरने बाळाला पाळण्यात आणून ठेवले. अमितला डॉक्टरांचे बोलणे ऐकून थोडे टेंशन आले होते. त्यामुळे आत्याला कळवायचे राहून गेले. लगेच आत्याला फोन वरून कन्यारत्न झाल्याचे कळविले. आत्याने काही न बोलता जोरात फोन आपटून

ठेऊन दिला. ‘‘मला वाटलच होतं, हिची लक्षणं पोरीचीच दिसत होती, गर्भचाचणी करून घ्या आणि गर्भपात करा.... काय करायच्यात त्या पोरी.... वंशाला दिवा नको का....? आताच्या पिढीला कोण सांगणार....?’’ आत्या स्वत:शीच बडबडत होती. आत्याने रेखाची विचारपूस सुद्धा केली नाही म्हणून अमितला वाईट वाटले. लगेच अमितने त्या चिमुकल्या बाळाला रेखाच्या कुशीत ठेवले. रेखाने ममतापूर्ण नजरेने बाळाला गोंजारले. कन्यारत्न बघून रेखाला आत्या आठवली. आत्या आता रागात असणार म्हणून तिला कसे समजवावे हा मोठा प्रश्न होता. बाळ रेखाच्या कुशीत राहून सगळ्यांना किलकिल्या डोळ्याने टुकूर टुकूर पहात होते. रेखाला त्याची फार गम्मत वाटली. एवढयात मनिषा म्हणाली अगदी रेखामावशी सारखी दिसते नं....? नाही हं, अमित सारखी दिसते ....! रेखा म्हणाली. दोघीही मजेत भांडू लागल्या तेवढयात, ‘‘पुरे झाल आता, अजून तिचा चेहरा बदलेल, आताच काही तर्कवितर्क करायला नकोत ....!’’ रेखाची आई म्हणाली. ‘‘मी इथे थांबते, तुम्ही सगळे घरी जा....!’’ मनिषा म्हणाली त्याप्रमाणे मनिषा रेखाजवळ थांबली आणि सर्वजण घरी जाण्यास निघाले.

आठ दिवसांनी रेखा आपल्या बाळाला घेऊन माहेरी आली. घरात बाळ आल्याने वातावरण अगदी आनंदी झाले होते. छकुलीचे घरात सर्व कौतुक करत होते. मात्र आत्या बघायला आली नव्हती. आत्याला मुलगी नको होती. म्हणून ती नाराज झाली होती. बारा दिवसांनी तिचे बारसे करण्याचे ठरविले. प्रत्येक जण आपापल्या परीने नवीन नवीन नाव सुचवत होते. शेवटी रेखाने अमित वरून अनया नाव सुचविले. सगळ्यांनी ते मान्यही केले. या वेळेला मात्र नंदा मुंबईला आली होती. बरोबर दीपिकाही आली होती. दिपिका आता वर्षाची झाली होती. नंदानेच बारशाची सर्व तयारी केली. परंतु दिपक मात्र आला नव्हता. यावरून सर्वांनाच थोडे खटकले होते. रेखा समजून होती. पण काय करणार....? ही लोकं का समजून घेत नाही....? अमितने मात्र रेखाला समजून

घेऊन तिचा स्वीकार केला होता. रेखाचा संसार थाटून तिला समाजात स्थान दिले होते. बारशाचा दिवस उजाडला. संध्याकाळी चारचा मुहूर्त होता. त्याप्रमाणे बरोबर चार वाजता बाळाला पाळण्यात घातले. बाळासाठी गाणी गाईली. बाळाची आत्या नसल्याने नंदा मावशीनेच बाळाच्या कानात 'अनया' म्हणून नाव सांगितले. सगळ्यांना मिठाई व नाश्ता दिला. कार्यक्रम संपन्न झाला. अनयाला भेट वस्तू बऱ्याच आल्या होत्या. त्या बघता बघता रेखाला थकवा जाणवू लागला. म्हणून ती विश्रांतीसाठी थोडया वेळ झोपली. एका तासाभराने उठल्यावर तिला थोडा आराम वाटला. अनयाला घ्यायला बरेच जण होतेच. कधी मनिषा तर कधी नंदा तर कधी तिची आजी अनयाला घेत होत्या. त्यामुळे रेखाला अनयाची काळजी वाटत नव्हती. परंतु रेखाला आपली तब्येत अशक्त होत असल्यासारखी वाटत होती. असे का होते समजत नव्हते. रेखा नेहमी झोपूनच रहायची. कधी कधी पोटात सुद्धा दुखायचे. ऑपरेशन करून बाळाची सुटका केल्यामुळे तसे होत असेल असे समजून ती चूप होती. बाळाला बघता बघता एक महिना झाला. नंदाही सिंगापूरला जायला निघाली होती. दीपिका सुद्धा चांगली रमली होती. "नंदा तिला इथेच ठेव, रहात असली तर तिला इथेच राहू दे ....!" नंदाची आई आपल्या साडीचा काष्टा नीट करत म्हणाली. "नको गं आई, तू कोणाकोणाला सांभाळणार....? रेखाला बघणार की अनयाला बघणार की दीपिकाला....?" नंदा आपली बॅग उचलत म्हणाली. "ताई बॅग तू उचलू नकोस, मी सामान सर्व उचलतो तू दीपिकाला सांभाळ....!" उमेश म्हणाला. रेखा चल, तब्येतीची आणि अनयाची काळजी घे....! असे म्हणून नंदा आईला नमस्कार करून निघाली. उमेश तिला विमानतळापर्यंत सोडायला गेला.

बरेच दिवस मनिषा आपल्या **'स्त्री संघटनेच्या'** कामाकडे लक्ष देऊ शकली नव्हती. त्यासाठी तिला पुन्हा पुण्याला जाणे भाग पडले. हळू हळू मनिषा आपले ऑफिस मुंबईलाच

आणण्याचा प्रयत्न करत होती. तिने पुन्हा आपले काम चालू केले. आपल्या पुण्याच्या रूममध्ये राहून आपलं ध्येय पार पाडत होती. **'स्त्री संघटनेच्या'** शाखा विविध ठिकाणी स्थापन होत होत्या. त्यामुळे मनिषाची जबाबदारी वाढत होती. मनिषाने अशा बऱ्याच पिडीत मुलींना न्याय मिळवून दिला होता. बलात्कार प्रकरणाच्या केसेसनासुद्धा सहयोग दिला होता. अशा केसेसेमध्ये लोकलाजेस्तव चूप बसणाऱ्यांना तिने आत्मविश्वासाबरोबर केस लढण्याची हिम्मत दिली होती. सरकारकडून त्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई करून दिली. दुसऱ्यासाठी लढा लढता लढता एक दिवस अचानक तिच्या आईकडे जो पुरूष येत होता तोच पुरूष गुंडाना घेऊन रूमवर आला. मनिषाने त्याला प्रथम ओळखलेच नाही. परंतु तो ओरडून दादागिरी करू लागला की, ''चलो हमारे साथ, तुम हमारी बेटी हो , हमारे बुढापे का सहारा हो....!'' असे म्हणून मनिषाला पकडले. लगेच मनिषाने न घाबरता त्याचा हाथ झिडकारून आपली सुटका केली परंतु ते दोन गुंड मनिषाला पुन्हा पकडायला पुढे धावले. तोच मनिषाने आपल्या कराटेची किमया दाखवून त्यांना पळवून लावले. मनिषा सावध राहू लागली होती. आपल्या पर्समध्ये तसेच रूमवर टेबलावर मिरची पावडर ठेवू लागली. मनिषा आता निडर झाली होती. तिने स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण केला होता. त्याच आत्मविश्वासावर ती गुंडांपासून स्वत:ला सुरक्षित ठेवत होती. मनिषा **'स्त्री जागृती संघटना'** मुळे प्रसिद्ध होत होती. त्याबरोबर तिचे दुष्मनही वाढत होते. तर दुसऱ्या बाजूला तिची वाहवा होत होती. मनिषा या गोष्टी उमेशला कळवत नव्हती. कारण उगाच उमेश टेंशन घेणार. मनिषाच्या या संघटनेमुळे बऱ्याच तरूण मुलींना तसेच वयस्कर महिलांना फायदा झाला होता. त्यांच्यात एक आत्मविश्वास आला होता. प्रत्येक जण मनिषाचे आभार मानत होते. कित्येक पिडीत मुली व महिला म्हणत होत्या की ही संघटना लवकर स्थापना झाली असती तर आमची ही स्थिती झाली नसती. मनिषाला वाटत होते की ही समस्या स्त्रियांच्या एकजुटीने समाप्त होईल. एकजुटीने हिम्मत येईल आणि हिमतीने सामना करण्याची शक्ती मिळेल. आणि प्रत्येक स्त्रीला न्याय मिळेल....!

म्हणूनच गावोगावी फिरून स्त्रियांना एकत्र आणून त्यांच्यात आत्मविश्वासाचे धडे देऊन एक संघटना बनवत होती.

दिवसेंदिवस रेखाची तब्येत खालावत होती. म्हणून उमेशने चांगल्या डॉक्टरकडे नेऊन तिचा पूर्ण बॉडी चेकअप करून घेतला आणि रिपोर्टमध्ये तिला गर्भाशयाचा कॅन्सर निघाला. औषधोपचार करूनही रेखा अशक्त होत चालली होती. डॉक्टर ती जास्त दिवस राहिल याची खात्री देऊ शकत नव्हते. ऑपरेशन करण्यासारखीही तिची शरीर प्रकृती नीट नव्हती. रेखाने हा आजार अंगावर काढला त्यामुळे कॅन्सर जास्त पसरला होता. अमितही मनाने खचून गेला. त्यात आत्याही बडबड करतच होती. पोर जन्माला आली आणि आयशीला आजारी पाडली....! आत्या म्हणाली. ‘‘अगं अनयाला का दोष देतेस....? तिने काय केले....?’’ अमित म्हणाला. ‘‘मग, तिचा पायगुणच चांगला नाही....!’’ आत्या नाकावरचा चष्मा डोळ्यावर चढवत म्हणाली. रेखा झोपूनच होती. हळू हळू तिचं खाणं पिणंही कमी कमी होत चाललं होतं. रेखा अनयाकडे बघून रडायची. ती आईला म्हणायची, ‘‘मी आता जगणार असं वाटत नाही गं.... तू अनयाला सांभाळ .... तिला खूप शिकव आणि पदवीधर बनव .... तिला माझ्यासारखी वेळ येऊ देऊ नको .... तुझ्या हातात माझी अमानत सोपविते....!’’ असे म्हणून रेखाला श्वास लागू लागला. आईने उमेशला फोन करून डॉक्टरला आणायला सांगितले. उमेश धावतच डॉक्टरला घेऊन आला. परंतु त्यापूर्वीच रेखाने शेवटचा श्वास घेतला होता. रेखाची आई  रडू लागली. उमेशने लगेच नंदा वा मनिषाला बोलवून घेतले. अमित रेखाच्या उशाशीच बसून होता. अमितची आत्याही आली. दिपक व दिपकची आई सुद्धा हजर झाली. नंदा तर खूपच रडत होती. रेखाताई  म्हणजे त्यांच्या परिवाराचा मोठा आधार होता. आपले जीवन फुकट घालवून भावंडांचं भविष्य तिने घडविलं होतं. तिच्या बाळाच्या भविष्याची जबाबदारी आता त्यांची होती. आजपर्यंत रेखाने सर्वांसाठी कष्ट केले होते. त्याबदल्यात तिला सुख द्यायची

वेळ आली. तर भरल्या संसारातून उठून गेली. रेखाविषयी सर्वांना वाईट वाटत होते. सर्वांनी मिळून रेखाचा अंतिम संस्कार केला. घर कसं सुनं सुनं वाटत होत. अमित अगदी एकटा पडला होता. वडील तर नव्हतेच. आईसुद्धा नुकतीच सोडून गेली होती आणि आता त्याची अर्धांगिनी त्याला सोडून गेली होती.

अनयाला रेखाची आईच सांभाळत होती. आत्याला एवढ्या लहान अनयाला सांभाळता येण्यासारखे नव्हते. म्हणून काही दिवसांसाठी अमितने अनयाला रेखाच्या आईकडे सोपविले होते. नंदा पुन्हा सिंगापूरला निघून गेली. मनिषा सुद्धा पुण्याला निघून गेली. त्यामुळे सारे काम रेखाच्या आईला भारी पडत होते.  अमित हे समजून होता. परंतु नाईलाज होता. अमित रोज दिवसा अनयाला सांभाळून रात्री ऑर्केस्ट्रा चालवायला जात होता. अधून मधून आत्या सुद्धा दुपारची जाऊन बसायची. परंतु तिचे काम अनयाला सांभाळायचे  नसायचे तर अनयाला शिव्या घालत बसायचे. ‘‘पोर जन्माला आली आणि आयशीला आजारी पाडून गिळून बसली.... करंटया नशिबाची कुठली.... जन्माला आली नसती तरी चाललं असतं....!’’ असे तिच्या नावाने रोज शिव्या घालत असे. अनयाचे झाले की मनिषावरुन चालू व्हायचे, ‘‘अजून मनिषाची कूस उजवली नाही .... तुमची सून वांझोटी तर नाही .... ती तिकडे पुण्याला का जाते....इथेच मुंबईला काम करायचे ....!’’ अशी आत्याची बडबड चालू असायची. अमितला त्यामुळे फार टेंशन यायचे. अनया समजदार झाल्यावर आत्या अशी वागेल तर अनयाचे काय होईल ....? अनयाला आत्यापासून दूरच ठेवायला हवे ....! अमित असा विचार  करत होता. आत्याला गावी जा  असेही तो सांगू शकत नव्हता. रेखाची आई तरी अनयाला किती दिवस सांभाळणार, म्हणून आत्या अमितला दुसरं लग्न कर म्हणून पाठी लागली होती. ‘‘अरे, एवढं समोर आयुष्य पडलं आहे आणि तू एकटाच कसा राहणार....? कोणी तरी साथीदार असायला हवाच नं....? मी काय आज आहे  तर उद्या नाही

....!” आत्या अमितला जेवण वाढता वाढता बोलत होती. परंतु अमित काहीच बोलत नव्हता. चुपचाप खाली मान  घालून जेवत होता. अमितही दुसरं लग्न करायला तयार नव्हता. तो सारखी सारखी रेखाची आठवण येऊन उदास होत असे. कधी लग्नाचा अल्बम काढून रेखाला पहात असे तर कधी वाडी भरायचे फोटो बघून स्वत:चे समाधान करत असे. त्यांची ही हालत बघूनच आत्या अमितच्या पाठी लग्न करण्यासाठी लागली होती. रेखाच्या आईलाही पटत होते. म्हणून ती सुद्धा अमितला समजावून सांगत होती. जे व्हायचे ते झाले, आपल्या हातात काही आहे का....? भूतकाळ विसरण्यासाठी आपल्याला भविष्यकाळाकडे बघायला हवे....! परंतु अमित तयार नव्हता. अमित अनयाकडे बघून दिवस काढत होता. मनिषा पंधरा दिवस पुण्याला तर पंधरा दिवस मुंबईला असे करून आपले काम सांभाळत होती. अनया हळू हळू मोठी होत होती. जसजशी रांगायला लागली तसतशी रेखाच्या आईला अनयाला सांभाळणं मुश्किल होत असे. त्यामुळे घरातील बाकी कामं तशीच राहून जात होती. ही सर्व परिस्थिती बघून मनिषाने मुंबईला आपले काम चालू केले. तिने मुंबईला सुद्धा स्त्री जागृती संघटना चालू केली. आसपासच्या महिला मंडळातून तिने भाषण देऊन महिलांचा ग्रुप तयार केला. कराटेचे धडे देऊन योगा क्लासेसही चालू केले. मुंबईमध्ये मनिषाला बरेच प्रोत्साहन मिळत गेले. कारण मुंबईसारख्या ठिकाणी अनेक अत्याचार  बलात्कार या सारखे गुन्हे दिवसातून खूपच होत असतात. काही मुली लोकलाजेस्तव पोलीस स्टेशनला जात नाही तर कधी  पोलीस स्टेशनला दाद मिळत नाही तर त्या मुलींची खिल्ली उडवली जाते. उलटे सुलटे प्रश्न विचारून हैराण केलं जातं अशावेळी मनिषाची संघटना त्यांना मदत करत  होती. कामाचे आमिष दाखवून त्यांना फसवून देहविक्रय करणाऱ्यांपासून मनिषाने पोलीसांमार्फत त्या मुलींची सुटका केली होती. तर बलात्कार व अत्याचार प्रकरणात मुलींना तसेच महिलांना न्याय मिळवून दिला होता. त्यामुळे मनिषाला सरकारकडून पुरस्कार मिळत गेले.

अनया आता थोडी मोठी होऊन शाळेत जाऊ लागली होती. मनिषा तिला शाळेत सोडण्यापासून अभ्यास घेण्यापर्यंत तिचे सर्वकाही तीच पहात होती. अनया अभ्यासात हुशार होती. तशीच ती दिसायलाही रेखाप्रमाणे सुंदर होती. मनिषा कधी कधी तिला आपल्याबरोबर घेऊन जात असे. त्यामुळे तिला लहानपणापासून कराटे व योगाचे धडे मिळत होते. तसेच शाळेतूनही कराटे शिकत हेती. अनया जसजशी मोठी होत होती त्याबरोबर कराटेमध्ये एकदम तयार होत गेली, निर्भय बनत गेली. म्हणून दिवसेंदिवस तिचा आत्मविश्वास वाढत होता. मनिषा सुद्धा तिच्या स्कूल बॅगमध्ये मिरची पावडरच्या पाण्याचा स्प्रे ठेऊन देत. होती. कधीही तुला कुणी पकडायला आला किंवा अंगाला हात लावत असेल त्यावेळी घाबरायचं नाही. तर हा स्प्रे त्यांच्या डोळ्यावर मारायचा असे तिला तयार करून ठेवले होते. अनया वयाने जसजशी मोठी होत होती त्याप्रमाणे मनिषा तिला स्वत:चे संरक्षण कसे करावे यामध्ये सक्षम बनवत होती. दिवसेंदिवस रेखाची आई वयोमानाने थकून जात होती म्हणून घरातील कामात अनया मदत करत होती.

आत्या आजारी पडली म्हणून अमितला गावी सोडून येण्यास सांगितले. अमित आठ दिवसांची रजा घेऊन आत्याला गावी सोडण्यास गेला. अमितलाही गावी जरा बरे वाटले. डोक्यावरील भार हलका झाला, मनातील दु:ख हलके झाले. गावी गेल्यावर अमितला जवळचे नातेवाईक भेटायला येत होते कारण बायको स्वर्गवासी झाली. त्यामुळे सर्वांच्या तोंडात एकच सूर होता की, ‘‘अमित आता पुढे काय ठरविले आहेस… ? लग्नाचा विचार आहे की नाही… ? परंतु अनया साठी तरी लग्न करायला हवे. मुलगी मोठी होते तेव्हा मुलीला आईची गरज जास्त भासते…!’’ नातेवाईक आपापल्या परीने समजावत होते. परंतु अमित रेखाला विसरू शकत नव्हता. म्हणून सगळया लोकांना टाळण्यासाठी संध्याकाळी नदीच्या काठावर जाऊन बसत असे. तो मनाला सावरण्याचा प्रयत्न करत होता. अशाच एका संध्याकाळी अमित नदीकिनारी असलेल्या

शिव मंदिराच्या चौकात बसला होता. त्याच वेळी समोरून त्याचा चुलत मामा आला. त्याच्याबरोबर मामीची भाची होती. ती पूजा करण्यास मंदिरात गेली आणि मामा अमित जवळ येऊन बसला आणि त्या भाची विषयी सांगू लागला. भाचीचे नाव गीता होते. तिचा नवरा दारू पिऊन तिला मारपीट करत होता. तिच्या कडून पैसा हडप करू पहात होता. त्या कारणाननेच गीताने दोन वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला होता म्हणून ती आपल्या आई - वडीलांच्या सोबत रहात होती. आई वडीलही गीताविषयी चिंतेत होते. एवढं मोठं आयुष्य कसं काढणार...? यांची त्यांना काळजी होती. म्हणून मामा अमितला समजावत होता. ‘‘तू असाही इथे आला आहेस तर आपण बोलणी करुया ...!’’ मामा म्हणाला. परंतु अमितला उत्तर देणं जड झालं होतं. ‘‘आपण नंतर बघूया...!’’ असे म्हणून अमितने विषय थांबाविण्याचा प्रयत्न केला तरी मामा बोलत होता. नाईलाजाने अमितने भेटायचे ठरविले आणि दुसऱ्या दिवशी मामाबरोबर गीताच्या घरी गेला. गीताचे घर म्हणजे एक वाडाच होता. घरात नोकर-चाकर होते. घरची शेतीवाडी होती. अनेक फळांची झाडे होती. त्यांची परिस्थिती एकदम चांगली होती. त्यामुळे अमितला वाटले भरल्या घरात लहानाची मोठी झालेली मुलगी माझ्या साख्या गरीबाकडे कशी राहू शकेल...? म्हणून अमितने आपली सर्व परिस्थिती गीताच्या वडिलांना सांगितली. त्यातूनही त्यांनी अमितला समजून घेतले होते. त्यांना फक्त निर्व्यसनी मुलगा हवा होता. त्यांच्याकडून तर अमित पसंत होता परंतु अमितने काहीच सांगितले नव्हते. ‘‘मी मुंबईला गेल्यावर तुम्हाला कळवितो ...!’’ असे म्हणून अमित व मामा निघाले. आठ दिवस कसे गेले कळलेच नव्हते. परंतु अमितला फ्रेश वाटले होते. अमितला मात्र गीताविषयी कळवायचे होते. आत्याने तर होकार दिला होता. रेखाच्या घरी सांगून काय तो निर्णय घ्यायचा होता. अमितलाही सर्वांचे बोलणे ऐकून लग्न करणे जरूरीचे आहे असे वाटू लागले होते.

अमितने मुंबईला आल्यावर रेखाच्या घरी लग्नाची गोष्ट कानावर घातली. सर्वांनी लग्नासाठी होकार दिला होता. जेव्हा अनयाला ही गोष्ट समजली तेव्हा ती जरा नाराज झाल्यासारखी अमितला वाटली. अनया तशी लहान होती तेवढी तिला त्या बाबतीत समज नव्हती. आत्या नसल्याने अमित एकटा झाल्याने अनया आपल्या घरी येऊन राहू लागली. अनया चौथीला होती. अमित आणि अनया दोघं मिळून जेवण करायचे त्यामुळे अनया जेवण बनवायलाही हळू हळू शिकत होती. कधी कधी रेखाची आई जेवणाचा डबा घेऊन यायची. अनया शाळा करून घरातील कामही सांभाळत होती. दिवसभर अमित घरीच असायचा. परंतु ऑकेस्ट्राला जाऊन रात्री दोन अडीच वाजता घरी येत होता. त्यावेळी अनया एकटीच घरात रहात होती. अशा वेळी त्याला अनयाजवळ कोणीतरी बाईमाणूस असावे याची जाणीव होऊ लागली. अनयाला रात्रीचं एकटं ठेवणं ठीक नाही म्हणून अमित अनयाला रेखाच्या घरी सोडून मग ऑर्केस्ट्राला जाऊ लागला. परंतु रात्री दोन तीन वाजता अनयाला झोपेतून उठवून आणणे म्हणजे त्रासदायक वाटू लागले म्हणून अनयाला पुन्हा आजीच्या घरी ठेवून दिले. त्यामुळे अमितला फारच एकटं एकटं वाटू  लागलं. घर खायला उठू लागले. रेखाची आठवण पुन्हा बेचैन करू लागली. शेवटी विचार करून अमितने लग्नासाठी होकार असल्याचे मामाला कळविले. चार पाच दिवसांनी मामाने बैठकीसाठी अमितला बोलवून घेतले. अमितने लग्न साधेच रजिस्टर व्हावे असे आपले मत समोर ठेवले. सर्वांनी ते मान्य केले. तुळशी विवाहानंतरचा मुहूर्त बघून लग्न निश्चित झाले. तुळशी विवाहानंतर लगेच अमित गावी गेला आणि कोर्ट मॅरेज करून गीताला मुंबईला आणले. इकडे सर्वजण वाट बघतच होते. मनिषाने लगेच दारात आरती करून नारळ फोडला आणि गीताला लक्ष्मीच्या कुंकवाच्या पावलाने आत घेतले. घरात प्रवेश केल्याबरोबर अमित आणि गीताने रेखाच्या फोटोला हार घालून नमस्कार केला. देवालाही नमस्कार करून रेखाच्या आईला नमस्कार करून आशिर्वाद घेतला आणि नवीन जीवनाची सुरूवात केली. अनया आपल्या आईबरोबर राहू लागली. गीता अनयाचे व्यवस्थित करत

होती. घरातील कामे नीटपणे सांभाळत होती. अमितलाही अनयाचे टेंशन कमी झाले. घरात पुन्हा सौख्य नांदू लागले. अनया अभ्यास करून आपली स्वत:ची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत होती. अनयाने शाळेतही अनेक बक्षिसे मिळविली होती. ती स्कॉलर म्हणून ओळखू लागली. अमितलाही अनयाचा अभिमान वाटत होता. अनयाला शालेय जीवनाबरोबर मनिषाकडून जाऊन येऊन स्वसंरक्षणाचे धडेही मिळत होते. मनिषाच्या संघटनेचा विस्तारही खूप वाढला होता. तिच्या जवळ रोज दोनतीन केसेस तर येतच होत्या. जेणेकरून त्यांना मनिषाची अत्यंत जरूरी होती. त्यासाठी तिला याला भेट त्याला भेट असे करून बरीच भागदौड  करावी लागत असे. आधी तिच्या जोडीला रेखा होती. परंतु आता तिला कुणाची भेट घेण्यास  तिला स्वत:ला एकटीलाच फिरायला लागत होते. या सर्व जबाबदारीने मनिषा आपले वैयक्तिक जीवन विसरूनच गेली. त्यामुळे हळू हळू घरातही खटके उडू लागले. मनिषा हे जाणून होती. म्हणूनच काम आणि घर याचा बॅलन्स ठेवण्यासाठी आठ दिवसांचा ब्रेक घेतला. आणि आपला वेळ उमेश व आई साठी देऊ लागली. त्यामुळे घरातील वातावरण निवळले आणि त्याच वेळी उमेशच्या आईने अजूनही मूलबाळ  झाले नसल्याचे उघड करून दिले. मनिषानेही ते मान्य केले. तरीसुद्धा मनिषाचे  मन म्हणत होते की लोकांचे विचार कधी सुधारणार...? स्त्री म्हणजे काय मूल देण्याची मशिन आहे का...? तिलाही तिचे आपल्या जीवनात उद्देश आहेत. ते उद्देश पूर्ण व्हावे अशी तिची इच्छा असते. ते साकार करण्यासाठी ती स्त्री धडपडत असते. परंतु तिला या समाजाच्या परंपरा सांभाळण्या साठी आपल्या इच्छेची आहुती द्यावी लागते. लग्न झाले म्हणजे लगेच मूल बाळ झालेच पाहिजे ही सामाजिक परिमिती तिच्या उद्देशाच्या आड येते. मनिषाचे मन समाजाच्या चक्रव्युहात अडकून पडते. मनिषाने जे काम हाती घेतले होतं ते संघटनेचे काम स्थागित करावे लागेल या विचारानेच तिने पाळणा लांबवला होता. ही गोष्ट त्याच वेळी तिने आपल्या आईंना स्पष्ट केली. आई समजदार असल्याने

त्यांनी मनिषाची बाजू समजून घेतली. ‘‘परंतु आता तर कामात जम बसलेला आहे तर तू दोन तीन महिन्यांसाठी कोणावर तरी हे काम सोपवू शकतेस ...!’’ आई शांतपणे बोलत होती.

मनिषाने मनावर घेतले आणि तिला दिवस जाऊन तीन महिने झाले होते. कामाच्या भागदौडीने मनिषाची तब्येत जरा बिघडली होती. डॉक्टरांनी तिला पूर्णपणे विश्रांती घ्यायला सांगितले होते. उमेशची आई मनिषाची पूर्णत: व्यवस्थित काळजी घेत होती. अधून मधून अनया सुट्टीच्या दिवशी आजीला मदत करायची. गीताही अनयाबरोबर प्रेमाने रहात होती. कारण अनयाची दहावीची परीक्षा तोंडावर आली होती. म्हणून अनयाचा जोरात अभ्यास चालू होता. तशी ती हुशार होती. परंतु तिला मेडिकल लाईनला जायचे होते. तिची इच्छा डॉक्टर बनण्याची होती. त्यामुळे सायन्स साईडला जायचे होते. त्यामुळे पंच्याऐशी टक्केच्यावर मार्कस् मिळविणे आवश्यक होते. म्हणून ती आपला सारा वेळ अभ्यासात घालवित होती. घरात गीताला तिची मदत मिळेनाशी झाली म्हणून हळू हळू गीताच्या वागण्यात फरक दिसू लागला होता. काम न करण्यावरून गीताची बडबड चालू व्हायची. आपली तब्येत ठीक नसल्याचे नाटक करून झोपून राहू लागली. अनयालाही हे सहन झाले नाही तरी ती चुपचाप जेवढे होईल तेवढे ती काम करून अभ्यास करत होती. अमितच्या ही गोष्ट लक्षात आली होती. म्हणूनच त्याने गीताला समजावून सांगितले. किती झाले तरी ती सावत्र आई होती. अनया आपल्या आजीकडे गेली हे बघून गीताचा जळफळाट व्हायचा. छोटया छोटया गोष्टींवरून ती वाद विवाद करून त्याचे मोठे स्वरूप बनवून अनयावर हात उचलायला सुरूवात केली होती. अनयाची परीक्षा चालू झाली होती. त्याच दिवशी कामवाली आली नाही म्हणून कपडे भांडी करायला अनयाला ठेवून दिले होते. अशा प्रकारे गीताने अनयाचा छळ करण्यास सुरूवात केली होती. अनयाला परीक्षा असल्याने अमित स्वत: तिची कामं करीत

होता. अनयाला पेपर चांगले जात होते. त्यामुळे ती खूश होती. तिला खुश बघून अमितही खुश होत होता.

परीक्षा संपल्यावर अनया आजीकडे रहायला गेली. गीताचे वागणे अनयाला खटकत होते. तिचे आणि मनिषा मामीचे चांगले पटत होते. मनिषाचेही दिवस भरत आले होते. त्यामुळे योग क्लासेस अनयाच सांभाळत होती. बाकी सर्व कामे कामत मॅडम पहात होत्या. कामत मॅडम नवीनच होत्या. परंतु सरकारी नोकरीतून निवृत्त झालेल्या अनुभवी होत्या. मनिषाने आपल्या घेतलेल्या ब्रेकमध्ये सर्व जबाबदारी त्यांच्यावरच सोपविली होती. अनयाही बाहेर जायची. काम सांभाळत होती. मनिषाची सातव्या महिन्याची वाडी भरण्याचा कार्यक्रम साजरा केला होता. तेव्हा सर्व स्त्री जागृती संघटनेच्या सर्व महिला आल्या होत्या. वाडी भरल्यानंतर मुलगी माहेरी जाते हे लक्षात येऊन मनिषाला आपल्या आईची आठवण झाली आणि डोळे पाणावले, हे रेखाच्या आईने अचूक हेरले आणि म्हणाली, “आईची आठवण झाली का…? अग मी आहे नं… तू सुद्धा मला नंदा–रेखा सारखीच आहेस…!” काळजी करू नकोस, मी करेन तुझं बाळंतपण असे म्हणून मनिषाच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला. हे पाहून अनयाही लाडाने आपल्या आजीला बिलगली. कधीच्या कधी तीन महिने उलटून गेले आणि मनिषाने पुत्ररत्नाला जन्म दिला. मुलगा झाला म्हणून सगळ्याना आनंद झाला. उमेशने सगळ्यांना पेढे वाटले. सर्वांचा एकच विषय झाला आता नाव काय ठेवायचे…? अनयाने उदय नाव सुचविले. पहिला मुलगा म्हणून थाटात बारसं केले. नंदासुद्धा दीपिकाला घेऊन मुंबईला आली होती. आपल्या भाच्याला बघायला या वेळेला दिपकही रजा घेऊन नंदाबरोबर आला होता. दिपिका आता कॉलेजला जायला लागली होती. दीपिका अनयापेक्षा थोडी मोठी होती. घर एकदम भरले होते. परंतु कमी होती ती रेखाचीच. सगळ्यांना बारशाच्या दिवशी रेखाची आठवण होत होती. अनया व दीपिका बाळाला चांगलं खेळवत होत्या. आळीपाळीने त्याला

मांडीवर घेत होत्या. एक दिवस नंदा अमितला भेटायला गेली, ‘‘काय मग येऊ का…?’’ नंदा अमिकडे बघत म्हणाली. अचानक नंदा आलेली पाहून अमित गोंधळून गेला आणि नंदाकडे क्षणभर बघतच राहिला. ‘‘अरे, आतमध्ये तर बोलवशील की नाही…?’’ नंदा हसत हसत म्हणाली. ‘‘अग ये नं… त्यात विचारायचं काय …?’’ गंभीरतेने अमित म्हणाला. नंदाला अमितच्या चेहऱ्यावर लग्नाची खुशी दिसत नव्हती. नंदा सोफ्यावर बसली. लगेच अमितने पाणी आणले … ‘‘कसं काय चाललंय…? गीतावहिनी कशा आहेत…? बाहेर गेल्या आहेत का…?’’ नंदा इकडे तिकडे बघत म्हणाली. ‘‘नाही गं.. किचनमध्ये आहे…!’’ अमित गीताला हाक मारत म्हणाला. अमितच्या हाकेने गीता बाहेर आली आणि उभी राहीली. नंदाने स्माईल दिले तेव्हा गीतानेही स्माईल देऊन नंदाचा आदर केला. तेवढयात अमितने गीताला चहा बनवून आणण्यास सांगितले. म्हणून गीता आत गेली. नंदाने इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. थोडया वेळाने गीताने दोन कप चहा आणला. नंदा व अमित दोघे चहा पीत होते परंतु अमित पहिल्या सारखा बोलत नव्हता. नंदा जेवढे विचारत होती तेवढे त्याला तो उत्तर देत होता. अमित खूश नाही हे नंदाने ओळखले होते. अमितविषयी वाईटही वाटले. अमित लग्न करून फसला होता. ‘‘मग आता किती दिवस राहणार आहेस…? अरे, उद्याच मी निघणार, चार पाच दिवसांची रजा घेऊन आलो आहोत आम्ही …! जाणार म्हणून तर तुला भेटायला आले…!’’ नंदा रेखाच्या फोटोकडे बघत म्हणाली. रेखाला बघून नंदाचा आवाज जरा गहिवरला होता. नंदा अमितला भेटून थोडया वेळातच घरी जाण्यास निघाली. जाता जाता गीता बाहेर आली नाही हे नंदाला विचित्र वाटले तसेच नंदाने अनयाला समजावले की ‘‘अनया, बाबा एकटे पडतात. त्यांच्याजवळ सुद्धा काही वेळ देत जा…!’’ ‘‘आईला मी नको असते न म्हणून मी आजीकडे जाते …!’’ अनया डोळ्यातील पाणी पुसत म्हणाली. ‘‘सर्व कामं माझ्याकडूनच करून घेते. काम नाही केलं तर मारायला येते…!’’ अनया छोटं तोंड करून बोलत

होती. नंदालासुद्धा तिचे वाईट वाटले. एवढया लहान वयात ही वागणूक मिळत होती. एक प्रकारे हे अत्याचारच आहे. असे नंदा मनातल्या  मनात म्हणत होती. तिला वाटत होते की आज रेखा असती तर अनयावर ही वेळ आली नसती.

नंदा, दिपक व दीपिका सिंगापूरला जायला निघाले. उमेश व अनया त्यांना सोडायला गेले होते. अनया परत आपल्या घरी परतली होती. बाबा झोपले होते तर तिची आई टी.व्ही. बघत होती. अनया बाथरूममध्ये हात पाय धुवायला गेली, बघते तर कपडे भांडी तशीच पडली होती. आज पुन्हा कामवाली आली नव्हती. अनयाने लगेच कपडे–भांडी करून तिने आपल्या बाबांना उठविले. बाबा, तुम्ही जेवलात का.... ? अनयाने विचारले. ‘‘नाही गं, थोडया वेळाने जेवीन म्हटलं तर पेपर वाचता वाचता झोप लागून गेली ....!’’ अमित म्हणाला. लगेच अनयाने बाबांना जेवण वाढून दिले. घडयाळात अडीच वाजले होते तरी आईने बाबांना जेवण दिले नव्हते. हाच विचार करत अनया तिच्या बाबांच्या बाजूच्या खुर्चीत बसली. अनया आता आपल्या रिझल्ट विषयी विचार करू लागली. अमितनेही घरची परिस्थिती बघून अनयाला हॉस्टेलवर ठेवण्याचे ठरविले. उगाच या घरच्या वातावरणाचा तिच्यावर परिणाम व्हायला नको, या कोवळ्या वयामध्ये तिला बरेच काही सहन करावे लागत होते.

उदय हळू हळू मोठा होत होता. मनिषाला आता कामा वर जायचे मुश्किल होत होते. निदान सहा महिने तरी ती उदयला सोडून जाऊ शकत नव्हती. तो पर्यत मनिषाचे कामही कामत मॅडमना सांभाळावे लागत होते. अधून मधून मनिषाकडे येऊन तिचा सल्ला घेत होत्या आणि आतील काम सांभाळत होत्या. इकडे अनयाचा रिझल्टही लागला. तिला सत्याऐंशी टक्के मार्कस् मिळाले होते. अनया खूश होती, तिला बघून अमितलाही खुशी होत होती. त्यामुळे त्याला रेखाची आठवण येत होती. आज रेखा असती तर तिला किती आनंद झाला असता....!  अमित विचार करू लागला,

बिचारी मुलीचं यश बघायला थांबली नाही....! अमित डोळ्यात आलेले पाणी पुसत स्वत:शीच बोलत होता. एवढयात अमितचे लक्ष घडयाळाकडे गेले. नऊ वाजत आले होते. अमितला अनयाबरोबर कॉलेजला ॲडमिशन घेण्यासाठी जायचे होते. लगेच अमित उठला आणि आंघोळीला गेला. अनया कधीच तयार होऊन बसली होती. दोघांनीही नाश्ता करून रिक्षा पकडली. कॉलेज फार दूर होते. पंधरा मिनिटांत दोघे कॉलेजमध्ये गेले. मुला मुलींची फार गर्दी होती. ॲडमीशन फॉर्म घेऊन अनयाने भरला आणि ऑफिसमध्ये दिला. असे दोन तीन कॉलेजला जाऊन फॉर्म देऊन ठेवले. अनया कॉलेज चालू होईपर्यंत आपल्या घरीच रहात होती. येऊन जाऊन ती आजीला मदत करीत होती. बाळाला खेळवत होती. हळू हळू उदयही मोठा होत होता. उदयला कुठे ठेवायचे....? हा प्रश्न मनिषाला पडला होता कारण उमेशच्या आईला आता काम होत नव्हते आणि या वयात त्यांच्यावर उदयला सोपवून कामला जायचे हे मनिषाला ठिक वाटत नव्हते. अनयाही कॉलेजला जाणार होती. त्यामुळे तिची सुद्धा मदत मिळणार नव्हती. असेच एक दिवस मनिषा उदयला घेऊन प्रथमच देवळात पाया पडायला गेली. तेव्हा येता येता तिने आपल्या ऑफिसला भेट दिली. कामत मॅडम बसलेल्याच होत्या. त्यांनी मनिषाला बघताच खुर्चीवरून उठून मनिषासमोर खूर्ची करत म्हणाल्या, मनिषा तू..., अग बस नं, देवळात गेली होतीस वाटते....? हो...हो.. बाळाला प्रथम देवळात घेऊन जायचं असतं नं....? मगच त्याला बाहेर फिरवू शकतो बरोबर नं....! मनिषा हसत हसत म्हणाली. फार चांगलं केलंस....! आता तू कधीपासून इकडे कामाला येणार आहेस ....? उदयला कुठे ठेवायची त्याची व्यवस्था केलीस का ....? आता आईसुद्धा थकल्या असतील नं ....? त्यांना आता आरामाची जरूरत आहे ....! कामत मॅडम बोलत होत्या. “मी तुला एका बाईचा पत्ता देते तिथे जाऊन तू माझं नाव सांग त्या तुला मदत करतील ....!” मनिषा तो पत्ता घेत म्हणाली हो..हो.., मी जाईन तिथे....! “चला मी निघू ....? उदयची सुद्धा आता दूधाची वेळ होईल ....!” “मनीषा, दूध त्याला अंगावरच पाजतेस की

पावडरचं....?" कामत मॅडम म्हणाल्या. आता कामावर यायचे म्हणजे त्याला पावडरच्या दुधाची सवय लावायलाच हवी ....! त्यामुळे मी त्याला अंगावरचं सुद्धा पाजते आणि पावडरचे सुद्धा देते ....! मनिषा म्हणाली. महिला कामावर जातात म्हणून मुलांचे किती हाल होतात नं....? त्या मुलांना पुरेसं आईचं दूधही मिळत नाही. म्हणजे या लहान वयापासूनच त्यांचा जीवनाचा संघर्ष सुरू होतो म्हणायचा....! कामत मॅडम म्हणाल्या. मनिषा जायला निघाली. घरी येऊन ऊदयाला दूध पाजून पाळण्यात टाकून झोपविले आणि आईना स्वंयपाकाला मदत करायला गेली.

अमितने अनायाची व्यवस्था हॉस्टेलवर केली होती. त्यामुळे ती हॉस्टेलवरूनच कॉलेजला जात होती. सुटीच्या दिवशी ती घरी येऊन बाबांना तसेच आजी आणि मामा मामीला भेटत असे. कॉलेजमध्ये अनयाला खूप आवडत होते. कारण शाळे प्रमाणे तिथे युनिफार्म ची गरज नव्हती. त्यामुळे चांगले चांगले ड्रेस घालायला मिळत होते. बऱ्याच मैत्रिणी होत्या. त्यात तिची खास मैत्रिण म्हणजे रंजना होती. अनया तिला रंजू म्हणूनच बोलवत होती. हॉस्टेलवर सुद्धा रूम पार्टनर म्हणून रंजूच बरोबर होती. त्यामुळे त्यांची दोस्ती एकदम जीवाभावाची झाली होती. दोघी आपलं सुख-दु:ख एकमेकींना सांगून मन हलकं करत होत्या. अनयानेही आपली घरची परिस्थिती सांगितली होती. त्याकारणाने आपल्या बाबांनी हॉस्टेलवर ठेवल्याचे सांगितले. तसेच रंजनाने देखील आपल्या घरची परिस्थिती सांगितली की माझी बहिण वंदना हिच्यावर बलात्कार झाला तेव्हापासून तिने स्वत:ला आपल्या रूममध्ये बंद करून घेतले. ती बोलत नाही की जेवत नाही, तिची हालत मला बघवत नव्हती. अशा वातावरणात माझ्या अभ्यासावर परिणाम व्हायला नको म्हणून माझ्या पप्पांनी मला हॉस्टेलवर ठेवले. इथे राहूनही मला वंदनाची सारखी सारखी आठवण येते....! रंजना डोळ्यातील पाणी पुसत बोलत होती. परंतु हे सर्व कधी आणि कसे झाले ....? अनयाने गंभीरतने विचारले. अनया ती एक मोठी स्टोरी आहे. सांगेन मी कधीतरी....! रंजना

म्हणाली. आता आपल्याला कॉलेजला जायचे आहे नं....! असे म्हणून रंजना उठली आणि तयारी करू लागली. अनयाही आपली बॅग भरू लागली. वहया पुस्तकं घेतली आणि एक बॉटल बॅगेत भरू लागली. ती बॉटल बघून रंजनाने विचारले, ही कसली बॉटल आहे....? काय आहे त्यामध्ये....? अगं, तो स्प्रे आहे ....! अनया म्हणाली. लगेच रंजनाने तो स्प्रे घेतला आणि आपल्या अंगावर उडवणार तोच अनयाने झडप घालून तिच्या हातातून काढून घेतला. “अगं, हा स्प्रे परफ्युमचा नाही तर गुंडांना ठिकाणावर आणायचा स्प्रे आहे....!” अनया म्हणाली. म्हणजे काय आहे त्यात....? रंजना म्हणाली. यामध्ये मिरची पावडरचे पाणी आहे, कुणीही आपल्या अंगाला हात लावयला आले की न घाबरता हा स्प्रे त्याच्या डोळ्यावर मारायचा म्हणजे आपण आपली सुटका करून घेऊ शकतो....! रंजनाला या गोष्टीचे कुतूहल वाटले. दोघीही तयारी करून तरातरा कॉलेजला निघून गेल्या.

एक दिवस रंजनाने सुटीच्या दिवशी अनयाला आपल्या घरी घेऊन गेली. सकाळीच त्या रंजनाकडे जाण्यास निघालेल्या होत्या. तिकडेच जेवण करून दुपारी अनयाच्या घरी जायचे ठरलेले होते. अनया आपली बॅग आणि स्प्रे घेऊन तयार झाली. रंजनाही घरी जायचे म्हणून खूश झाली होती. दोघींनीही रिक्षा करून रंजनाच्या घरी गेल्या. रंजनाची आई तशी अपसेटच दिसत होती. तिने दोघींना आत घेतले आणि लगेच दरवाजा बंद केला. रंजनाच्या आईने रंजनाला किचनमध्ये बोलवून घेतले. दोघींच्यात काहीतरी धूसफूस चालली होती. थोडे थोडे शब्द अनयाच्या कानावर पडत होते. एकंदरीत यावेळेला अनयाला घरी आणले हे तिचा आईला पसंत पडले नव्हते. थोड्या वेळात रंजना चहा आणि बिस्किटं घेऊन बाहेर आली. अनयाला जरा विचित्र वाटले. परंतु अनया समजदार होती. ती समजून गेली की रंजनाच्या बहिणीचं जे प्रकरण झालं होतं त्यावरून तिची आई माझ्याशी बोलण्याच्या मनस्थितीत नसावी. परंतु तिने ठरविले होते की ही केस मनिषा मामीच्या हातात दिली

तर ती  वंदनाला न्याय मिळवून देईल. या विचाराने अनयाने रंजनाच्या आईला समजून घेतले. अनयाने चहा घेतला आणि जेवणाचा प्रोग्राम कॅन्सल करून अनयाने आपल्या घरी जेवणासाठी रंजनाला आग्रह केला. रंजनाही तयार झाली. तिच्या आईला भेटून निघणार एवढयात तिच्या आईने रंजनाला हाक मारली आणि अनयाला पुन्हा कधीतरी जेवायला बोलावूया....! असे म्हणून रंजनाचे समाधान केले. रंजना व अनया  दोघीही अनयाच्या घरी आल्या. हात पाय धुवून अनयाने उदयला घेतले आणि रंजनाची मामीला ओळख करून दिली. मनिषाने  तिची खुशाली विचारली. बोलता बोलता मोठी बहिण काय करते....?  असे विचारल्यावर रंजना कावरी बावरी होऊन अनयाकडे बघू लागली. अगं, जे काही आहे ते मामीला खरं खरं सांग, ती तुम्हाला न्याय मिळवून देईल. माझी मामी हेच काम करते. तिने स्वत: ‘‘स्त्री जागृती संघटना’’ स्थापन केली आहे. आणि अशा हरलेल्या पीडितांना ती न्याय मिळवून पुन्हा समाजात मानाचं स्थान मिळवून देते. अनया समजदारपणे बोलत होती. मनिषाने रंजनाला विचारले की असे काय झाले की तुम्हाला न्याय मिळाला नाही.....? तेव्हा रंजना आपली बहिण वंदनाविषयी बोलू लागली, माझी बहिण वंदना सीमेन्स कंपनीत जॉब करते आणि आता सहा महिन्यांपूर्वी तिचे विजय नावाच्या मुलाशी घरातून लग्न जमले. त्यामुळे विजय नेहमी संडेला वंदनाला फिरायला घेऊन जात असे. असेच एका संडेला दोघेही फिरायला गेले होते. संध्याकाळी सहा ते नऊचा मूव्ही बघून येत असताना मुसळधार पाऊस पडू लागला होता. रात्र असल्याने रस्ताही सामसूम होता. कुठे रिक्षाही दिसत नव्हती. प्रायव्हेट गाड्या सुद्धा लिफ्ट द्यायला तयार नव्हत्या. वंदना हात करून गाडी थांबवण्याचा प्रयत्न करत होती. परंतु एकही गाडी थांबत नव्हती. पाऊस तर वाढतच होता. वंदना व विजय पुढे पुढे पायीच चालत होते. आणि अचानक एक गाडी थांबली. परंतु त्याच्यातून चार गुंड पिस्तुल घेऊन बाहेर पडले. वंदना व विजय घाबरून गेले. त्या एका गुंडाने विजयला बाजूला घेतले  आणि एकाने वंदनाला गाडीत उचलून टाकले आणि दरवाजा बंद केला. त्या चौघांनी मिळून विजयला मारायला सुरूवात केली तेव्हा वंदना गाडीतून

बाहेर येऊन विजयला सोडविण्याचा प्रयत्न करू  लागली. तेवढयात एका गुंडाने चाकू काढला. हे बघून वंदना तिथून पळाली. पळता पळता लांबवर गेली. गुंडांच्या हे लक्षात आल्यावर त्या गुंडांनी विजयला तिथेच सोडले आणि वंदनाचा पाठलाग करू लागले.  रस्त्यात पळताना वंदना त्यांना दिसली. गाडी थांबवून ‘‘मेरी छम्मक छल्लो, हम आपकी क्या सेवा करे.... ?’’ असे बोलून एकाने वंदनाच्या गालाला हात लावला. तेवढयात दुसरा च्..च्..च् करत म्हणाला ए... उसको क्यू हाथ लगाता है.... ? शरीफ घर की दिखती है। लगेच तिसरा म्हणाला हाथ नही लगाना, ऐसे बाहो में लेने का....!  असे म्हणून तिसरा वंदनाला पकडायला आला. तेवढयात वंदना धावली तेव्हा लगेच एकाने तिला पकडून फरफटत गाडीत टाकली. ते चौघे दरवाजा लॉक करून वडापाव खाण्यास गेले. तेव्हा वंदनाने खिडकीची काच उघडून बाहेर उडी मारून गपचूप पळाली आणि एका झाडीत लपून बसली. त्या झाडीचे काटे अंगाला टोचत होते. अंगाला ओरबडले जात होते. परंतु वंदनाला त्याची शुद्ध नव्हती. त्या गुंडानी वडापाव खाऊन येऊन बघितले तर ‘‘लडकी भाग गयी, असे म्हणून त्यांनी गाडी भरधाव सोडली. गाडी गेल्यावर वंदना झाडीतून बाहेर आली.  पाऊस थोडा थांबला होता. म्हणून हळू हळू चालत निघाली. इतक्यात पंधरा वीस मिनिटांनी तीच गाडी फिरून पाठी आली आणि वंदनाच्या समोर उभी राहिली. एक उतरला आणि वंदनाला पुनः गाडीत टाकले. रात्रीचे बारा वाजले होते आणि अंधारात गाडी नेऊन चौघांनी वंदनावर सामूहिक बलात्कार केला आणि गाडीच्या बाहेर टाकून दिले. तो पर्यंत वंदना बेशुद्ध झाली होती. जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा ती रस्त्यावर पडली होती. वंदना भर पावसात उठून चालू लागली. अंग सगळं ठणकत होतं आणि जड झालं होतं. शरीर थकलेलं होतं. अंगात चालायला त्राण नव्हतं, तरीही वंदना लटपटत लटपटत चालत होती. कपडेसुद्धा फाटलेले होते. मध्यरात्र होती. रस्त्याला चिटपाखरू सुद्धा दिसत नव्हते. वंदना रस्त्याने  बेहोशपणे चालत होती आणि घरी सगळे वंदनाची वाट  पहात होते. विजय वंदनाला घेऊन बाहेर गेला होता. रात्रीचे एक दीड  वाजले तरी दोघांचा पत्ता नव्हता. दारावरची बेल

वाजल्याबरोबर वंदनाच्या आईने दार उघडले आणि वंदनाला त्या स्थितीत बघून ओरडली "वंदना...काय झाले....?" आईचा आवाज ऐकून वंदना पुन्हा बेशुद्ध झाली आणि खाली पडली. लगेच तिच्या आईने तिला पकडले आणि तिच्या बाबांनी आणि भावाने मिळून आत आणले. आईने तिचे ओले फाटके कपडे बदलले आणि बेडवर झोपविले. बाबांनी डॉक्टरला बोलवायला सांगितले तेव्हा वंदनाचा भाऊ अशोक याने लेडी डॉक्टरला फोन करून बोलवले. तिने वंदनाला चेक अप केले आणि बलात्कार झाला आहे असे सांगून पोलीस स्टेशनला तक्रार करा असे म्हणून पेपरवर औषधं लिहून दिली आणि काळजी घ्या तिची असे म्हणून लेडी डॉक्टर निघाली. अशोक तिची बॅग घेऊन तिला सोडून येताना औषधं घेऊन आला.

दुसऱ्या दिवशी वंदनाने डोळे उघडले आणि घाबरून ओरडू लागली. परंतु आईने तिला जवळ घेऊन शांत केले. अशीच ती अधून मधून ओरडायची आणि रडायची. तिची अशी हालत बघून घरात सर्वांना वाईट वाटत होते. वंदना बोलत नव्हती म्हणून निश्चित काय झाले काहीच समजत नव्हते. तिची मानसिक स्थिती फार नाजूक होती. त्यामुळे तिला मानसिक शांतीची गरज होती. थोडे दिवस तिला कुणीच काही विचारले नाही. पोलीस तक्रार करायलाही कोणी तयार नव्हते. पोलिस तक्रार केली तर मिडियावाले येतील, न्यूज पेपरमध्ये छापले जाईल, तिचे लग्न होणार नाही. तसेच छोटी बहिणही लग्नाची आहे. असे म्हणून आई पोलीस तक्रार करायला तयार नव्हती. आईने सर्वांना ताकीद देऊन ठेवली होती की ही गोष्टी कोणालाही सांगायची नाही. जसजसे दिवस जात होते तसतसे वंदनाचे ओरडणे बंद झाले होते. वंदना थोडी फार सावरली गेली होती. एक दिवस विजय आमच्या घरी आला होता. आईने त्याला जबरदस्तीने वंदनाला भेटायला पाठविलेले होते कारण त्याला बलात्कार झालेल्या उष्टया मुलीबरोबर लग्न करायचे नव्हते म्हणून आघाताला दोन दिवस झाले तरी तो आपले तोंड लपवून बसला होता. त्याला तशी फार मोठी

जखम झालेली नव्हती. परंतु वंदनाला भेटायला आला तेव्हा तो मुद्दामच डोक्याला पट्टी बांधून आला. पायाला बॅंडेज बांधलेले होते. मी जखमी झालो म्हणून वंदनाला भेटायला येऊ शकत नाही. असे त्याने दाखविले. विजयच्या आईलाही आश्चर्य वाटले की याच्या होणाऱ्या बायकोची काय अवस्था झाली आहे याचे त्याला काहीच वाईट वाटत नव्हते. उलट चांगला खातो, पितो आणि हिंडतोय. त्यांच्या आईलाही वाईट वाटले. त्यांची आई मात्र वंदनाला बघून गेली होती. अशोकला विजयचे वागणे ठिक वाटत नव्हते. त्याचा वंदनाप्रति बोलण्याचा ढंगही बदलून गेला होता. वंदना हळू हळू उठून बसू लागली होती. परंतु बसल्या बसल्या ती शून्य नजरेने बघत रहायची. त्या नजरेत सर्व भावना जणू मरून गेल्या होत्या. ती जिवंत असूनही मेल्यात जमा होती. आजू बाजूला कोण आहे, कोण बसलं आहे, याची तिला शुद्ध नव्हती. विश्वाचे तिला जणू अस्तित्वच नव्हते. एक दिवस तिची खास मैत्रिण उज्वला तिला भेटायला आली होती. तिने बेल वाजवली. आईने दार उघडताच तिने विचारले वंदना आहे....? आईने नाही म्हणून सांगितले. परंतु उज्वला म्हणाली आंटी, मला वंदना विषयी सर्व माहित आहे. त्यासाठीच मी तिला भेटायला आले आहे. तेव्हा आई म्हणाली प्लीज, आता तू तिला भेटू नकोस....! परंतु उज्वलाने आईला समजावले की आंटी, वंदनाला अशी एकटी ठेवाल तर तिची मानसिक स्थिती आणखीनच खराब होईल. तिची जी आवडती लोकं आहेत त्यांना भेटायला द्या म्हणजे ती या मानसिक आघातातून बाहेर येईल....! उज्वला विश्वासाने बोलत होती. तेव्हा उज्वला वंदनाच्या खोलीत गेली, वंदना झोपली होती कारण एक तासापूर्वी तिला डॉक्टरांनी गोळी दिली होती, त्याने तिला झोप लागली होती. उज्वला तिच्या उशाशी बसून तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवत होती. तेवढयात वंदना ओरडली लगेच उज्वलाने तिला जवळ घेऊन म्हणाली, "वंदू मी उज्वला आहे घाबरू नकोस...!" उज्वलाने तिला डोक्यावर थोपटतच म्हटले. वंदना उज्वलाच्या मांडीवर डोक ठेऊन मनसोक्त रडली आणि हळू हळू शांत झाली आणि हळू आवाजात म्हणाली, "उजू, माझं सगळं संपलं गं...!" नाही.. असं म्हणायचं

नाही. मी तुला न्याय मिळवून देईन. माझी आत्या जिकडे कामाला जाते ती स्त्री जागृती संघटनेकडून तुला जरूर न्याय मिळेल. ज्यांनी गुन्हा केला आहे त्यांना शिक्षा ही मिळालीच पाहिजे. समाजाला घाबरून लोकलाजेस्तव  घरात बसलो तर गुन्हेगारी कमी होण्याएवजी गुन्हेगारी वाढेल. स्त्रीने पुढे पाऊल टाकलंच पाहिजे...! अशी वंदनाची तिने समजूत काढली. वंदनाला तिने हिम्मत दिली. तिचा आत्मविश्वास जागवला. तेव्हा ती पोलीस तक्रार  करण्यास  तयार झाली. परंतु अचानक उज्वला टायफॉईडने आजारी पडली म्हणून ती पुन्हा वंदनाला भेटू शकली नाही. रंजनाने आपल्या बहिणीची गोष्ट मनिषाला सांगितली. "अगं, तू आता काळजी करू नकोस. तू योग्य ठिकाणी आली आहेस. मीच ती संघटना चालवते...!" हे एकून रंजना खूश झाली. माझ्या ताईला आता न्याय मिळेल ...!  खुशीतच रंजना हॉस्टेलवर जाण्यास उठली. बरोबर अनयाही निघाली. उदयला पुन्हा पुन्हा पापा देऊन निघणार तोच मनिषाने अनयाला, स्प्रे घेतला का... ? म्हणून आठवण केली.

उदयला सहा महिने होऊन गेले होते त्यामुळे मनिषाला आता कामावर जायला हवे होते. तिने बाळाचे कपडे तसेच दूध बॅगेत भरून बाळाला तयार केले आणि सकाळी केलेली पोळीभाजी खाऊन उदयला घेऊन पाळणाघरात ठेवायला निघाली. ऑफिस आणि घरापासून पाळणाघर जवळच होते. उदयचा पाळणाघरात पहिलाच दिवस होता. त्यामुळे उदयला अंगावरचे दूध मिळणार नव्हते. पावडरच्या दूधावर संपूर्ण दिवस राहिल की नाही ही मनिषाला काळजी वाटत होती. मनिषाने बाळाला पाळणाघरात ठेवले आणि अनयाला फोन करून  तिने वंदनाच्या घराचा पत्ता घेतला. तसेच अनयाची मामी येत आहे. असे घरी कळविण्यास रंजनाला सांगितले आणि मनिषा वंदनाकडे गेली. दारावरची बेल वाजवताच वंदनाच्या आईने दार उघडले. अनयाची मामी आहे का.... ? वंदूची आई म्हणाली. हो.. हो.., मी अनयाची मामी....!  मनिषा बोलत बोलत आत शिरली.आम्हाला काही पोलिस तक्रार वगैरे काही करायची नाही, आधीच सांगते....! वंदूची आई फणकाऱ्यातच बोलली.

मनिषा वंदूच्या रूममध्ये आली. वंदनाने स्वत:ला बरेच सावरले होते. म्हणून वंदनाने मनिषाला सर्व हकिकत सांगितली. मनिषाने विचारले, घरातील सर्व पोलीस तक्रार करण्यास तयार आहेत का....? तीच तर मोठी अडचण आहे, वंदना म्हणाली. ठीक आहे, तू तर तयार आहेस नं.....? मनिषाने वंदनाचा हात हातात घेत म्हटले. मनिषा तिचा हात हातात घेऊन एक प्रकारे तिला हिम्मत देत होती. मी तुझ्या पाठीशी आहे हे दर्शवीत होती. त्यामुळे वंदनाही तयार झाली. मनिषाने सांगितले कि तुमची रंजना माझ्या भाचीची मैत्रिण आहे. आपलीच माणसं आहेत, घाबरण्याचे कारण नाही. मनिषानेसुद्धा अनेक केसेसना न्याय मिळवून दिला होता. म्हणून मनिषाच्या पोलीस स्टेशनला वारंवार चकरा होत होत्या म्हणून मनिषाला सगळे पोलिस डिपार्टमेंट ओळखत होते आणि कामंही पटापट होत होती. वंदनाचे बलात्कार झाल्याचे सर्टिफिकेट लगेच घ्यायचे होते. परंतु ते घेतले गेलेले नव्हते तो मोठा प्रश्न होता. त्या दिवशीचे फाटलेले कपडे मात्र जपून ठेवलेले होते. मेडिकल सर्टिफिकेट कसे काढायचे याचा मनिषा विचार करत होती. कारण बलात्कार होऊन पंधरा–वीस दिवस झाले होते.

इकडे वंदनाने सुद्धा पोलिस तक्रारीची गोष्ट आपल्या आई वडिलांना सांगितली तेव्हा लोकलाजेस्तव तिला कुणाचाही सहयोग मिळाला नाही. घरात मतभेदाने वादविवाद होऊ लागले. आई सांगते की तुझ्या भाऊ बहिणीचा विचार कर, त्यांचे लग्न व्हायचे आहे, तुझे लग्न व्हायचे आहे, त्यातून आपली होणारी बदनामी...... म्हणून पोलीस तक्रार करायची असेल तर तू आमच्याशी संबंध ठेवू नकोस....! तुझं तू बघ....! ही गोष्ट वंदना मनिषाला सांगते तेव्हा मनिषा म्हणते अस घाबरून कसं चालेल....? न्याय आपल्याला मिळायलाच हवा....! तू हवं तर माझ्या घरी रहा परंतु पाऊल पाठी फिरवू नकोस....! “आपली स्त्री जागृती संघटना कशासाठी आहे....? तर प्रत्येक निराधार पिडीत स्त्रीला न्याय आणि आधार मिळण्यासाठी ....!” मनिषा ठासून बोलत

होती. मनिषाबरोबर वंदना रोज पोलीस स्टेशनला जात होती. चकरा मारत होती. वंदनाला तपासायला जी लेडी डॉक्टर आली होती तिच्या ओळखीने मनिषाने मेडीकल सर्टिफिकेट मिळविले. तसेच वंदनाचे त्या वेळचे फाटलेले कपडेही पुराव्यासाठी होतेच. गुन्हेगारांना ओळखण्यासाठी वंदना आणि  मनिषा रोज पोलीस स्टेशनला जात  होत्या. परंतु ते गुंड मिळत नव्हते म्हणून वंदना निराश होती. परंतु एक दिवस त्या दहा गुंडामध्ये ते चार गुंड वंदनाने ओळखले होते. लगेच वंदनाला त्या दिवसाची ती काळी रात्र आठवली आणि एकदम ओरडू लागली आणि खाली पडली. मनिषाने तिला सावरले, तोंडावर पाणी मारून प्यायला पाणी दिले. हळू हळू वंदना  शुद्धीवर आली आणि त्या चार गुंडांच्या दिशेने बोट दाखवून निर्देश केला. लगेच पोलीसांनी त्यांना मारपीट करून गुन्हा कबूल करून घेतला. त्या चौघांना शिक्षा तर झालीच परंतु वंदनाला न्याय मिळाला होता. वंदनाने मनिषाचे आभार मानले. एवढं सगळं होत असताना विजयने काडीमात्र सहयोग दिला नव्हता. त्यामुळे वंदनाने साखरपुडयाची अंगठी त्याला परत केली. आणि मनिषाबरोबर स्त्री जागृती संघटनामध्ये सामील झाली. मनिषाच्या संघटनेमध्ये महिला व तरूण मुली यांची संख्या वाढत होती. या संघटनेमधूनच कित्येकांचे संबंध जुळत होते, त्या पिडीत मुलींना आधार मिळत होता, समाजात मानाचे स्थान मिळून त्यांचे जीवन पुन्हा उभे रहात होते.

बघता बघता अनया आणि रंजना जोडीनेच एम.बी.बी.एस करून जोडीनेच हॉस्पीटलमध्ये काम करत होत्या. कधी कधी मनिषा आणि वंदना त्या दोघींना हॉस्पिटलमध्ये भेटायला जात असत तेव्हा बाहेर हॉटेलमध्ये जाऊन रंजना, अनया, डॉ.सुहास, डॉ.विवेक मिळून कॉफी पीत असत. रंजना डॉक्टरांच्या क्वॅार्टर्समध्ये सुद्धा अनयाची पार्टनर होती. त्यामुळे डॉ. सुहास  दोघींना ‘‘सीता और गीता’’ चिडवत असत. डॉ. सुहास अनयाला फार आवडायचे. त्यांचे व्यक्तिमत्व नजरेत भरण्यासारखे होते. अनया त्यांचेच कौतुक करत असायची. त्यामुळे रंजना अनयाला त्यांच्या

नावाने चिडवायची. चिडवता  चिडवता अनयालासुद्धा त्यांच्याविषयी एक वेगळीच भावना निर्माण होऊ लागली. कॉफी प्यायलासुद्धा ती डॉ.सुहासबरोबर जात असे. हळू हळू मैत्रीचे रूपांतर प्रेमात होऊ लागले. तासन्तास रात्री मोबाईलवर गप्पा मारायचे. दिवसा तर डयूटीवर त्यांना जेवायचीसुद्धा फुरसत नसायची. पेशंटची एवढी गर्दी असायची की तीन वाजले तरी अनायाला जेवायाला टाईम मिळत नव्हता. तेव्हा डॉ.सुहास ते स्वत: बसून अनयाला जेवणासाठी फ्री करत होते. डॉ. सुहासचे मित्र विवेक हे दोघं चांगले दोस्त होते. डॉ. विवेकही अनया व रंजनाला सीता और गीता म्हणून चिडवत असत.  दोघी याच नावाने फेमस झाल्या होत्या. एक दिवस अनयाने डॉ.सुहास यांना आपल्या घरी बोलावले. अनया मुद्दामच त्यांना आजीकडे घेऊन गेली. तिथे मनिषा मामीची आणि तिच्या स्त्री जागृती संघटनेची ओळख करून दिली. मनिषाच्या कामासंबंधी ऐकून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले खरोखर आज स्त्रियांनी आपले स्वसरंक्षण करण्यास सक्षम असावे. पोलीस तर काय, गुन्हा होऊन गेल्यानंतर त्या स्थळी जातात, त्यानंतर आरोपीला शोधणार त्यानंतर त्या गुन्हेगाराची ओळख पटणार आणि नंतर मारपीट करून गुन्हा कबूल करून घेणार, त्या पुढे त्याला शिक्षा होणार तोपर्यंत किती  विलंब होतो. तोपर्यंत त्या पिडीत मुलीची सहनशीलता संपून जाते शिवाय न्याय मिळेपर्यंत तिला अनेक कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते. समाजाकडून होणारी बदनामी वेगळीच, तिच्या आयुष्याचे झालेले नुकसान तर कुणी भरून देत नाही किंवा गुन्हेगाराला शिक्षा देऊन तिच्या  आयुष्याची नुकसानभरपाई देखील होत नाही. तिच्या जीवनावर एक पिडीत महिला वा मुलगी म्हणून ठप्पा लागून जातो. त्यामुळेच प्रत्येक स्त्रीने स्वसंरक्षणाची  जबाबदारी स्वत: उचलली पाहिजे…! मला तुमच्या कार्याबद्दल अभिमान  वाटतो. या वरून मला माझ्या चुलत बहिणीची आठवण  झाली. तिने सुद्धा आपल्या बहादुरीने अशाच गुंड लोकांना पकडून  दिले होते…डॉ. सुहास अगदी मूडमध्ये  येऊन बोलत होते.  तोपर्यत अनयाने त्यांच्यासाठी कांदेपोहे बनवून आणले. अरे वा.. वास तर एकदम खमंग येतोय …!  कुणी बनविले…? सीताने की

आईनी ... मनिषा अनयाकडे बघतच राहिली. ही सीता कोण ...? तेव्हा अनयाने सीता और गीता विषयी आपल्या मामीला सांगितले. तेव्हा सर्वजण सुहासकडे बघून हसू लागले. पोहे तर चांगले झाले आहेत म्हणजे जेवण करता येतं म्हणायचं. मला वाटलं फक्त पेंशटला चेकअप करून औषध देण्याइतपतच करायला येतं ...! सुहास अनयाकडे बघून बोलत होता. अनया सुहासकडे रोखून बघू लागली. एवढयात मनिषाने विचारले तुम्ही तुमच्या चुलत बहिणीविषयी काय बोलत होतात...? ते तर सांगितलेच नाही ...! हं.. हं.., मी बोलता बोलता विसरूनच गेलो...! सुहास चहा पिऊन कपबशी टेबलवर ठेवत म्हणाला. मामी, या गोष्टीला दोन वर्ष झाली. तेव्हा माझी चुलतबहिण म्हणजे अनीता गावावरून जॉबसाठी मुंबईला आली होती. मुंबईची तितकीशी माहिती नव्हती तरीपण ती धीट होती, कोणाला घाबरणारी नव्हती. आली तेव्हा रूमच्या शोधात होती. तिला एका दलालाने एका नवीन बिल्डिंगमध्ये रूम दाखविली. अनिताला ती रूम आवडली आणि ती रूम भाडयाने घेऊन राहिली. परंतु त्या रूमच्या बाजूला मालकही रहात होता म्हणून चावी ती मालकाकडे ठेवत होती. एक दिवस अनीता आपल्या मैत्रिणीच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेली होती. पार्टीवरून येता येता तिला खूप उशीर झाला. घरी आल्यावर तिने मालकाकडे चावी मागितली परंतु मालक चावी देत नव्हता. टाईम काय झाला आहे...? रूमवर कुठल्याही परिस्थितीत नऊ वाजेपर्यंत यायला पाहिजे माहीत नाही का...? आता चावी मिळणार नाही...! मालक रागात बोलत होता तेव्हा अनिताने त्याला विनवणी करून चावी मागूनही त्याने चावी दिली नाही. अनिता उदास होऊन तिथून निघाली. आता कुठे जायचे या विचारात ती रस्त्याला चालत होती. तेवढयात तो दलाल तिला भेटला. त्याने विचारले की एवढया रात्री कुठे जाता...? हा एरिया चांगला नाही ...! दलाल म्हणाला. तेव्हा अनिताने त्या मालकाविषयी सर्व सांगितले तर दलालाने एक रात्रीसाठी तिला राहण्यासाठी त्याच्या हातात ज्या भाड्याने रूम दयायच्या होत्या त्यांच्या चाव्यापैकी एक चावी अनिताला देऊन तिथे राहण्यास सांगितले आणि त्यांना रूम दाखवून तो निघून गेला. अनिता फार

थकली होती म्हणून हातपाय धुऊन ती बेडवर झोपली. लगेच तिला झोप लागली आणि अचानक तिला काही पडल्याचा आवाज आला म्हणून ती उठली. आणि कोण आहे ...? असे बोलून तिने लाईट लावला,तर समोर तो मालक उभा होता. त्यानेच तिला हाकलून लावले होते. अनिता समजून गेली हा दलाल आणि हा मालक दोघं मिळालेले आहेत. एक नंबरचे गुंड होते. मालक अनिताला पकडण्यास पूढे झाला. परंतु अनिता बेडच्या गोल गोल फिरून त्याला चकवत होती. तिला टेबलवर फुलदाणी दिसली ती उचलून तिने त्याच्या डोक्यात मारून लॅच काढून ती बाहेर सटकली आणि पोलीस स्टेशनला गेली. तिथे तिच्या तक्रारी विषयी पोलीसांनी दाद दिली नाही म्हणून ही गोष्ट तिने पेपरला छापायला दिली. हा सारा समाचार पेपरमध्ये आला होता. ही गोष्ट याच मालकाकडून एका दुसऱ्या मुलीशी असाच प्रसंग घडला होता तिने पेपरला हा वृतांत वाचला. तेव्हा या मालकाला चांगली अद्दल घडविण्यासाठी तिने अनीताचा पत्ता शोधला आणि त्या पत्त्यावर अनीताला भेटली. दोघींनी मिळून प्लॅन केला. अनीताने त्या मालकाला फोन करून त्याला रूमवर बोलवले. आपल्याबरोबर रेकॉर्डींग करण्यासाठी पेन ठेवले आणि मालक आल्यावर त्याच्याशी मुद्दाम भांडू लागली. रूम दिखाने के बहाने से लडकियों को फसाता है क्या ...? अब तुझे पुलिस के हवाले करूंगी...! ए .., किसके सामने बात करती है...? पोलीस मेरा कुछ नही बिगाड सकती ... असे बोलून तो अनिताला पकडून अश्लील चाळे करायला पुढे झाला. ‘‘साली धंदा करायला इकडे आली आणि सभ्यपणा दाखवते. तुझ्यासारख्या अनेक मुलींना मी विकत घेतले आहे. पोलीसला मी घाबरत नाही जा.. जा.. कुठल्या पोलीसला बोलवते ...? त्याला बोलव ...! तू धंदा करतेस म्हणून मीच तुला पोलीसच्या हवाली करेन ...! तेवढयात त्या दुसऱ्या मुलीने बाहेर उभे असलेल्या पोलीसांना घेऊन आली आणि सांगितले की आमच्या सारख्या मुलींना रूम देऊन त्यांची इज्जत लुटतात आणि हा दलालसुद्धा यामध्ये मिळालेला आहे ...! असे म्हणून पोलीसांनी दोघांना अटक केली आणि ते पेनही पोलीसांना पुराव्यासाठी देऊन टाकले. हा प्लॅन अनीताने रचला होता.

एवढयात उदय उठला आणि रडू लागला. सुहासने घडयाळात बघितले बराच उशीर झाला होता. मनिषा म्हणाली आता जेवूनच जा ...! परंतु तुमच्या बहिणीची दाद दयायला हवी हं ...! एवढी हिम्मत प्रत्येक स्त्रीला हवीच आहे ...! एकदा अनीताला आमची संघटना दाखवायला घेऊन या ...! मनिषा उदयला खांदयावर घेत म्हणाली. “अनया चल, मी आता निघतो ...!” डॉ- सुहास खुर्चीतून उठत म्हणाले. अनया त्यांना गेटपर्यंत सोडायला गेली. मनिषा पाठीमागून दोघांना न्याहाळत होती. खरंच जोडा अगदी लक्ष्मी नारायणाचा दिसतो...! अनया सुहासला सोडून आली. लगेच मनिषा अनयाला चिडवू लागली. “काय मग मजा आहे एका मुलीची,” लगेच अनया लाजून आत गेली.

दुपारची जेवणं झाली आणि अनया बाबांना भेटायला गेली होती. अनयाला बघून अमित खुश झाला. अनया, तू कशी आहेस ...? बाबा मी ठीक आहे, परंतु तुमची तब्येत अशी का...? तब्येत एवढी खराब का झाली ...? अनया अमितच्या कपाळाला हात लावत म्हणाली. बाबा तुम्हाला तर थोडा ताप आहे ....! अनया बाबांना हक्काने बोलत होती. लगेच अनयाने मेडिकल शॉपमधून औषधं आणली. आणि बाबांना तीन टाइम घ्यायला सांगितले. अमितला अनयाचे वागणे बघून त्याला तिचे कौतुक वाटले. कालची एवढीशी पोर आज एम.बी.बी.एस. पास करून डॉक्टर झाली. अमितला एक गर्व अनुभव होत होता. गीता अमितकडे काही लक्ष देत नव्हती. तिला तिच्या घरच्यासारखा थाटमाट मिळत नव्हता. त्यामुळे तिला अमितच्या असलेल्या परिस्थितीत राहायला जमत नव्हते म्हणून काही काम न करता झोपायचं आणि टी. व्ही. बघायचा, हाच तिचा दिनक्रम होता. अमितच दिवसा घरातील सर्व काम करून रात्री आर्केस्ट्राला जात होता. परंतु आता रात्रीचं दोन अडीचपर्यंत जागणे त्याला झेपत नव्हते. शिवाय अनयाचे शिक्षणही पुरे झाले होते. त्यामुळे तिच्या लग्नाची काळजी वाटू लागली होती. अनयाने आपल्या बाबांशी खूप गप्पा मारल्या आणि

तिथूनच ती हॉस्टेलवर गेली. हॉस्टेल वर रंजना अनयाचीच वाट पहात होती. रंजना उत्सुकतेने दिवसाचा समाचार विचारत होती. अनयासुद्धा मोठ्या गमतीने डॉ.  सुहास विषयी बोलत होती. बोलत बोलत दोघी झोपी गेल्या. मॉर्निंग डयूटी असल्याने दोघीही लवकरच उठल्या होत्या. अनयाला वॉर्डमध्ये आठ वाजता राऊंड मारायला जायचं होतं म्हणून अनया कॅन्टीनमध्ये कॉफी प्यायला गेली. तिथे डॉ.सुहास व डॉ. विवेक आणि रंजना कॉफी पीत बसले होते. अनयाला बघून "या... या.., फार लवकर  आलात ...?" डॉ सुहास अनयाला चिडवत म्हणाले. अनया काही बोलली नाही. तिने कॉफी वेंडींग मशीनमधून कॉफी  घेतली आणि शांतपणे पीत बसली. तेवढयात तिला कॉल आला, एक ईमर्जन्सी केस आली म्हणून तिने कॉफी तशीच ठेवली आणि वॉर्ड नं. दहामध्ये गेली. तिथे एक अठरा - वीस  वर्षाची मुलगी तोंडावर भाजलेली होती. पोलिस केस होती, पोलिस  तिला प्रश्न विचारण्यासाठी तिची शुद्धीवर यायची  वाट पहात होते. एकतर्फी प्रेमातून मुलीच्या तोंडावर ॲसिड फेकले गेले होते. त्यामुळे चेहरा भाजला गेला होता. तिच्या आई वडिलांनी सर्व माहिती पोलिसांना सांगितली. थोडया वेळात ती मुलगीही शुद्धीमध्ये आली. पोलीसांनी पुन्हा तिला प्रश्न विचारून योग्य ती माहिती मिळवून घेतली. लगेच अनयाने सिस्टरला सांगून ग्लुकोज लावून ट्रीटमेंट चालू केली. त्या मुलीकडे बघून अनयाने दीर्घ निश्वास टाकला. त्या मुलीचा चेहरा एकदम विचित्र आणि एकदम भयानक दिसत होता. अनयालाही अशी केस पहिलीच केस होती. अनयाचा प्रॅक्टीसचा पिरिएड होता. त्यामुळे वेगवेगळया प्रकारच्या केसेस बघायला मिळत होत्या. अनयाला त्या मुलीचे वाईट वाटले. अनयाने कॉटला लटकलेल्या पॅडवरच्या पेपरवर औषध लिहिली आणि दुसऱ्या वॉर्डला राऊंड मारायला निघून गेली. सगळ्या पेशंटना तपासत तपासत छोटया मुलांच्या वॉर्डमध्ये गेली.सगळया लहान मुलांनी गुड मॉर्निंग डॉक्टर.... गुड मॉर्निंग बच्चो, असे म्हणून अनयाने मुलांना दुजोरा दिला. त्या दिवशी लहान मुलांचे डॉ. प्रथमेश आलेले नव्हते म्हणून अनयाने राऊंड मारली होती. त्या वॉर्डमध्ये बघितले तर कोणी दोन वर्ष तर कोणी चार

वर्षाच्या बालिकांवर बलात्कार झालेले होते. गुन्हेगार होते वीस बावीस वर्षातले युवक. हे सर्व बघून अनयाला वाटले या देशाचे काय होणार आहे... ? वयाची काही मर्यादा राहिली नाही ... नात्याचे बंधन राहिले नाही ... आणि कायदयाचे भय राहिले नाही. कुठे दोन वर्षाची बालिका आणि कुठे तो वीस बावीस वर्षाचा युवक ... चिमुकली ती बालिका, अजून तिचे तोतरे बोलही स्पष्ट येत नव्हते की तिचे लटपट लटपट पडणारं छोटं पाऊल स्वत:चा तोल सांभाळत नव्हते ... आई शिवाय कुणाला न ओळखणारं तिचं भाबडं मन ... त्या मुलाला दिसलं नाही का ...? बिचारी पोट दुखतं... पोट दुखतं म्हणून कळवळत होती. अनया हे बघून एकदम उदास झाली. तिला ते असहय झाले आणि ती आपल्या केबीनमध्ये जाऊन बसली. तिने लगेच रंजनाला फोन केला. ‘‘रंजना, आज संध्याकाळी आपण समुद्रावर फिरायला जाऊया...’’ अनया म्हणाली. आज स्वारी मूडमध्ये दिसते आहे. रंजना थट्टा करीत म्हणाली. नाही गं, जरा मूड खराब आहे म्हणून अनया गंभीरपणे बोलत होती. का.. डॉ सुहास बरोबर काही झाले का ...? रंजना हसत हसत म्हणाली. तुला तर मजा सुचते ...! सुहास शिवाय तुला काही दिसत नाही...! अनया फुगून बोलत होती. ‘‘नाही गं, तुझा जरा मूड आणण्यासाठी थोडीशी गम्मत केली ...!’’ रंजना म्हणाली संध्याकाळी चार वाजता कॅन्टीनमध्ये भेट ...! असे म्हणून अनयाने फोन ठेवून दिला. अनया आलेल्या पेशंटना तपासून औषधं लिहून देत होती. तेवढयात डॉ सुहास केबीनमध्ये आले त्याबरोबर अनयाचा चेहरा खुलून गेला, गेलेला मूड परत आला. काय मग, संध्याकाळी फिरायला जायचा प्रोग्राम आहे वाटतं ...! डॉ सुहास पेपरवेटला गोल फिरवत म्हणाले. आमची कंपनी नको आहे असे वाटते...! आम्हाला सोडून फिरायला जाणार तर...! डॉ. सुहास चिडविण्याच्या सुरात बोलत होते. असं थोडंच आहे ...? तुम्ही सुद्धा येऊ शकता ...! अनया म्हणाली. लगेच अनया आणि सुहास कॉफी प्यायला गेले. संध्याकाळी चौपाटीवर अनया व डॉ सुहास दोघेच फिरायला गेले. दोघेही समुद्राच्या भरधाव उसळणाऱ्या लाटा बघत होते. समोर सोनेरी सनसेट बघायला अनयाला आनंद वाटत होता. धुंद

धुंद हवा खेळत होती. अनया आपल्या कपाळावर येणाऱ्या लाडीक बटांना आपल्या लांबट बोटाने पाठीमागे करत होती. परंतु पुन्हा पुन्हा त्या बटा पुढे येऊन पकडा पकडीचा खेळ खेळत होत्या. थोडा वेळ कुणीच काही बोलत नव्हतं. हलकेच डॉ. सुहासने अनयाचा हात हातात घेतला. अनयाच्या चेहऱ्यावरील प्रतिक्रिया सुहास न्याहाळत होता. परंतु अनयाने प्रतिरोध केला नाही, उलट ती लाजून दुसरीकडे बघू लागली. तेव्हा हिम्मत करून सुहासने तिला लग्नाची मागणी घातली. सुहासचे बोल ऐकून अनया मोहरून गेली आणि हळूच म्हणाली बाबांना विचारून सांगेन...! अंधार पडू लागला तसे सुहास व अनया हॉस्टेलवर जाण्यास निघाले. अनया रूमवर आली, रंजना आधीच येऊन आराम करत होती. "काय गं तू का आली नाहीस ...?" अगं वेडाबाई, मी आले तर डॉ. सुहास तुला भेटले असते का....? म्हणून मी मुद्दामच आले नाही ...! रंजना हसत हसत म्हणाली. डॉ. सुहासने घातलेल्या लग्नाच्या मागणीविषयी अनयाने रंजनाला सांगितले. अनया खुश झाली होती. त्या खुशीतच रंजनाचा हात पकडून झोपून गेली. दुसऱ्या दिवशी तिला विकली ऑफ होता. रंजनाला मात्र सुट्टी नव्हती. तेव्हा अनयाने आपल्या मामीला फोन करून येण्याचे कळविले. तेव्हा मनिषाने सुहासला सुद्धा बरोबर घेऊन ये, म्हणजे सुहासला बाबा सुद्धा बघू शकतील...! मनिषा फोनवर बोलत होती. त्याप्रमाणे अनया सुहासला घेऊन जेवायला आजीकडे आली. अमितही आला होता. सुहास मनमोकळेपणाने बोलत होता. सर्वांना सुहासचा स्वभाव आवडला होता. सुहास आईवडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्यांचा पनवेलला मोठा बंगला होता. घरची परिस्थिती चांगली होती. अनयाने सुहासच्या लग्नाच्या मागणीविषयी आपल्या मामीला सांगितले. म्हणून मनिषा बोलता बोलता एकदम बोलून गेली की काय मग आमची अनया तुम्हाला पसंत पडली तर ...! सुहासने गालातल्या गालात हसत आणि लगेच विषय बदलला. जेवण उरकून अनया व सुहास जायला निघाले तेव्हा अमितने पनवेलचा पत्ता घेतला.

असेच एक दिवस सुहासच्या घरी जाण्याचा प्रोग्राम ठरला आणि सकाळीच अमित, उमेश, मनिषा, अनया व सुहास सगळे मिळून पनवेलला गेले. सुहासची गाडी होती म्हणून उदयला बरोबर घेतले होते. गप्पा मारत मारत पनवेल गाठलं. सुहासचा बंगला फार छान होता. घरही चांगले सजविलेले होते. बंगल्या समोर हिरवेगार गार्डनही होते. बाहेर ओटयावर झोपाळा होता. गेल्या गेल्या अनयाने सुहासच्या आई वडिलांना नमस्कार केला. किचनमध्ये कांदे पोहे आणि चहा बनवण्यास सुहासच्या आईला अनया मदत करू लागली. नाश्ता करता करता सुहासची आई म्हणाली तुमची अनया कामात हुशार आहे हं...! मला सुद्धा अशीच सून हवी आहे...! सर्वांचा नाश्ता झाल्यावर सुहासने सर्व बंगला फिरवून आणले, नंतर सगळे समोरच्या गार्डनमध्ये बसले. मनिषा आणि अनया सुहासच्या आईला जेवण बनविण्यास मदत करायला गेल्या. जेवणात स्पेशल पुरणपोळ्या होत्या. सर्वांना जेवण फार आवडलं. शेवटी बोलत बोलत मनिषाने लग्नाचा विषय काढला तेव्हा सुहासची आई म्हणाली अगदी आमच्या मनातलं ओळखलं तुम्ही...! मीच तुम्हाला विचारणार होते...! सुहासची आई म्हणाली. "चला तर दिवाळीनंतर बार उडवून टाकूया...!" मनिषा हसत म्हणाली. संध्याकाळ झाली म्हणून सगळे जाण्यास निघाले. घरी येऊन साखरपुडयाची तारीख ठरविली. त्या दिवशी सर्व डॉक्टर्स अनयाच्या घरी आले होते. घर पाहुण्यांनी भरले होते. रंजना अनयाच्या पाठी पाठी करत होती, जणू पाठराखीण बनली होती. अनयाला तिनेच सजविले होते. अनया अगदी रेखासारखी सुंदर दिसत होती. त्यामुळे रेखाची आठवण होऊन अमितचे डोळे पाणावले.सुहास व अनया यांनी मुहूर्ताप्रमाणे एकमेकांना अंगठी घातली आणि सर्वांना नाश्तापाणी, रात्रीचे भोजन करून कार्यक्रम संपन्न झाला. लग्नाची तारीख एक महिन्यावर आली होती. त्यामुळे नंदा व तिची फॅमिली साखरपुडयाला न येता लग्नालाच हजर राहणार होते. अनयाची शॉपिंग सुरू झाली. मनिषाने साड्या, पॅंटपीस , शर्टपीस वगैरे खरेदी करण्यास सुरूवात

केली. अनयासाठी सोन्याचे दागिने खरेदी केले. हॉल, रिसेप्शन, रोषणाई वगैरे अमित आणि उमेश बघत होते. अनया खूश होती कारण ज्या मुलावर प्रेम केले त्याच मुलाशी लग्न होत होते.

मनिषाची संघटना दूर वर प्रसिद्ध होत  होती. संघटनेत स्त्रियांचा ग्रुपही मोठ्या संख्येने वाढला होता. हा ग्रुप एकजुटीने प्रत्येक स्त्रीची समस्या दूर करत होता.  असेच एक दिवस मनिषा कामाला जात असताना तीन चार गुंड येऊन मनिषाच्या नाकावर रूमाल ठेवून तिला बेशुद्ध करून गाडीत टाकून घेऊन गेले. मनिषाला घेऊन जाताना एका महिलेने बघितले होते, तिने लगेच नंबर वाचून लक्षात ठेवला. तिने लगेच मनिषाच्या ऑफिसमध्ये जाऊन कामत मॅडमना सांगितले. लगेच सर्वांना फोन करून साठसत्तर महिला एकत्र झाल्या  उमेश व अमितने पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविली. तेव्हा पोलीसांनी उमेशला विचारले, तुमचा कोणावर संशय आहे का...? परंतु उमेश समजून होता मनिषाची आई ज्यांची रखेल होती त्यांचेच हे काम आहे. कारण याआधी सुद्धा पुण्याला मनिषावर त्याने हल्ला केला होता. तरी उमेश काही बोलत नव्हता. संघटनेमध्ये सर्व महिला एकत्र होऊन कोठीवर मोर्चा घेऊन गेल्या. बरोबर पोलिसही होते. कामत मॅडम नेतृत्व सांभाळत होत्या. मोर्चा एकच गर्जना करत होता. “मनिषा को छोड दो ... मनिषा को  छोड दो, नही तो हम कोठी जला देंगे...!” असे म्हणत मोर्चा पुढे पुढे सरकत होता. प्रत्येक महिलेच्या हातात मिरची पावडरच्या पाण्याचा स्प्रे होता.  प्रत्येक गुडांवर स्प्रे मारून सर्व महिला कोठीत शिरल्या. त्यांनी मनिषाला शोधून काढले. तिला  एका खाबांला बांधून ठेवलेले  होते.  आणि तो मनिषाचा बाप समोर बंदूक घेऊन उभा होता. सगळया महिलांनी एकसाथ मिरचीच्या पावडरच्या पाण्याचा वर्षाव  चालू केला आणि तिच्या बापावर झडप घातली. डोळ्यात तिखट पाणी गेल्याने तो खाली पडला. तो तडफडत होता तेवढयात पोलीसांनी येऊन त्याला पकडले आणि मनिषाची सर्वांनी सुटका करून तिला घरी आणले. या स्त्री जागृती संघटनेमुळेच मनिषाची सुटका झाली होती.

अनयाचा लग्नाचा दिवस उजाडला. नंदा आपल्या फॅमिलीला घेऊन मुंबईला आली. नंदाची दीपिकासुद्धा लग्नाची झाली होती. रंजना दोन दिवसांपासून अनयाच्याच घरी राहिली होती. कामात ती मदतही करत होती. लग्नामुळे घर भरलेले होते. उदयही नुकताच बी.कॉम होऊन कॉम्प्युटर शिकत होता. मनिषा सर्व जेवणाचं काम सांभाळत होती. अनयाला हळद लावून दुपारी सगळ्यांची जेवणं झाली. दुसऱ्या दिवशी हॉलवर लग्न होते. रंजना अनयाची बॅग भरण्यास नंदाला मदत करत होती. रात्री झोपायला बारा वाजले होते. तरी सकाळी पाच वाजता सगळे उठून लग्नाची तयारी करून हॉलवर गेले. सकाळी अकराचा मुहूर्त होता. बरोबर अकरा वाजता विधी सहित ‘‘शुभ मंगल सावधान’’ म्हणून सुहास व अनयाने एकमेकाला हार घातले आणि जीवनाचे साथी बनले. अनया निघतेवेळी बाबांना बघून रडू लागली. कारण बाबा आता एकटे पडले होते. त्यांनी आपले अश्रू लपविले आणि अनयाला जवळ घेतले. सर्वांच्या पाया पडून अनया सुहासचा हात पकडून गाडीत बसली. सर्वजण अनयाला निरोपाचा हात दाखवून हेच सांगत होते की ‘‘जा मुली जा... दिल्या घरी तू सुखी रहा...!’’

मनिषा सर्व लग्नसराई संपवून कामाला जाऊ लागली. मनिषा एक मोठी कामगिरी पार पाडत होती. ‘‘स्त्री जागृती संघटना’’ प्रसिद्ध झाली होती. कामत मॅडमचा सहयोग मिळत होता. मनिषाने पुण्याची जागा विकून पिडीत महिलांसाठी आश्रम बनविण्याचा विचार केला. कारण कित्येक महिलांना व मुलींना वंदनाप्रमाणे लोकलाजेस्तव घरून सहयोग मिळत नव्हता. अशांना राहण्याची व्यवस्था करण्यासाठी तिने असा विचार केला. त्यासाठी ती पुण्याला गेली आणि दलाल लोकांना भेटून रूम चांगल्या किंमतीत विकण्याचा प्रयत्न केला. तीन चार दिवसात काम झाले नाही म्हणून अजून आठ दिवस राहण्याचा प्रोग्राम वाढवला. शेवटी एक पार्टी मिळाली आणि ती रूम साठ लाखाला गेली. मनिषाने तेच पैसे आश्रमाला लावले, आश्रमात सर्व सुविधा केल्या. तिथल्याच

नगरसेविकेला बोलावून आश्रमाचे उद्‌घाटन केले आणि “रेखाश्रम” नाव ठेवून रेखा आणि सीमा सारख्या उमलत्या कळयांना आधार छत्र दिले. या आश्रमामुळेच कित्येक पिडीत मुलींना महिलांना आधार मिळणार होता. जीवन जगण्याचा एक नवा प्रकाश मिळणार होता.

मी अमेरिकेहून आठ वर्षांनी आले, बघते तर किती बदल झालेला होता. एक नवीनच आश्रम दिसत होता. त्या भोवती सुंदर हिरवागार बगिचा होता. आश्रमाच्या भिंतीवर गोल्डन अक्षरात “रेखाश्रम” नावाचा बोर्ड झळकत होता. रेखाचे नाव बघताच सारा इतिहास माझ्या डोळ्यासमोरून क्षणात सरकून गेला. त्या मनिषाला, मनिषाच्या प्रेरणेला त्यातून यशस्वी केलेल्या कार्याला मी मनातून सॅल्यूट केला. या आश्रमाच्या कुंडीत, आत्मविश्वासाच्या मातीत, हिमतीच्या दवबिंदूच्या जलाने या उमलत्या कळया किती हर्षाने टवटवीत होऊन विकसित होत आहेत....! जणू हा फुलांचा बगिचा बहरला आहे. या बहरलेल्या फुलांच्या ताटव्यात मी भारावून गेले. एवढयात मनिषा आली ती क्षणभर माझ्याकडे पहात राहिली. मी तिच्या डोळ्यात एक वेगळेच तेज बघत होते. त्या तेजाने तिचे डोळे चमकत होते. ते तेज त्या स्वप्नांच्या सत्यतेचे होते. तिच्या आईच्या स्वप्नांचे साकारलेले स्वरूप होते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य